| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्षाची | अगाऊ रु० ५ | डांक हाशील | ०।३ |
| सहामाही | " ३ | " | ०८ |
| सालअखेर | " ७ | " | १०८ |
| किरकोळ अंकास | | | ०४ |

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०।१

| | Rs. | | | |
|---|---|---|---|---|
| annum in advance | 5 | Postage | 13 | as |
| annum in arrears | 7 | ,,1Rs· | 8 | as |
| monthly............ | 3 | " | 8 | as |
| Single copy........................ | | | | 4as |

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per lin3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV | AKOLA MONDAY 7 DECEMBER 1891 | NO 47

वर्ष २५ | अकोला सोमवार तारीख ७ माहे दिसेंबर सन १८९१ इ० | अंक ४७


## जाहिरात

फुली गांव तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणें येथील दुकान् नामें 'ईश्वरदास उदाराम' किंवा 'ईश्वरदास मोहनलाल' आहे त्या दुकानांच्या हर प्रकारच्या देवघेवीच्या व इतर व्यवहाराच्या व त्या दुकानच्या ऋणको—धनको संबंधाच्या हक्कांच्या प्रकरणांत ज्या कोणांचा संबंध पोंचत असल त्यांना या जाहिरातीनें असें कळविलें जातें कीं त्या दुकानचे कुलमुखत्यार रा. रा अमेदीराम नरसिंगदास यांचें या जाहिरातीच्या तारख पासून कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे. वरील दुकाना संबंधानें कोणत्याही प्रकारची देवघेव सदरहु अमेदीराम यांच्याशी आज मित्ती पासून कोणी करूं नये. आणि तशी कोणी केल्पास ती देवघेव दुकानचे व इतर इस्टेटीचे संपूर्ण सज्ञान व कायदेशीर वारसदार खाली सही करणार यांस मंजूर नाहीं. या खेरीज खाली करणार यांच्या लेखाशिवाय जर कोणी त्यांच्या मातोश्री शेरू उर्फ सिताबाई यांच्याशी सदरहु दुकानच्या स्थावर जंगम इस्टेटी संबंधानें देवघेव करतील तर तीही बेकायदा मानली जाऊन रद्द केली जाईल कळावें तारीख ३ माहे दिसेंबर सन १८९१ इसवी.

( सही ) मोहनलाल ईश्वरदास राठी
रहणार फुली तालुके मलकापूर
दस्तुर खुद्द.

---

नोटीस.

तीर्थरूप गंगा भागिरथी मातोश्री शेरू उर्फ सिताबाई मर्द ईश्वरदास मारवाडी कायमच्या राहणार वस्ती फुली तालुका मलकापूर यांचे शेवेसीः—

बालके मोहोनलाल ईश्वरदास राठी याचा साष्टांग नमस्कार विज्ञापना. आपण देशीं गेल्यामुळें व इकडे दुकाना संबंधानें फार गडबडी व घोटाळा झाल्या कारणानें ही नोटीस देणे भाग झालें आहे. माझें दत्तविधान आपल्या मांडीवर संवत १९४४ सालीं झाल्यापासून मी आपणा जवळ आपल्या आज्ञेत रहात आलों. माझ्या अज्ञानपणांत दुकानची व्यवस्था व देवघेव पूर्वींप्रमाणें सुरळीत चालावी यासाठीं कर्ता पुरुष पाहिजे म्हणून आपल्या सख्या भावास म्हणजे ती० रा० रा० अमेदीराम नरसिंगदास यांस दुकानतर्फे कुलमुखत्यार नेमिलें. ही गोष्ट घडून चार वर्षें झालीं हल्लीं मी कायद्या प्रमाणें सज्ञान झालों व मला सर्व गोष्टींची वाकबगारी झाली. रोजगार धंदा व आपली घरची दुकानदारी चालविण्याची मला आतां इच्छा आहे. व या प्रमाणें मी आपणास कळविलें. परंतु आपण मला कांहीं काम करूं देत नाहीं. व नेमलेल मुखत्यार ती० रा० अमेदीराम नरसिंगदास हे दुकानचें [illegible] त्या रीतीनें व प्रामाणिकपणानें [illegible] आणि नाहीं या विषयीं मला मो[illegible] अशीच व्यवस्था कांहीं वर्षें चालूं ठेविली तर मोठा घोटाळा होऊन माझें नुकसान होण्याचा संभव आहे. आपला विश्वास त्या सदरहू अमेदीराम याजवर फार आहे, तो अगदीं घातुक आहे. दुसऱ्या नोटीशीनें मामा साहेबांचे कुलमुखत्यारपत्र रद्द करीत आहे सबब आज रोजीं सदरहु ती० रा० अमेदीराम यांस मी आलाहिदा नोटीस दिली आहे कीं तुह्मी दुकानचें काम पाहूं नये. तुमचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. कदाचित् माझ्या नोटीशीस ते जुमानणार नाहींत सबब आपणासही या नोटीशीवरून कळवितों कीं आपण सदरहू ती० रा० अमेदीराम यांचें मुखत्यारपत्र रद्द करावें व त्यास असें सांगावें कीं इतःपर त्यांनीं दुकानच्या कामांत हात घालूं नये; व आज पर्यंत त्यांनीं दुकान पाहिलें त्याचा हिशेब जितका लवकर होईल तितका मला द्यावा. कळावें. तारीख ३ माहे दिसेंबर सन १८९१ इ०

( सही. )
मोहोनलाल ईश्वरदास राठी
दस्तुर खुद्द राहणार फुली
तालुका मलकापूर.

---

नोटीस

तीर्थस्वरूप रा. रा. मामा साहेब अमेदीराम नरसिंगदास राहणार फुली तालुके मलकापूर यांसः—

मोहोनलाल ईश्वरदास याचा साष्टांग नमस्कार विनंती विशेष—माझें दत्तविधान माझ्या अल्पयांत व अज्ञानपणांत झाल्या पासून माझ्या स्थावर जंगम इस्टेटीची वहिवाट व दुकानदारीचीं सर्व कामें माझी पालण करणार मातोश्री शेरू उर्फ सिताबाई इच्या तर्फे तिनें दिलेल्या कलमुत्यार पत्रावरून आपण पहात आला. या गोष्टीस आज चार वर्षें होऊन गेलीं तेव्हां पासून आपणच सर्व कारभार पहात आहा. मी आतां कायद्या प्रमाणें सज्ञान झालों. व दुकानचें काम पाहण्याची मला आतां इच्छा आहे. व त्या प्रमाणें थोडें मी पहातही आहे, इतःपर नोटीस पोहोंचल्या तारखेपासून कोणत्याही प्रकारें देवघेव किंवा इतर दुकानचा व्यवहार माझ्या इस्टेटी संबंधानें आपण करूं नये. या लेखान्वयें मी आपलें कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे हें आपणांस कळावें व आपल्या कुलमुखत्यारपणाच्या चार वर्षांच्या कारभाराचा हिशेब तुह्माकडून मला घेणें आहे; तो हिशेब तुह्मी लवकर द्यावा. ही गोष्ट तुह्मी नाकाराल तर सरकार मार्फत सर्व हिशेब रुजूं करून घेईन आणि त्यावेळें पावेतों मला जो खर्च पडेल तो या नोटीशीच्या खर्चासहित तुह्मापासून भरून घेतला जाईल. कळावें. तारीख ३ माहे दिसेंबर सन १८९१ इ०

( सही. )
मोहोनलाल ईश्वरदास राठी
दस्तुर खुद्द रहाणार फुली
तालुके मलकापूर.

---

नोटीस

रा० रा० उदेभान वल्लद परशराम पाटील घाटे मौजे वडी परगणें नांदुरा तालुका मलकापूर जिल्हे बुलढाणें यांस.

देऊ मर्द सापुर्डी पाटील वस्ती मौजे वडी तालुके मलकापूर जिल्हे मजकूर. नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं माझा नवरा नामे सापुर्डी पाटील हा मयत झाला त्याची दशक्रिया झाल्या नंतर दुसरे तिसरे दिवशी मी माझे घरांतून एक तांब्यांत रु० ३०० शें नी भरून पांच पंचाचे मार्फत तुमचे हवाला केला. त्यां पचाचीं नांवें:-मारुती भोकरें, मारुती बोडखे, मनसु पाटील, दत्तु धोराडे, सदाशिव पाटील, आणि तुकाराम धोराडे.

सदर्हू पंचाचे समक्ष तुह्मांजवळ माझे मुलीचे लग्न जें दिवशीं होईल ते दिवशीं तुह्मी ते रुपये द्यावेत अशा करारानें दिले. करितां मीं ज वेळेस लग्न मुलीचें केलें तेव्हां तुह्मास रुपये मागितले; तुह्मी दिले नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. करितां नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं ज्या दिवशीं आह्मी रकम ठेविली ते ऐन रु० ३०० शें व त्यांचे आजपर्यंतचें व्याज रु० १०२ मिळून ४०२ रु० हे रु० नोटिस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत आणून देऊन पावती घेऊन जावी. असें न केल्यास ह्या नोटिसीचें खर्चासुद्धां तुह्मांवर कोर्टांत फिर्याद करून अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च व नुकसान वगैरे होईल तें सर्व भरून घेतलें जाईल. कळावें. तारीख ४ माहे दिसेंबर सन १८९१ इसवी.

( सही )
सहीचि निशाणी नांगडो देऊ मर्द
सापुर्डी रहाणार वडा हिचे
हातची असे.

---

## जाहिरात

( अकोला म्यानुफ्याक्चरिंग कंपनी लिमिटेड हि कर्ज फेडीच्या व्यवस्थेस लावल्या संबंधीं प्रकरणा वरून )

वर लिहिलेल्या कंपनीच्या धनकोंना या जाहिरातीनें कळविलें जात आहे कीं त्यांनीं आपली नावें, पत्ते, आणि त्यांचीं कंपनीवरील कर्जें किंवा इतर हक्क याविषयीं सविस्तर माहिती आणि तसेंच जर कोणी यांचे अटर्नी किंवा वकील असतील तर त्यांची नांवें आणि पत्ते अशी दोन्ही गोष्टी सदर्हू कंपनीचे लिक्विडेटर ( कर्ज फेडीचे व्यवस्थापक ) मि. आर्देसर बेजनजी यांजकडेस मुंबईतील चर्च गेट स्ट्रीट मधील घर नंबर १९ येथें त्यांच्या आफिसांत बुधवार ता० १६ माहे दिसेंबर सन १८९१ इ० रोजीं अगर त्या पूर्वीं लिहून कळवाव्या. आणि सदर्हू लिक्विडेटर यांजकडून लेखी नोटिसीने विचारणा झाल्यास त्यांनीं अटर्नी मार्फत त्या नोटिसींत नेमलेल्या वेळेवर हजर राहून आपली नमूद केलेली कर्जें अगर इतर हक्क शाबीत करावे या बरहुकुम त्यांच्या हातून घडलें नाहीं तर त्यांची कर्जें शाबित होई पर्यंत एखादी कर्जांचा वजावाट केली जाईल तिचा फायदा त्यांना घेतां येणार नाहीं. तारीख २० माहे नोवेंबर सन १८९१ इसवी.

( सही ) आरदेसर बेजनजी
लिक्विडेटर

---

### वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध ६ शके १८१३

---

मेघमंडळचा किल्ला दारूगोळ्यानें सर करण्याची युक्ति मद्रास इलाख्यांतील कुडाप्याचे कलेक्टरांनीं प्रथम लढवून पाहिली आणि त्या प्रयत्नांत यश आल्या वरून हल्लीं हिंदुस्थान सरकारनें ही कृत्रिम पर्जन्यवृष्टि विजापूर जिल्ह्यांत पाडण्यासाठीं दोन हजार रुपये खर्ची घालण्याचे योजिलें आहे. अमेरिकेंतील न्यूयार्क शहरीं ही युक्ति आरंभीं फलद्रुप झाली आणि तिचा किस्सा या देशांत उचलला असें आह्मीं एका अंकीं लिहिलें आहे. मागें अमेरिकन व फ्रान्को–रशियन लढाया झाल्या त्या समयीं उभयपक्षीं गोळीबारांच्या चकमकी घडल्या नंतर कांहीं वटकांनीं चांगला पाऊस पडला या गोष्टीं वरून पाऊस पडण्याच्या कारणा विषयीं अनुमान शोधक गृहस्थांनीं बांधलें होतें. आणि आशा शोधक गृहस्थांच्या कोटींतले कै. जयकृष्ण मुकरजी बाबू हे होते. व्हाइसरायच्या कायदे कौंसिलांत हल्लीं राजा पियरी मोहन मुकरजी ह्मणून प्रसिद्ध सभासद आहेत त्यांचे हे गृहस्थ तीर्थरूप होत. त्यांनीं सन १८७३ सालीं बंगाल्या कडील अनावृष्टी टाळण्यासाठीं हिंदुस्थान सरकारास विनंती केली होती कीं मेघडम्बरास सरबत्ते देण्याची सामुग्री व परवानगी सरकारांतून मिळावी. त्या सूचनेस तेव्हां योग्य मान मिळाला नाहीं तरी आनंदाची गोष्ट एवढीच कीं पर्जन्य पाडण्याची ही नवी युक्ति निव्वळ काहीं अमेरिकेंतली नाहीं. आमच्या लोकांस देखील ही किमिया सावली असती परंतु या देशांत नेटिवांच्या बुद्धिवैभवाचें प्रोत्साहन करून त्यांचा गौरव करणारा प्राणी विरळा! ! !

विजापुरा प्रमाणें निजाम सरकारनें आपल्या संस्थानांत ही पाऊस पाडण्या विषयीं कांहीं हजार रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. विजापूरचा प्रयत्न निष्फळ झाला. हैद्राबादची काय व्यवस्था होतें पहूं वें. आतां निराळा शोध असा निघाला आहे कीं, वरील कृत्रिम पाऊस पाडण्या पूर्वीं आकाश थोडे बहुत ढगांनीं भरलेलें पाहिजे आणि जर आकाश निरभ्र स्वच्छ असेल तर वरील दारूगोळ्याच्या युक्तीचा कांहीं फायदा होत नाहीं. दुष्काळानें आपलें प्रचंड स्वरूप दाखविण्यास आरंभ केला आहे तेव्हां आतां ईश्वर काय करील तें खरें. मनुष्यानें पंचमहाभूतें ही आपलीशीं केलीं तरी देखील तीं प्रभूच्या कृपेशिवाय व्यर्थ होत असें कोण ह्मणणार नाहीं!

---

मुलुख अमानी हैदराबादच्या सन १८९०—९१ तील स्टांप-रिपोर्टीवरून कळतें कीं गतवर्षीं एकंदरीनें स्टांप विक्रीचें उत्पन्न ७,६५,७८१ रुपये १२आणे झालें त्यांतून निव्वळ उत्पन्न काढण्यासाठीं सर्व खर्च वजा केला पाहिजे तो रु० ४९,२४६-१-८ इतका आहे. हें स्टांप खात्याचें उत्पन्न काळीच्या उत्पन्नाच्या अष्टमांशाहून अधिक व नवमांशाहून कमी असें आहे. एवढें भारी उत्पन्न कसें गोळा होतें हें तपासलें ह्मणजे आढळेल कीं, हा सर्व पैसा रयतेच्या उदरनिर्वाहाच्या साधन बाहुल्यामधून द्यावा लागत असतो. जसजसें लोक कायद्याचा व सरकारी न्याय कोडतांचा उपयोग वृद्धिंगत करीत आहेत, तसतसे ते आपल्या पायावर दगड अधिकाधिक जोरानें टाकून घेत आहेत. कोर्टाची पायरी चढल्या पासून व्यक्तिविशेषाचा फायदा होत असेल परंतु तशा कृतीनें आपण आपल्याच लोकांस निर्धन करून सरकारचा खजिना व वकिलांची थैली भरित आहों हें अद्याप कळून येत नाहीं, किंवा तसें कळून आलें तरी उमज पडत नाहीं. यावरून आपलें दुर्दैवच आपल्या कल्याणाच्या मार्गीं आड येत आहे असें आह्मांस खात्रीनें वाटतें. कज्जेकजावती आपापसांत व्हाव्यात आणि त्या सरकारनें मिटवाव्या हा हल्लीं राजमार्ग झाला आहे. न्यायासाठीं लोकांनीं आपली धनदौलत कितपत खर्चीं घालावी किंवा किती खर्ची नंतर अन्यायही सोसून निमूट बसणें शहाणपणाचे आहे या गोष्टि शिकण्याच्या कांहीं निराळ्या शाळा नाहींत. त्या अनुभवानेंच कळल्या पाहिजेत किंवा आज तागाईतच्या आपल्या अपकर्षाच्या इतिहासावरून सुबोध होण्या सारख्या आहेत हा मोठा गूढ प्रश्न आहे. प्रत्यक्ष अनुभव ज्या कांहीं जणास येऊन चुकला आहे त्यांस कालचक्राचा व सरकारी न्याय कोर्टाच्या अवाढव्य खर्चाचा फेरा इतका भोंवला असतो कीं ते स्वतः सुधारणेच्या पलीकडे निघून जातात. पुढच्यास ठेंच मागचा शहाणा असें आपण अनेक वेळां ह्मणतों परंतु अनुभवावर पाणी सोडून ठेंच कळणारी मंडळीच फार मोठी आहे. स्टांप रिपोर्ट किंवा रजिस्ट्रेशन रिपोर्ट यांतील माहिती देण्यांत आमचा इरादा एवढाच असतो कीं त्या बाबतींत आपला पैसा आपल्या व आपल्या आप्त मित्रांच्या उपयोगीं न पडतां लोक कसा अगदीं बेतालपणानें व भांडणतंट्याच्या आवेशांतील वेडगळपणानें विनाकारण खर्च करित असतात याची नीट अटकळ रयतेस करून द्यावी.

स्टांप खात्याची किंवा रजिस्ट्रेशन खात्याची भरभराटी होत जाईल तसतसें आह्मांस वाटतें कीं, लोक वादी प्रतिवादी होऊन कज्जे फार करितात व व्यर्थ बेसुमार पैसा उधळतात. प्रस्तुतच्या काळाला शहाणपणा हा पाहिजे, कीं, होईल तितके करून सरकारच्या कोर्टाची पायरीच चढणें नाहीं. वऱ्हाडांत वतनदार व रयतवारी प्रमाणें जमीनदार लोक पुष्कळ आहेत आणि स्थावरजंगम जिनगीचे खटले फार करून त्याच्याच मध्यें घडले पाहिजेत. तंटाबखेडा उद्भवला कीं आकाबाई आठवलीच असें मानणें वस्तु स्थितीवरून भाग होतें. आणि हा दुर्निवार धननाश ह्मणजे लोकांची भावी निर्धनता ही अंशतः तरी नाहींशी व्हावी ह्मणून आह्मीं गेल्या मार्चाच्या सुमारास वऱ्हाडांतील वतनदार सभेचें कर्तव्य दाखवितांना कडक लेख लिहिला तरी त्या सभेचें चळवळ व्हावें तसें होत नाहीं आणि त्यामुळें सरकारच्या कोर्टाशिवाय आपसांतील खटले निवडण्याचा मार्ग दुसरा कांहीं खुल दिसत नाहीं.

---

साताऱ्या कडील इसलामपूर गांवीं एक राष्ट्रीय सभे संबधानें आनंदाची गोष्ट घडून आली कीं पांच हजारावर शेतकरी लोक सभेस येऊन त्यांनीं राष्ट्रीय सभेस आपले मुखत्यार निवडण्याच्या कामांत पुढाकार केला. राष्ट्रीयसभेचें काम इंग्रजींत चालतें तरी तेथील गोष्टी नाना द्वारांनीं लोकांस पुर्ण पणें कळतात हें ही वरील हकीकती वरून सिद्ध होतें.

---

मि. ए. ओ. ह्यूम यांनीं एक पत्र लिहिलें आहे त्यांत ते असें ह्मणतात कीं राष्ट्रीय सभेच्या बैठकी हिंदुस्थानांत यापुढें भरविण्या पुर्वीं विलायतेची मोहिम पहिल्यानें फत्ते केली पाहिजे. पुढील सालीं पार्लमेंटांतील सभासदांची नवी निवडा निवड झाली तर इंग्लंडची बैठक १८९३त होईल; आणि ही निवडा निवड कान्सरव्हेर्टीव्ह मुत्सद्दी मंडळीनें युक्तीयुक्तीनें दिरंगाईवर लोटली तर पार्लमेंटच्या कायद्या प्रमाणें सन १८९३ त तरी नवी निवडणूक झालीच पाहिजे आणि तेव्हां इंग्लंडची बैठक १८९४ त राष्ट्रीय सभेस भरवावी लागेल. हिंदुस्थानांत अधीक बैठकी भरवून दरसाल दीडलाखांचा खर्च करण्याचे सध्यां प्रयोजन नाहीं. राष्ट्रीय सभेनें आज सात वर्षांच्या मुदतींत आपली कामगिरी उत्तम बजाविली आहे आणि तिनें आरंभलेल्या उद्योगाची फलद्रुपता होण्यास विलायतची सफर अगोदर केली पाहिजे. राष्ट्रीय सभेचा दुंदुभिध्वनि लोक श्रवण करिताच देशसेवेत हजर होण्यास एका पायावर तयार असतात. ह्यूम साहेबांनीं आपल्या लोकांस हें बाळकडू उत्तम पाजिलें आणि त्यांच्याच प्रसादानें आपण राजकीय गोष्टींत इतकें पुढें सरसावलों आहे कीं येट पार्लमेंटच्या दिल्लीदरवाज्यापर्यंत आपली मजल येऊन पोंचली आहे.

येत्या नागपूरच्या समारंभासाठीं ह्यूम साहेबांनीं हिंदुस्थानच्या लोकांस आग्रह पूर्वक आमंत्रण केलें आहे. त्यांच्या शक्ति माना प्रमाणें त्यांस काँग्रेसच्या सेक्रेटरीचें कामासाठीं दरसाल हिंदुस्थानात येववत नाहीं. ते यापुढें विलायतेसच आपल्या कामाचा रोंख ठेवणार आहेत आणि हिंदुस्थानांतल्या उद्योगाचें जूं दुसऱ्याच्या मानेवर देणार आहेत. राष्ट्रीय सभेच्या येत्या बैठकींस सर्वजणांची इंडियांतील शेवटची भेट घ्यावी असा त्यांचा मनोदय आहे. नागपूरची बैठक एकदोन वर्षांपुरती निदान अखेरची आहे आणि तिच्या ठरावा बरहुकूम विलायतेस कामें होणार आहेत ह्मणून सर्व राष्टांतले लोक एके स्थळीं जमतील तितके पाहिजे आहेत आणि त्यासाठीं मागे नियमित केलेली सभासदांची संख्या वाढविण्यांत आली आहे. वरील तीन चार कारणा वरून सर्व लोकांस आम्ही विनय पूर्वक कळवितो कीं त्यानीं मि. ए ओ. ह्यूम साहेबास अखेरचा मुजरा करण्या साठीं अवश्य हजर असावें व विलायतचा प्रोग्राम एकविचारें कायमचा ठरवावा.

---

नागपुरच्या समारंभास निराळें महत्व १८९३ सालच्या विलायतेस राष्टीय सभा भरविण्यासाठीं होणाऱ्या विचारा संबंधानें आलें आहे. विलायतच्या सभेविषयीचा ठराव सर्व राष्ट्रांतील लोकांच्या एक दिलानें पूर्णतेस गेला पाहिजे तेव्हां त्या सभेस जेवढे प्रतिनिधी येतील तितके पाहिजे आहेत. नागपूर शहर मध्यस्थानीं असल्यामुळें व रेलवेनें इतर सोयी असल्यामुळें जनसमूह मोठाच जमेल अशी खातरी आहे. प्रेक्षक मंडळीही पुष्कळ आल्यानें राष्ट्रीय सभेच्या गोष्टी सर्वांस अधिकाधिक कळतील आणि त्या साठीं ज्याला जसें सावेल तसें त्यानें अगत्य येण्यास अनमान करूं नये असें आह्मीं वेगळें सूचविणें नको.

---

आस्ट्रिया देशांत श्रीमान तरूण लोकांची एक मंडळी निघाली आहे. तिच्या प्रत्येक सभासदानें अशीं शपथ घेतली आहे कीं मी एका गरीब कुमारिकेशी लग्न लावीन. आणि ही शपथ त्यानें मोडली तर त्याबद्दल सुमारें ५००० रुपये दंड त्याला द्यावा लागतो. एखाद्या दरिद्री वधूवरांच्या गृहस्थाश्रमाच्या सुखाभिवृद्धीसाठीं तो दंड खर्चीं घालण्याचा मंडळीचा संकल्प आहे. स्वयंवराची रूढी त्या देशांत आहे तेव्हां ही युक्ती फार नामी आहे. लग्नकार्यांतील हुंड्यांची व मानपानांची घातुक चाल बंद होण्या साठीं आपल्या देशांतील श्रीमान घरंदाज आईबापांनीं एक निराळी मंडळी काढून प्रत्येकानें आपापल्या मुलाचें लग्न गरीबींतल्या मुलीशीं करण्याची शपथ घ्यावी आणि तसें हातून न घडलें तर दंडाची रक्कम मंडळीपुढें हजर करावी. सुधारणेचें बीज दृढनिश्चयांत असेंत तसें आत्मश्लाघावर नसतें.

---

महामहोपाध्याय महेशचंद्र न्यायरत्न सी. आय. इ. यांस ओरिआंटल कांग्रेसच्या नवव्या समारंभाचे अध्यक्ष डाक्टर लिटनर यांजकडून एक बहुमानाचें पत्र आलें असून हंगारी कडील वर्तमानपत्रांतून त्यांच्या न्यायशास्त्र पारंगततें विषयीं मोठे स्तुतिपर लेख आहेत. न्यायशास्त्रावरील त्यांच्या शोधक बुद्धीच्या व गहन विचाराच्या पुस्तकांच्या पांचशें प्रतीची तिकडे मागणी ही झाली आहे.

---

कलकत्यास स्काच लोकांच्या सेंट आंन्ड्रयूच्या पुण्यतीथीच्या उत्सवाच्या समयीं खुद्द व्हाइसराय साहेब हजर होते. त्या वेळीं त्यांनीं आपल्या संभाषणांत स्काच लोकांविषयीं फार प्रशंसा केली. जसें ब्राह्मण दि ज्ञाती संबधानें बोलतांना कोकणस्थ ब्राह्मणांची तारीफ व वाहवा करण्याची चाल आहे त्या प्रमाणेंच इतर सर्व इंग्रज लोकांशीं तुलनेनें स्काच लोकांची गोष्ट आहे. नंतर लार्ड लान्सडाऊन साहेबांनीं—नेटीव संस्थाना संबंधानें आणि त्यांत मुख्यत्वें करून ग्वाल्हेर, भोपाळ, इंदूर व काश्मीर या चार संस्थाना संबंधानें राजकारभार फार सुयंत्र व राजनिष्ट पणानें चालला आहे, हें आनंदानें कबूल करितांना त्या त्या रजवाड्यांच्या थोर पाहुणाचरा बद्दल—त्यांचे आभार मानिले. संतोषाची गोष्ट अशी कीं काश्मीरचे पदभ्रष्ट महाराज पदारूढ होणार असें ठरलें. जुन्या काळची नेटीव राजशाई शिल्लक बाकीत चिरायु व्हावी आणि स्वतंत्रपणें व राजनिष्ठेनें नेटिव राज्यें चालावीं हें इंग्रज सरकारच्या उदार राजनीतीस आवश्यक आहे. वयस्था प्रमाणें वागण्याचा सार्वभौमिनी महाराणी सरकारचा परम मानस आहे. त्यांचें खालसा राज्यच विस्तृत व अफाट असून फार जोखिमीचें आहे, तेव्हां त्यांस नवीन विस्ताराची गरज नाहीं. इंग्रजी खालच्या राज्य पद्धतीच्या सुख बाहुल्यापुढें नेटिव राजसत्ता प्रजाजन पत्करतील किंवा नाहीं हा प्रश्न, आहे असें ही लाट साहेब बोलले. लोक गणती नवीन झाली आहे त्यांतील आंकड्या वरून पाहतां प्रजावृद्धीच्या प्रचंड वाढीवरून इंग्रजांच्या अब्रादानी विषयीं खात्री होते आणि प्रस्तुतच्या अन्नाची टंचाई दूर करण्यासाठीं लोकांनीं कमी कमी वस्तीच्या प्रांतांत वसाहती केल्या पाहिजेत असेंहि कळून येतें. लढाईची चिन्हें दिसत नाहींत तरी हिंदुस्थान देशांतील लढाईचीं सूत्रें चालविणार इंग्लंडांत आहेत. या देशांत इतक्या अद्भुत व नवलाच्या गोष्टी घडतात कीं उद्यां काय होईल याचा नेम नाहीं. एक दुष्काळ पडला किंवा टोळधाड आली कीं लागलींच राज्यकर्त्यांचीं मनोराज्यें विलयास पोंचतात. वसूल जमाबंदी विषयीं निराशा होते आणि ती वेळ राज्यकर्त्यांस मोठी आणिबाणीची वाटते. अशा चमत्काराच्या व आकस्मिक विघ्नामुळें अफूचें उत्पन्न बंद करावें, मिठावरील कर माफ करावा, इनकमट्याक्स उठवावा, तांदुळावरील जकात घेऊं नये इत्यादि लोकोपयोगी गोष्टी अंमलांत आणण्यास सवड सांपडत नाहीं. सध्यां दक्षिण प्रांतांत, मद्रासेकडे, रजपुतान्यांत निजाम सरकारच्या मुलुखांत व ब्रह्मदेशांत दुष्काळ पडतो कीं काय अशी भयंकर दहशत पडली आहे. इतर राष्ट्रापेक्षां आपण बरें आहों एवढ्याच विचारावर मनाचें समाधान मानून घेण्याविषयीं लाट साहेबांनीं बोध केला.

---

[illegible]

'मरणं प्रकृ[illegible]रीरिणाम्' हा इहलोकचा नियम आहे [illegible] त्या अन्वयें भावनग;

रचे परमपूज्य स्वामी गौरीशंकर उदेशंकर हे गेल्या मंगळवारीं समाधिस्थ झाले. चतुर्थाश्रमांत वयाचे ८६ वे वर्षी मरण आलें यांत खरोखर दुःख वाटूं नये, परंतु मनुष्य स्वभावच असा आहे कीं आपली हानि झाली मग ती यथान्याय असली तरी देखील दुखाश्रु डोळ्यांत उभे राहतात. ज्या महापुरुषाच्या देहावर कठिवाड प्रांत आपलें स्वामित्व विरायू मानित होता तो देह पंचातत्वांस जाऊन पोंचला तेव्हां तिकडील लोकांस दुखाचें भरतें येणें साहजिक आहे. थोरले सालरजंग सरखे माधवराव इत्यादि दिवाण बहादुरांच्या कोटींतले सदर्हु स्वामी होऊन गेले. हे आपले वयाचे १७ वे वर्षी पासून भवनगर संस्थानचें दरबारांत शिरलें तेव्हां पासून ७४ वे वर्षा पर्यंत सतत अव्याहतपणें ठाकूर साहेबांची नोकरी बजावीत होते सामान्य दर्ज्या पासून हे दिवाण बहादुरीच्या दर्जा पर्यंत चढले. यांस 'हिंदुस्थानचा तारा' अशी किताबत आहे. बुद्धिमत्ता, पायशुद्ध वर्तन, कर्तबगारी, स्वराजनिष्टा, इत्यादि आंगच्या गुणसमुच्चया मुळें हे उदयास आलें आणि अखेरीस वैभव शिखरास पोंचले ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्या सारखी आहे. यांच्या अलौकिक मुत्सद्दीपणा मुळें भावनगरचें संस्थानाची न्यायमुनसवी इंग्रजांनीं काढून घेतली होती. ती सन १८६६ सालीं त्यास परत देण्यांत आली आणि त्या संस्थाना खालील ११६ गांवें पुन्हां परत देण्यांत आलीं; तेव्हां पासून भावनगरची भरभराटी व उत्कर्ष हीं सर्व लोकांच्या नजरे समोरच आहेत. सन १८७९ साला पासून दिवाण बहादुरांनीं संन्यास ग्रहण केला त्यांत त्यांनीं आपले व्याप सोडून टाकले तरी मरणाची वाट पहात न बसतां ईश्वराराधनेंत व संस्थानच्या कारभारावर दक्षतेनें देखरेख करण्यांत काळ्से. प केला. यांचें चरित्र स्मरणांत ठेवून पुष्कळ गोष्टी शिकण्या सारख्या आहेत ईश्वर यांच्या आत्म्यास उत्तम गति देवो अशी आमची प्रार्थना आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY, DECEMBER 7, 1891

A few suggestions for improvement in the Registration Department H. A. D.

We hear on good authority that Mr. Chintaman Rao is going to revert to his post of Inspector of Registration on account of ill health. This would upset the promotions effected in the staff of the Department. We shall be very sorry to see men revert to their former appointments. There are really speaking no chances of promotion in this Department. As men in other departments and especially in the Revenue get promotions more rapidly, the same is not found in this department and the result is: men in the department are unsatisfied with this state of things. It would be much better to transfer men from one to other departments and thus open up a way for promoting deserved men in the service. During the last three years there has been such a change in the staff of officers in the Revenue line that it must have naturally created a dissatisfaction in the minds of men serving in the Registration Department to find their equals in the other departments rise superior to them both in point of salary and status. There is a way of putting a stop to this continual source of dissatisfaction by the remedy above suggested viz to transfer men from one department to another where it would be possible.

Financially there have been satisfactory results during the last few years. In the report for the year 1889 90 the Commissioner says— the financial results of the three years are thoroughly satisfactory. In each year there is a steady growth of income and a substantial surplus of receipts over expenditure." Again he says "Every sub-registrar's office worked at a profit except the office at Umarkhed, which is being kept up as a probationary office for another year. In the report of the year 1888-89 Mr. Plowden says the financial results are excellent and show a surplus for the year of Rs. 23,224-5-1, in no instance did a subregistrar's office work at a loss. In the report of the year 1890-91 the same officer remarks— "The working of the Department from a financial point of view continues to be satisfactory. The surplus of receipts over expenditure for the year under report amounted to Rs. 28,256-13 6. The office at Umarkhed still works at a loss, but the deficit was only Rs. 22-5-0 against Rs. 109-1-1 in the preceding year." Would it not be reasonable to infer from all what has been quoted that the Department in a very gaeat measure owes its prosperity to the honest work of the several subregistrars. If so, it is but reasonable to say that they ought to have received some reward for this work. Salaries of some officers ought to be increased. Then only it is possible to get able men in the Department. There is not a single sub-Registrar drawing Rs. 100 per month.

In all the reports above referred to the Commissioner complains that the work of inspecting offices has not been adequate. It is not necessary to go far to find out the reason of this inadequate inspection. There is only one special officer viz the Inspector to do this work. His work has always been commendable. But he cannot be, and as a matter of fact is not expected to inspect thoroughly all the offices in the Province. The work, therefore, of inspection falls on District officers who have to attend to Judicial work both Civil and Criminal and Revenue work in addition. In the Amraoti District the Small Cause Court Judge had the duties entrusted to him both of the District Registrar as well as of inspecting offices in the District. The result is that that inspection has not been adequate. The sub-registrar has many temptations before him and it is therefore necessary that he should always have the fear of his office being inspected at any time during the course of the year. The work of inspection cannot be satisfactorily done unless we have Inspector of Registration for each of the Districts in the Province. A sum of Rs. 5000 in addition to the present expenditure if set apart for inspection work would remove all complaints in respect of inadequacy of inspection work. At any rate if we cannot have 6 Inspectors, the Department must have at least 3 officers appointed simply and solely to inspect as often as they can all the Registration offices in the Province. The District Registrars who have other duties to perform may as well be exempted from this additional duty.

Mr. Chintaman Rao Apte had applied once for the post of an Extra Assistant Commissioner, and it was hoped by the Inspector General that he would be successful in his application. But it appears nothing has been done of the application as well as of the recommendation of the Inspector General. We hope Mr. Apte will be promoted to the post of Extra Assistant Commissioner and the present dissatisfaction amongst the sub-Registrars will be stopped.

In the neighbouring provinces some commission is given to deserving subregistrars for those who turn out excellent and honest work. The same system may be introduced here.

A reduction in the scale of fees for registering documents will be an inducement to people to make use of registration as much as possible On this subject sevral District Registrars may be consulted and in accordance with their opinions the reduction may be effected.

---

Following in the wake of his predecessor the present Viceroy found an occasion at the St. Aedrews' Dinner at Calcutta to deliver an epochmaking speech. His speech lacking in the oratorical flourishes of Lord Dufferin and not taking a retrospective view of his career of these long years, was however pregnant with thoughts of the problems that involve him all around. It is gratifying to note that His Excellency spoke well in favour of the loyalty and hospitality of the Natice States of Gwalior, Bhopal, Indur, and Kashmir. There is also the welcome surprise that the Maharaja of Kashmir is to occupy once more his dignitary throne. Lord Lansdowne enunciated the policy of non-interference in the 'interesting remains of indigenous rule'. After dealing with the striking revelations of the last census he further proceeded thus:—

"As to the spectre of war we may, I hope, say confidently that there is but little prospect of strife within our own borders. Not only is the surface smooth, but the great mass of the people are probably convinced that their prosperity is closely bound up with the peace which we have been able to secure for them, and that they will be the greatest losers if that peace should be disturbed. We are all of us fond of dwelling upon the necessity of decentralising our administration and considering all the circumstances of India. I doubt whether there is any form of decentralisation more useful than that which leaves the domestic affairs of a large portion of the country to the management of its own people. But I must not forget that I am replying not only for the toast of my own health, but for that of the land we live in. Most of us will probably be content to accept the description which the Chairman gave of it when he told us that it was not a bad place on the whole, and it certainly looks very pleasant to me this evening, but I think he hit the mark when he pointed out to us that its principal imperfection lay in the fact that it was above all things a land of great and sudden vicissitudes, a land in which we can never tell to-day what tomorrow has in store for us from the poor Ryot who sees his scanty crop swept off the face of the earth in a few hours by a swarm of the locusts to the Financial member of council who sees his hopes of a surplus suddenly wrecked by agencies over which he has no control. We are all of us liable to see our cloud-built castles and our golden dreams shattered and dissipated by visitations as unlooked-for as they are overwhelming."

The opium revenue cannot be abandoned in pursuance of the views of ultra reformers. With this declaration the Viceroy gave a bird's eye view of the situation which India occupies in consequences of the circumstances over which the ruling autocrats has but partial control. The description runs as follows:—

"However fair the prospect may be, India never ceases to be conscious that the gaunt spectres of war, want, and insolvency are hovering in the distance and ready to swoop down upon us. At any moment their unwelcome presence is one of the conditions under which we exist and we must not regard it in a querolous or despondent spirit. We may find some crumbs of comfort in the reflection that it would not be difficult to point to other countries in which the prospects of peace are more precarious and the consequences of famine even more terrible than they are in India."

---

## वऱ्हाड.

अकोटचे फर्स्ट असि० मास्तर रा. रा. गंगाराम आत्माराम सत्र नवीस यांनीं दहा महिन्यांची रजा घेतली आहे आणि त्या रजेंत ४० रुपये पगाराच्या बढतीवर येथील इंग्रजी मराठी शाळेंतून रा. रा. महादेव काशिनाथ ओक यांस पाठविलें आहे.

येथील ट्रेनिग कालेजांतील शेवटल्या परिक्षेंत यंदा १५ उमेदवार पसार होऊन मास्तरकीच्या कामास लायक झाले आहेत.

आम्हांस कळविण्यास संतोष वाटतो कीं येथील माजी असि. कमिशनर मौलवी निजामुद्दीन बी ए. बी. एल यांस अजमीरास सेशन जज्जाचे कामावर नेमण्यांत आलें आहे. रजपुतान्यांतील मुसलमान मंडळींत हेच एवढ्या मोठ्या हुद्यावर चढले आहेत म्हणून त्यांचें आम्हीं अभिनंदन करितों.

मि. गाडविन आस्टिन यांनीं मि. निकोलेट साहेबां पासून त्यांचे डेपुटी कमिशनरचे कामाचा चार्ज घेऊन त्यांस गेल्या गुरुवारीं मोकळें केलें. मि निकोलेट साहेब उमरावतीस सेशन जज्याच्या कामीं रुजूं झाले. या नेमणुका सध्यां दोनतीन महिन्या पूरत्या आहेत म्हणून आम्हीं कांहीं विशेष लिहीत नाहीं.

राष्ट्रीय सभेच्या कामांत वाशिमास जिल्हा मागसलेला होता तिकडे रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी व रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांना परवां शनिवारीं वाशिमावर कूच करून तिकडील लोकांमध्यें वर्गणी गोळा करण्यास सुरुवात केली.

परवां शनिवारीं येथील जंगी इस्टेटवाले शेटजी गंगाधर जोरावरमल यांस देवाज्ञा झाली. यांच्या मरणानें अकोल्यांतील एक मोठा व्यापारी व सार्वजनिक मनुष्य नाहींसा झाला ही दुःखाची गोष्ट होय.

---

नोटीशीचें उत्तर

रा. दुर्गादास सदाराम कनोजे ब्राह्मण राहणार सिरसव ता० मुर्तिजापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविलें जातें कीं, तुमची तारीख २३—११—९१ ची शुद्धवऱ्हाडी पत्रांतील नोटिस पावली. त्यांचें उत्तर असें कीं, मारुतीअप्पाजी यांचे कुल्यांनीं आणि तुमचे नोटीशीनीं अकोलें येथील घरावर आमचा जो हक्क आहे तो नाहींसा होत नाहीं.व सदरहू मारुती अप्पाजी यांस तुमचे कांहीं एक देणें नाहीं. उलट तुम्हां कडूनच येणें आहे. निकारणांक खोटी नोटिस दिली व उत्तर देणें भाग पाडलें याचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ५-१२-९१ इ०

(सही)
भगवान आपाजी सराफ राहणार अकोलें द० खु०

---

## वर्तमानसार.

हिऱ्याच्या प्रकरणांत मि. जेकब साहेबांच्या वकीलानें निजाम सरकारचे दिवाण सर असमानजहा यांजवर साक्षी समन्स मागितले होते परंतु हायकोर्टानें दिवाण साहेब आपल्या ताब्यांतील प्रजा नाहींत ह्मणून ती मागणी नामंजूर केली.

जर्मनी व फ्रान्स यांमध्यें इन्फ्लुएंझाच्या सांथीनें लोक फार आजारी झाले आहेत कांहीं शाळा तर बंद आहेत.

पेकिनवर हल्ला करण्याकरितां कांहीं बंडवाल्यांची फौज चालली आहे असें समजतें.

कर्नूळ येथें धान्यासंबंधी दंगा होऊन कांहीं लोकांनीं दाणे लुटले. पोलिसचा कांहीं टिकाव लागला नाहीं असें समजतें.

सु० प०

कलकत्ता भा० मि० कळवितात कीं मि० डगलस साहेबांची मडम एका मुसलमानानें काढून नेऊन मुसलमान बनवून निका लावला.

तीन गोष्टी कराव्या—चांगला विचार, चांगलें कृत्य आणि खरें पण गोड भाषण.

तीन गोष्टी स्वाधीन ठेवाव्या—आपला राग, आपली जीभ व आपली इच्छा.

तीन गोष्टी अंगी असाव्या—शहाणपणा, चांगुलपणा, आणखी सहनशीलपणा.

तीन गोष्टीवर भक्ति असावीः—धैर्य, शांति, आणि परोपकार.

तीन गोष्टीसाठीं भांडावें:—आपली अब्रु, आपला देश व आपले मित्र.

तीन गोष्टीचा तिरस्कार करावाः—निर्दयपणा, गर्विष्टपणा, आणखी कृतघ्नपणा.

तीन गोष्टी शिकाव्याः—सत्यनिष्टा, उद्योगी पणा आणि समाधानीपणा.

तीन गोष्टीविषयीं मर्मज्ञता व रसिकता असावीः—ज्ञान, मान व शोभा.

तीन गोष्टी अवडाव्या निर्मळ मन, भलेपणा व आनंदी स्वभाव.

तीन गोष्टींनीं आनंद व्हावाः—मनाचा मोकळेपणा, स्वतंत्रपणा आणि सौंदर्य.

तीन गोष्टी टाकाव्याः—कुरटेपणा, रिकामी बडबड आणि वेडी— वाकडी थट्टा.

तीन गोष्टीची इच्छा धरावीः—आरोग्य, चांगले मित्र व संतुष्ट वृत्ति.

तीन गोष्टी जोडाव्या—चांगली पुस्तकें चांगली संगत आणि चांगला स्वभाव.

क.रम०

ब्रह्म देशाचा पदभ्रष्ट केलेला थिबा राजा यांस रत्नागिरी येथें ठेविलें आहे. त्या जवळील कांहीं हिरे व माणिक मुंबई येथें जॉन महमद नांवाच्या मेमनास रत्नागिरी येथील अलीखान अहमदखान यानें आणून दिल्यामुळें गुप्त पोलीसाचे मुख्य अधिकारी सरदार मीर अब्दूलअली खानबहादुर व रावसाहेब मि. मुरारराव यांनीं चौकशी चालविली आहे. सदरहुच्या मेमनास हल्लीं १० हजार रुपयाच्या जामिनीवर सोडला आहे. ह्या हिरे व माणकांची किंमत सव्वा दोन लक्ष रुपयांची आहे असें ह्मणतात.

विलायतेंत जी नुकतीच कायद्याच्या अभ्यासाची परीक्षा झाली तींत हिंदुस्थानापैकीं जे विद्यार्थी पास झाले त्यांत सरदार मीर अब्दूलअली खान बहादूर यांचे चिरंजीव मीर औनअली हे पास झाल्याचें आनंदकारक वर्तमान आलें आहे. मीर औनअली हे बुद्धीनें फार तीव्र आहेत. तेणेंकरून ते आपला अभ्यास लवकरच पुरा करून परत येतील.

स

ब्राह्मी० बं०

बंड काबूलचे अमीर अब्दुल रहिमानखान यांच्या विरुद्ध श्रांघल देशांतल्या लोकांनीं बंड केलें आहे. अशी काबूल कडून बातमी आली आहे.

पाऊस पाडण्याचे प्रयोग वरच्या ब्रह्म देशांत करून पाहण्याचा सरकारचा विचार आहे.

मुंबईच्या प्रसिद्ध पेटिट घराण्यांतले मि. नसरवानजी माणकजी हे मागच्या शनवारीं मरण पावले. हा मेलेला गृहस्थ बारोनेट पेटिट यांचा धाकटा भाऊ होता व याच्या मरणाबद्दल त्याच्या वडील भावानें २,३४००० रुपये धर्मार्थ कामाकडे लावण्यास काढले आहेत.

लार्ड सभेंत कमतर करणें ह्मणजे कामनसभेस अशक्त करणें व लार्ड बंद करणें ह्मणजे राज्यांत उलटापालट होणे आहे व इंग्लंडचें वर्चस्व वसाहतीवर अवलंबून आहे व ऐर्लंड संभाळतां येणार नाहीं तर दूरच्या वसाहतीचें रक्षण करण्याचे सामर्थ्य इंग्लंडास नाहीं असें होईल असें सालीसबरी साहेब ह्मणतात.

दुष्काळातले लोक इंदुरास जास्त जमूं लागले आहेत व अजमिराकडील गुरांस चारा इतका दुर्भिळ झाला आहे कीं बैल दोन दोन रुपयांस विकत आहेत.

काश्मीरच्या राज्यांत १००० रुपये दरमहावर एक गोरा आकौंटंटजनरल नेमण्यांत येत आहे.

निझामाचा बड्या हिऱ्याचा खटला कलकत्यास स्पेशलजूरी पुढें चालणार.

चिनांतला दंगा बराच जास्त दिसतो. ता २६ ची तार सांगते कीं, पेकिनच्या उत्तरे कडील मांगोलिया प्रांतांतले लोक उठले असून त्यांत पायदळ व घोडेस्वारही आहेत व ते पेकिनवर चाल करण्याच्या बेतांत आहेत. सरकारची फौज त्या दंगेखोरावर रवाना झाली आहे.

चीनच्या राज्यांतील किंगची प्रांतांतल्या एकून एक युरोपियनांची कत्तल झाली असें विलायतच्या एका पत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

मणीपूर येथें ताप व देवी यांची साथ आली आहे.

मणीपूरचा राजा व दुसरे कैदी यांस काळ्या पाण्यावर नेऊं लागले तेव्हां त्यांणी कित्येक वेळ पुनः पुनः असें गंगेचें चुंबन केलें व आपल्या जन्मभूमीचेंही चुंबन केलें ! ! असें सांगतात.

फ्रेंच सरकार आपली लढाऊ जहाजे वाढवीत आहे.

गेल्या महिन्यांत इंग्लंडांत जितका पाऊस पडला तितका गेल्या ७८ वर्षांत फक्त सहा वेळच पडला होता. या पावसानें मिळकतीचें व माणसांचें पुष्कळ नुकसान झालें असून अजून १,००,००० एक लाख एकर जमीन पाण्यांत बुडालेली आहे असें सांगतात.

फ्रान्स व जर्मनी यांत एनफ्लुएन्झा (पडशाचा) ताप फार झाल्यामुळें कित्येक शाळा अगदीं बंद पडल्या आहेत.

विजापुरास पाऊस पाडण्याचा चाललेला प्रयोग फुकट गेला व महागाई झपाट्यानें वाढत आहे. गुरें मरत असून चारा नसल्यामुळें लोक गुरांस सोडून देत आहेत. नगर जिल्ह्यांतले लोकही घाबरत चालले आहेत, सरकारनें एव्हांपासूनच सावध राहावें हें अवश्य आहे. धारवाडास जोंधळे सहा शेर झाले. "स्वराज्य असतें तर लोक राजाजवळ धरणें धरून बसले असते" असें धारवाडचें पत्र ह्मणूं लागलें आहे.

तोफांचे वगैरे अवाज करून पाऊस पाडण्याचा एक प्रकारचा व्यापार होऊं पहात आहे असें अमेरिकेंतल्या पुढील बातमीवरून होतें. मि. फ्रांक मेलबोर्न नांवाच्या एका माणसानें नार्थ वेस्टर्न कान्सास नावाच्या प्रांतांत येत्या वर्षांच्या जून, जुलई व आगष्ट या तीन महिन्यांत शेतकीस भरपूर होईल इतका पाऊस पाडून देण्याचे सरकारांशीं कंत्राट केलें आहे व त्या बद्दल दर एकरास १० सेंट प्रमाणें घेण्याचे कबूल केलें आहे. हा करार लेखी झाला आहे व त्या करतां आमच्या व्यापारांत याच्या योगानें अडथळा येईल असें समजून इरिगेशन कंपन्या कोर्टांत जाण्यास ही तयार झाल्या आहेत असें सांगतात! या कृतीनें पाऊस पडतोंच असें अजून ठरलें हो नाहीं तोंच त्या बद्दल करार होऊन दिवाणी कोर्टें पाहाण्याची पाळी येणें ह्मणजे मोठेंच चमत्कारीक आहे.

ठा० अ०

## जाहिरात.

मुलुक अमानी हैद्राबाद यांतील अबकारी (दारू, ताडी, अफू व गांजा) विक्रीच्या तारखा सन १८९२–९३ साला करितां खालीं लिहिल्या प्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत.—

प्रत्येक हरास दिपुटी कमिशनर साहेबांचे कोर्टांत १२ वाजतां होईल.

उमरावती....सोमवार. तारीख १८ जानुआरी सन १८९२.

एलिचपूर ...सोमवार. तारीख २५ जानुआरी सन १८९२

आकोला......सोमवार. तारीख १ फेब्रुवारी सन १८९२

बुलडाणा. ...सोमवार. तारीख ८ फेब्रुवारी सन १८९२.

वणी(यवतमाळ) सोमवार तारीख १५ फेब्रुवारी सन १८९२

वाशीम......सोमवार तारीख २२ फेब्रुवारी सन १८९२

मक्त्याच्या व हरासांच्या शर्तींचे संबंधाची माहिती जिल्ह्याचे आफिसांत मिळूं शकेल.

के. जे. एल्. मेकंजी.
कमिशनर.
मु. अ. हैद्राबाद.

## लिलावानें विक्री

मेहरजी जानस्टन
आणि कंपनी नंबर४
फार्बिसआणि मेडोज
स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

अकोला येथील कोर्टानें वेतलेला मौल्यवान जमीन जुमला आणि त्या ठिकाणीं उभारलेली तेलाची गिरणी आणि कापूस वठण्याची (जिनिंग) फॅक्टरी ह्यांची विक्री.

मेसर्स मेहरजी जान्स्टन आणि कंपनी लिलाव करणार ह्याज कडून ह्या लेखा अन्वयें जाहीर केलें जातें कीं, त्यांच्या लिलांव आफिसा मध्यें सार्वजनिक लिलावानें ९ दिसेंबर सन १८९१ बुधवार रोजीं दिवसा ४॥ वाजतां अकोला म्यानिफ्याक्चरिंग कंपनी लिमिटेड इच्या कर्जाची व्यवस्था लावणारे (लिक्किडेटर) मे० अर्देसर बेजानजी ह्यांच्या हुकुमा अन्वयें ज्या जिनगीची विक्री करण्यांत येईल ती येणे प्रमाणेः—

१:— वरील कंपनीनें आपला कारखाना बंद पडल्या मुळें सर्व मालमत्ता आपखुषीनें कर्ज फेडीकडे लाविली आहे म्हणून तिचे जमिनीचा सर्व भाग व जागेचा सर्व तुकडा आणि त्या वरील एक लहान, व एक मोठा असे दोन बंगले, इतर सर्व इमले आणि कंपौंडातील बाजूचीं घरें यांज वरील सर्व हक्क, स्वामित्व, व मिळकत वगैरे मिळून सर्व. वरील जमीन जुमला वऱ्हाडांतील अकोले शहरीं आहे व त्याचा विस्तार लांबी रुंदी धरून ६१७८७ चौरस यार्ड अगर या जवळ जवळ इतकेंच यार्ड असून त्याची चतुःसीमा येणें प्रमाणें:—

उत्तरेस—कांहीं भागाला चांदबिबीची जागा व कांहीं भागाला पडीत जागा, दक्षिणेस व दक्षिण बाजूस वखळ जागा, पूर्वेस सार्वजनिक सरकारी बगीच्या कडील असलेली व त्यानें व्यापलेली जागा व पश्चिमेस मोकळी जागा हो नमूद केलेली जागा सन १८८६ च्या सप्टेंबरच्या २७ सावे तारखेच्या कौलपत्र्या प्रमाणें ठरवून दिलेली आहे. आणि कौलपट्टा दस्तुर बेमनजी जामास्पजी सी. आय. इ. आणि बिरार आइल मिल्स कंपनी लिमिटेड या उभयतांमध्यें झाला आहे.

कलम २— ३० हॉर्स पॉवरचा एक डबल फ्ल्युब्वायलर, २५ हॉर्स पावरचें एक इंजिन, पॅटब्रदर्सचे २८ रेचे, ड्यूवुइट पेटंटचे २५ तेलाचे घाणे, एक स्क्रू कातण्याचा चरक, एक स्टीम चेस्ट, एक पाणी तापवण्याचें यंत्र, एक बायलरचा डॉन्की, एक रिचवण्याचें टॅन्क, एक इंग्रजी स्वच्छ करण्याचे मशीन, एक इंग्रजी बीं चुरण्याचें यंत्र, दोन इंग्रजी छिपार्ले, एक चुरळण्याचें व दळण्याचे मिल, एक ग्रायॅन्डींग स्टोन, एकस्क्रू जॅक, एक इंग्रजी ड्रिलिंग मशिन, एक लॉरी वजन करण्याचें मशीन, फर्निचर, कातड्याचे पट्टे, कायर रोप, पुलीज, शॅफ्टींग, स्टीम पाईप्स, स्टीम पम्पस, ब्लॅन्टस, स्टोअर्स, कोळसे, आणि वर निर्दिष्ट केलेल्या जागेंतील सर्व इतर वस्तू आणि इतर नक्याच्या बाबी, आणि तसेंच वरील कंपनीच्या व्यापाराच्या सवलती आणि इतर मिळकती.

या हरासाच्या विशेष माहिती व शर्ती कळण्यासाठीं वर सांगितलेल्या लिक्विडेटरचे अटर्नी मेसर्स वाडीया आणि गांधी चर्च गेट स्ट्रीट फोर्ट घरनंबर १९ यांजकडेस, किंवा फॉरबीज आणि मेडोस्ट्रीट मधील खालीं सही करणाऱ्यांच्या आफीसांमध्यें अर्ज करावा.

मेहरजी जॉनस्टन आणि कंपनी
मुंबई नवंबर १८ सन १८९१.

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१२
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास........................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly..........3 " 8 as
Single copy..............................4as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per lin3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV — AKOLA MONDAY 14 DEC MBER 1891 — NO 48

वर्ष २५ — अकोला सोमवार तारीख १४ माहे दिसेंबर सन १८९१ इ० — अंक ४८


### जाहिरात

( अकोला म्यानुफ्याक्चरिंग कंपनी लिमिटेड हि कर्ज फेडीच्या व्यवस्थेस लावल्या संबंधीं प्रकरणा वरून )

वर लिहिलेल्या कंपनीच्या धनकोंना या जाहिरातीने कळविलें जात आहे कीं त्यांनीं आपली नांवें, पत्ते, आणि त्यांचीं कंपनीवरील कर्जें किंवा इतर हक्क याविषयीं सविस्तर माहिती आणि तसेंच जर कोणी यांचे अटर्नी किंवा वकील असतील तर त्यांचीं नांवें आणि पत्ते अशी दोन्ही गोष्टी सदहू कंपनीचे लिक्विडेटर ( कर्ज फेडीचे व्यवस्थापक ) मि. आर्देसर बेजनजी यांजकडेस मुंबईतील चर्च गेट स्ट्रीट मधील घर नंबर १९ येथें त्यांच्या आफिसांत बुधवार ता० १६ माहे दिसेंबर सन १८९१ इ० रोजीं अगर त्या पूर्वीं लिहून कळवाव्या. आणि सदहू लिक्विडेटर यांजकडून लेखी नोटिसीने विचारणा झाल्यास त्यांनीं अटर्नी मार्फत त्या नोटिसींत नेमलेल्या वेळेवर हजर राहून आपली नमूद केलेली कर्जें अगर इतर हक्क शाबीत करावे या बरहुकुम त्यांच्या हातून घडलें नाहीं तर त्यांचीं कर्जें शाबित होईपर्यंत एखादी कर्जाचा वजावाट केली जाईल तिचा फायदा त्यांना घेतां येणार नाहीं. तारीख २० माहे नोवेंबर सन १८९१ इसवी.

( सही ) आरदेसर बेजनजी
लिक्विडेटर

### नोटीस

अन्याजी वल्लद बेंडुजी वडतकार व सारजी मर्द विठुजी रहाणार यवदे तालुके दर्यापूर या उभयतांस नोटीस देणार—विठुजी वल्लद नारायण काळमेंग राहणार इटकी तालुके दर्यापूर—नोटीशीनें असें कळवितों कीं माझी बायको नामे सारजी इजला तुह्मी माहेरपणा करितां माहालक्षुमीचे सणा करितां आठ दिवसांचे करारानें घेऊन गेला. तिजला नेते वेळीं बरोबर सोन्या चांदीचे वगैरे मिळून जिन्नस रुपये (१२९) व कांहीं रोकड असें घेऊन तिजला घेऊन गेला आज पर्यंत दोन चार वेळां पंचा समक्ष आह्मी तिजला आणण्या करितां आलो परंतु तुह्मी न पाठवितां असें सांगतां कीं, तिचा घरठाव दुसऱ्या बरोबर करून देतो वगैरे गोष्टी बोलतां या सर्व कारणा वरून तुह्मास असें कळवितों कीं, नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत सारजीस दागिन्यासह आणून पावती करावी असें झालें नाहीं तर तिजला ताब्यांत घेण्या बद्दल सरकार रीतीनें काम चालवून ताब्यांत घेतली जाईल. व दागिन्या बदल व तुह्मी हा विनाकारण त्रास दिला याजबद्दल व या नोटीशीच्या खर्चा सुद्धां अखेर निकाल होई पर्यंत जे नुकसान होईल ते सर्व फिर्यादी करून भरून घेतलें जाईल. व ताब्यांत घेण्याचे अगोदर जर कोणाशीं घरठाव केला तर लग्नाचे रुपये ५०० याजबद्दल दावा लावू रुपये घेतले जातील ह्मणून दिली नोटीस तारीख १० माहे दिसेंबर सन १८९१ इ०

( सही )
सहीची निशाणी नांगर विठुजी वल्लद नारायण काळमेंग राहणार इटकी
तालुके दर्यापूर.

### नोटीस

रा० वेंकटलाल भवानीदास दुकान शेगांव यांसः—

नोटीस देणार बसदेव विठ्ठलदास दुकान अकोलें नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी तारीख १७ नोवेंबर सन १८९१ ची नोटीस दिली ती पावली. त्यांत तुह्मी सट्टयाचे सौद्याबद्दल मजकूर लिहिला तो समजला. सद्या बद्दल पूर्वीच तुमचा मुनीम रामू याचे समक्ष बदला केला. तो—गहू दर खंडी ६२।, जवारी ४४।, सरकी ४॥= येणें प्रमाणें तुमचा माल पोते जितका होता तितका बदला केला. असें असून तुह्मी नोटीस दिली हें बरोबर नाहीं. वर लिहिलेल्या भावा प्रमाणें नफा नुकसान करारावर घेतलें जाईल. कळावें तारीख ९–१२–९१ इ०

( सही. )
लखमीचंद जीवराज मुनीम
बसदेव विठ्ठलदास दुकान
अकोलें दस्तुर खुद.


वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध १४ शके १८१३

मध्य अमेरिकेंत निकारागवा नांवाच्या सरोवराजवळ दलदलीच्या भागावर मि. डन्स्टन—सृष्टिशास्त्र वेत्ते—हे आपला कुत्रा बरोबर घेऊन फिरायास निघाले. निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पतींची शास्त्रदृष्ट्या माहिती मिळवून तिचा उपयोग लोकांस करून देणें हा त्यांचा उद्देश. या निमित्त वर सांगितलेल्या ठिकाणीं अनेक वनस्पती पहात हिंडतांना एकदम त्यांनीं आपल्या कुत्र्याचें ओरडणें ऐकलें. तें ओरडणें कुत्र्यास इजा झाली असतां ज्या प्रकारचें असतें त्या प्रकारचें होतें. तें ऐकतांच कुत्र्याकडे मि. डन्स्टन गेले. तेव्हां त्यांस आढळून आलें कीं लव्हाळ्या सारख्या बारीक पर्णहीन एका वनस्पतीच्या फांद्यांच्या अवघड जाळ्यांत कुत्रा सांपडून त्याचें सव रक्त व मांस शोषून गेलें. मि डन्स्टन त्या ठिकाणीं जाई तोंपर्यंत कुत्र्याचें रक्त व मांस शोषून जाऊन तो अगदीं मरावयास टेकला होता. करितां मि. डन्स्टन लागलीच आपल्या कुत्र्यास मोकळें करण्या साठीं पुढें सरसावले. व त्या वनस्पतीच्या फांद्या चाकूनें कापूं लागले इतक्यांत त्या सर्व फांद्या या डन्स्टन साहेबांच्या हातास वेष्टन घालून रक्त व मांस शोषूं लागल्या. पण मोठ्या हिमतीनें त्या सर्वांस यांनीं कापून आपली सुटका करून घेतली. ह्या मांसाहारी वनस्पतीस तेथील रहिवाशी 'राक्षसी' किंवा मनुष्यास खाणारी वनस्पती ह्मणतात. जगांत काय काय अद्भुत चमत्कार असतील याचा कोणी अंदाज करावा ! ! !

मागल्या दोन तीन वर्षांच्या मानानें पाहिलें असतां चालूं वर्षीचें स्टांपाचें उत्पन्न कमी आहे तरी गेल्या सात आठ वर्षांशीं ताडून पाहतां तें फार वाढलें आहे असें कळून येईल. स्टांपाची विक्री दोन प्रकारची आहे. सन १८७५ च्या इंडियन स्टांप अक्टाप्रमाणें सर्व साधारण स्टांप उपयोगांत आणावें लागतात व कोठें कांनिमित्त निराळे स्टांप कागद लावावे लागतात. या दोन्ही प्रकारच्या स्टांपांची विक्री या वर्षीं कमी आहे. सर्व साधारण स्टांपाचें उत्पन्न ३,४०,९९६ रुपये आहे हें मागील वर्षां पेक्षां जवळ जवळ तीन हजारांनें कमी आहे तरी सन १८८८—८९ साला पेक्षां ३६ हजार रुपयानें अधिक आहे. आणखी पाहून ही आणखी सात वर्षें मागें दृष्टि फिरविली ह्मणजे कळून येईल कीं एवढ्या अल्प मुदतींत सर्व साधारण स्टांपांचें चालूं उत्पन्न सन १८८३—८४ पेक्षां ९२,९१५ रुपयांनीं वाढलें आहे. ही भरती केवढी जंगी आहे हा क्षणभर विचार केला तर आमच्या ह्मणण्याच्या खरेपणा विषयीं पुरावा निराळा नको. कर्नल सी. टी. लेन इनस्पेक्टर-जनरल यांनीं चालूं वर्षीं स्टांप खात्याचें उत्पन्न कमी होण्याचें कारण खात्रीनें कांहीं ठाम केलें नाहीं तरी त्यांस असें आढळून आलें आहे कीं, स्टांप खात्याचें व रजिस्ट्रेशन खात्याचें उत्पन्न बरोबर वाढतें किंवा उतरतें. जेव्हां स्टांप पुष्कळ विकले जातात तेव्हां स्थावर जिनगीच्या नोंदण्याही पुष्कळ होत असतात. यावरून दोन्ही गोष्टीस ही एकच कारण लागूं पडावें, असें साहेब मजकूर ह्मणतात. उदाहरणार्थ सन १८८७–८८ पेक्षा त्याच्या पुढल्या वर्षीं कापूस फार पिकला व भावही त्यास चांगला होता तेव्हां त्या दोन वर्षांतील कापसाच्या उत्पन्नाचे आंकडे रुपये १,६९,७९,८०० व रुपये ३,१७,२९,८३७ यांतील अंतर पाहतां लोकांच्या हातीं मुबलक पैसा खेळूं लागला व जमीन जुमल्याच्या व कर्जाच्या परत फेडीच्या घडामोडी फार वाढल्या असें दिसेल. पीकपाणी चांगलें असतें तेव्हां या स्टांपा सारख्या उत्पन्नाच्या बाबी वाढतात ही गोष्ट कमिशनर साहेबांसही मान्य आहे परंतु त्यांचा दुसरा अभिप्राय असाही आहे कीं, सरकारी उत्पन्नाच्या बाबी संबंधानें शेती चांगली आली नाहीं किंवा पुष्कळ बुडाली तरी सुद्धां स्टांपांची विक्री व नोंदणीचीं कामें सारखींच वाढली जातात कारण कीं हंगाम वायफळ झाला तर लोकांस कर्ज काढावें लागतें व आपल्या जवळील मालमत्ताही ते विकतात. अलिशान रेसिडेन्ट साहेबांचें मत किंचित् निराळें पडतें तरी त्यांनीं स्टांपासंबंधानें व नोंदणीच्या दस्तऐवजा संबंधानें विशेष तपशीलवार शोध अकोला जिल्ह्यांत करण्या करितां फर्माविलें आहे हा तपास झाल्यावर याबद्दल विशेष लिहितां येईल.

एक आणा पावतीचीं टिकिटें गेल्या दोन वर्षां पासून कमी कमी खपतात. इनस्पेक्टर—जनरल साहेबांच्या मतें या उत्पन्नाच्या कमजास्तपणाचा संबंध सट्टयांच्या व्यापाराशीं आहे. त्यांचें हें ह्मणणें सकारण आहे. १८८९ सालच्या जूनच्या १५ वे तारखेच्या हिंदुस्थान सरकारच्या हुकुमावरून सट्टयांच्या कायदेशीरपणासाठीं स्टांप कागदाची जरूरी नाहीं असें ठरलें. या ठरावाचा व्यापारी लोक बेकायदा निराळा उपयोग करून घेतात. सट्टयांची वारंवार देवघेव होते व पुन्हा पुन्हा ईसार देतात तेव्हा त्या बयान्याच्या पावत्या निराळ्या न देतां त्या सट्टयाच्या कागदा मागें नमूद करितात आणि या नमाणें पावतीच्या टिकिटाचा खर्च वांचवितात कायद्यानें खुद सट्टयाला जरी स्टांप लागत नाहीं तरी त्या संबंधानें इतर पावत्या सारख्या गोष्टी कायदेशीर होण्यास स्टांप लागत असतो. हा नियम योग्य रीतीनें पाळला गेलो नाहीं तरी यापुढें त्याची अंमलबजावणी फार सक्तीनें केली जाईल.

कर्नल लेन साहेब ह्मणतात कीं सट्टया प्रमाणे दुसरा व्यवहार कोणताच नाहीं कीं, ज्यावर प्रथम स्टांपाची आकारणी अगोदर झाली पाहिजे. सट्टे मुख्य दोन प्रकारचे आहेत हे प्रकार पदार्थांच्या जातीवर केलें नसून सट्टयाच्या स्वरूपावर केले आहेत. 'लावणी' सट्टा ह्मणजे शेतांतील माल अमूक एका भावानें हंगामाच्या वेळीं पुरविण्या बद्दल शेतकऱ्यांशीं जो अगाऊ करार करितात तो होय. असले करारांस स्टांप लावावा लागतो त्या शिवाय तो कायद्यानें मान्य नाहीं. 'सही' सट्टे ह्मणजे व्यापारी परस्परामध्यें निरनिराळ्या अटीवर कांहीं मुदतीनें कापूस धान्य वगैरे पदार्थ पुरविण्या बद्दल इसारा घेऊन ठराव करितात ते होत. या सट्टयांस स्टांप लागत नाहीं पहिल्या प्रकारचा सट्टा दस्त ऐवजाच्या स्वरूपाचा मानला जातो

म्हणून त्यास स्टांपाची जरूरी आहे. खेरीज कायद्यामध्यें ही विषमता अन्यायाची आहे. तेव्हां दुसऱ्या प्रकारच्या सट्टयाला ही स्टांपाची जरूरी असणें अवश्यक आहे आणि अशा साठीं कसकसें स्टांपाचे कर कोणकोणत्या सट्यांवर बसवावें या बद्दल इन्स्पेक्टर जनरल ज्या सूचना करितील त्यांचा विचार प्रथम करण्याचें अलिशान रेसिडेन्ट साहेबांनीं अभिवचन दिलें आहे. जरी व्यापारी लोक सट्यांच्या व्यवहारांत निव्वळ नशीबावर हवाला ठेवितात आणि त्यांच्या शहाणपणाची त्यांत मोठीशी मदार नसते तरी या सट्याच्या व्यापारांत किंबहुना एका प्रकारच्या कायदेशीर जुगारांत पुष्कळ जण हजारों रुपये मिळवितात त्या प्रमाणें गमावतात; या वरून अशा व्यापारावर स्टांपाच्या रूपानें निराळा कर बसविण्यास कांहीं हरकत मानण्याचें कारण नाहीं. खामगांवास सट्यावर मुनसिपल कर भारी आहे आणि त्या पासून त्या मुनसिपालिटीस पुष्कळ फायदा होतो. सर्व वऱ्हाडांतील सट्याच्या देवघेवींस स्टांपाची जरूरी ठेवली तर स्टांप खात्याचें उत्पन्न चांगलें वाढेल अशी वरील अनुभवा वरून खात्री होईल. सट्याला स्टांप लागूं नये याचें कारण असें दाखवितात कीं स्टांप लावल्यानें जुगाराच्या स्वरूपाच्या सट्याला कायद्यानें सरकारची पूर्णमान्यता प्राप्त होईल. हा दोष किती हा बाधक असला तरी तो बाजूस ठेवण्याचा रेसिडेन्ट साहेबांचा पक्का निश्चय आहे.

हुंडी स्टांपाचे म्हणजे पावतीची एक अण्णा टिकीटें हुंडीला लावतात त्यांचें उत्पन्न रुपये १५९७८-२-० इतकें झालें आहे आणि मागील दोन वर्षा पेक्षां सव्वा तीन व अडीच हजार रुपयांनीं कमी आहे. या कमतीचें मुख्य कारण असें दाखवितात कीं अकोल्यास मुंबईच्या ब्यांकेची शाखा निघाल्यानें हुंडीचा व्यापार फार कमी चालतो आणि त्या मुळें मोठ्या रकमेची उणीव पडली आहे.

दस्तां ऐवजीं स्टाप विक्रीचें उत्पन्न सन १८८६-८७ त रुपये २३६५१८-४-० होतें तें चार वर्षांच्या अवधींत रु० ३०४५१८ एवढें भाग वाढलें आहे. तसेंच कोर्टफीचें उत्पन्न त्याहून ही अधीक म्हणजे ४,२२,१३१ रु० ९ आ. ९ पै. आहे. या अर्तीनात पैशाच्या खर्चा मुळें लोकांचा जीव त्रासून गेला आहे आणि सरकारदरबार नको, पण व्यर्थ सफे फिर्यादी केल्या वाचून बुडलो तरी चालेल असें हा शहाणपणाचे व उदासीनतेचे उद्गार लोकांच्या तोंडून निघतांना ऐकूं येत आहेत. परंतु वेळ बेतली म्हणजे हे उद्गार बाजूस राहून मनुष्य बिकट मार्गानेंच व अडचणी सोसून ही आंगच्या वळणावरच धांवतो त्या प्रमाणें वादी प्रतिवादी व जज्ज, वकील ही मंडळी रात्रंदिवस कोंडत:तून जबरदस्त कामाचे भारे उचलीत आहेत आणि त्यास उत्तरोत्तर भरच पडत चालली आहे.

## राष्ट्रीय सभा.

( आमच्या एका 'हितचिंतका'कडून)

आपल्या लोकांत एखादें मूल जन्मल्यावर दहा बारा दिवसांचे आंतच त्याची माता अगर त्याचा पिता किंवा घरांतील एखादें मनुष्य गत झालें, अथवा त्याच्या जन्मापासून त्या कुटुंबांस उतरती कळा लागली तर तें मुल वाईट पायगुणाचें आहे असें ह्मणण्याचा प्रघात आहे. हा दोष मुलासच लावतात असें नाहीं तर नूतन वधू अगर नवीन प्रवेश झालेली कोणती ही वस्तु, मग तो नागपुराहून आणलेला सुंदर तागा असो अगर धारवाडी मुद्दाम आणलेली भव्य बैलांची जोडी असो, जर का ह्या वस्तुचा प्रवेश होतांच यजमानाच्या धंद्याचा ऱ्हास होऊं लागला तर त्यांच्या कपाळीं हा दोष आलाच असें समजावें. आतां हा समज अलीकडील कांहीं सुशिक्षित व ज्यांस कार्यकारणाचा योग्य संबंध कळूं लागला आहे, अशा लोकांत मुळींच नाहीं हें खरें तथापि एकंदर समाजाकडे लक्ष दिलें तर वरील समजाचीं चिन्हें इकडे तिकडे कुळें आढळतील. आमच्या प्रस्तुतच्या स्थितींत सुधारक— ह्मणजे केवळ तोंड बहादर व लखणी बहादर नसून काया, वाचा, व मन ह्या त्रयीं मध्यें समप्रमाण ठेवणार—हे एखाद्या अफाट वालुकामय अरण्यामध्यें जशीं क्वचित् रमणीय ओलाव्याचीं स्थलें दृग्गोचर व्हावीं, तसे मधून मधून चमकूं लागले आहेत. तेव्हां वरील समज हा एकंदर हिंदु समाजामध्यें प्रचलित आहे असें ह्मणण्यास बाध येणार नाहीं. असो. तेव्हां वर लिहिल्या प्रमाणें एखादें मूल अगर जनावर जसें वाईट पायगुणाचें निघतें तद्वत आमच्या स्कोबल साहेबांचे पिलू ( संमती बिल. ) हे हो ते आमच्या समाजरूपी गृहामध्यें शिरल्यापासून जी कांही दुही माजून राहिली आहे ती लक्षांत आणली ह्मणजे, कारटें पायगुणाचें निघालें आहे असें ह्मणणें भाग पडतें. कायहो विचाऱ्याचा जन्म होऊन त्याच्या पित्यानें त्यास आमचे घरांत पाठविल्यापासून आज पुरें वर्षही झालें नाहीं तोंच इतक्या अवधींत, ह्याचें संगोपन करण्याचें ज्यांनीं आपल्या अंगावर घेतलें त्यांचे व ह्याचें मुखावलोकनही नकरण्याचा ज्यांनीं कृतनिश्चयच केला होता ह्यांचे आज केवढें रण माजून राहिलें आहे? ह्यावर डोळा असणाऱ्या लोकांच्या तरतरीत बुद्धिमत्तेस, सारासार विचारास, व मनाच्या गांभिर्यतेस जणों काय ह्याच्या आगमनापासून कीडच लागत चालली आहे. बरें ह्यांच्या मतांतररूपीं वणव्याचा शेवट येथेंच होऊन तो थांबला आहे असें नाहीं तर त्याच्या ज्वाला आमच्या राष्ट्रीयसभेच्या नूतन रोप्यास होरपळूं पहात आहे. ह्याच्या खरतड राशीमुळें जे लोक वरील नूतन रोप्याच्या वाढीकरितां कष्टो मेहनत घेत होते त्यांस आतां ह्या रोप्याची वाढ कोणत्या उपायानें खुंटेल अशाविषयीं डोळ्यांत तेल घालून जागत बसण्याचा बुद्धि झाली आहे. रोप्याचे जनक ह्यूम हा कोण ह्याची जन्मभूमी आम्हां पासून किती दूर, ह्याचा व आमचा संबंध काय! परंतु जो केवळ आपल्या कर्तव्यास स्मरून निरपेक्ष बुद्धीनें लाविलेल्या रोप्याचीं फळें आम्हांस व आमचे मुलांबाळांस प्राप्त व्हावीं म्हणून त्या रोप्याचे जोमदार वाढी करितां स्वतःचे सुखास पितृवात्सल्या मुळें लाथ मारून जिवापाड धडपड करीत आहे त्यावर जे त्याचे आज एक सारखे पांच वर्षे गुणानुवाद गात होते अशा कांहीं लोकांकडून शिव्यांचा वर्षाव होऊं लागला आहे. सारांश ह्या बाळाचे पायगुणामुळें आमचे घराण अवदशेची कळा येऊं पहात आहे. असो सृष्टी क्रमानुसारें जें जें होईल तें तें पहावें!

संमती वयाचा कायदा पसार झाल्यापासून ज्यांचें रक्षण करण्याचा त्याचा उद्देश आहे त्यांचें तें कितपत होईल व त्याचा आमचे समाजावर नैतिक परिणाम किती घडेल हा विचार तूर्त एकीकडे ठेवून सद्यस्थितीकडे लक्ष दिलें तर सामाजिक तडजोडीस व राजकीय चळवळीस विरुद्ध पक्षाच्या दुराग्रहा मुळें बराच व्यत्यय येऊं पहात आहे ह्याची साक्ष पुण्यनगरींतील ग्रामण्याची धामधूम आणि जे अग्रूचें खटले व राजकीय चळवळीविषयीं ( राष्ट्रीय परिषदेविषयीं. ) प्रगट होत असलेली अनुदार बुद्धि हीं देत आहेत. वास्तविक रीतीनें पाहिलें असतां संमती बिलाचा आणि राष्ट्रीय सभेचा कांहीं एक संबंध नसून कांहीं अधुनिक विद्वानांनीं राष्ट्रीय सभेचे पुढारी ह्या कायद्यास अनुकूल होते, इतक्याच कारणावरून त्यांच्याशीं जानवें तोडण्याचा प्रसंग आणावा, व राष्ट्रीयसभेविषयीं आपली अनुदार बुद्धि प्रगट करावी हें लज्जास्पद आहे, असें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. अशा लोकांनीं इंग्लंद वगैरे सुधारलेल्या राष्ट्रांच्या इतिहासाचीं पारायणें करून त्याचा उपयोग अळवावर पाणी ह्या ह्मणीप्रमाणें केला असें उघड ह्मणणें भाग आहे. धर्मसंबंधीं व खासगी कामांत छत्तीसांच्या आंकड्याप्रमाणें ज्याचें सख्य परंतु राजकीय व सार्वजनिक बाबतींत जे जीवश्चकंठश्च असे लोक इंग्लंडमध्यें किती होते व आहेत. आपले माजी व्हायसराय साहेब लार्डरिपन व होमरुलाच्या युद्धांतील वृद्ध अनुभवीक योद्धा ग्लाडस्टन ह्यांचीं धर्म संबंधानें किती विरुद्ध मतें आहेत परंतु राजकीय प्रकरणांत ते परस्परांचे पाठीराखे आहेत. व्यक्ति तितक्या प्रकृति व ही स्थिति मनुष्याच्या बुद्धीचा पूर्ण विकास होऊन स्पेन्सर साहेबांच्या काल्पनिक जगांतील मनुष्यांच्या वृत्ती होईपर्यंत सदैव कायम रहाणार हें लक्षांत न ठेऊन जो आपल्या विरुद्ध मत देणाराशीं तेरीमारीची वेळ आणितो अशा मनुष्याच्या बुद्धीचा विकास चांगला झाला नाहीं असें उघड होतें. जेथें तम व दुराग्रह ह्यांचा अंमल होऊं लागला तेथें बुद्धिविकासास उतरतीकळा लागणें हें स्वाभाविकच आहे वर लिहिल्याप्रमाणें इंग्लंदांत जसे कांहीं विषयांसंबंधीं भिन्नमताचे परंतु इतर व्यवसायांत एकमेकांचे जिवलग असे पुष्कळ सुशिक्षित लोक आहेत तसे आमचेही देशांत आहेत फार लांब कशाला आमचे अकोल्यांतील समान्य वकील रा० देवराव विनायक विनायक हे संमती वयाच्या कायद्यास प्रतिकूल असून ते राष्ट्रीयसभेकरितां आज दोन महिने आपल्या पदरास खार लावून एक सारखे झटत आहेत हल्लीं ते येथील व्यवस्था लावून नागपुरास गेले आहेत व असे समंजस लोक आह्मांमध्यें आहेत ह्मणूनच आह्मांस कांहींसा डोकें वर काढण्यास मार्ग आहे. सारांश आमच्या रुष्ट झालेल्या विद्वानांनीं रा० देवरावजीचा कित्ता गिरविल्यास व निरनिराळ्या ग्राहक शक्तीवर मतभेदांचे निरनिराळे परिणाम घडले ह्मणून त्याबद्दल रोष न मानून सार्वजनिक हिताकरितां एक दिलानें झटल्यास आज आपल्या नूतन संस्थेस केवढी बळकटी येणार आहे. नाहींतर पेटलेला कलहाग्नी भडकून जाऊन सर्वांची राख रांगोळी होईल अगर दांतीं तृण धरून तिसऱ्याचें अखंड दास्यत्व पतकरावें लागेल.

आतां पर्यंत आमच्या रुष्ट झालेल्या मंडळीस दोन विनंती दाखल शब्द लिहिण्यांत आले, परंतु इतर मंडळीसही सुचना दाखल दोन शब्द लिहिणें हें येथें अप्रासंगिक होणार नाहीं अशी आमची पूर्ण खातरी आहे ह्या इतर मंडळीमध्यें आह्मी दोन पक्ष करतो; एक संमती बिलास अनुकूळ, व दुसरी संमती बिलास प्रतिकूळ. पहिल्या पक्षांतील लोकांमध्यें अलीकडील सुशिक्षित व ज्याची सारासार विचार शक्ति उत्तरोत्तर क्षय न पावतां वृद्धिंगत होत आहे असे आहेत. व दुसरे पक्षांतील लोकांमध्यें कांहीं अलीकडील शिकलेले परंतु, जुन्या चालीच्या शृंखला तोडण्यास समर्थ न झालेले व कांहीं जुन्याच चालीनें अगदीं बद्ध केलेले असे लोक आहेत. पहिल्या पक्षांतील लोकांस, ह्मणजे कालानुसार विचार करणाऱ्या लोकास आह्मांस कांहीं जास्त लिहावयाचें आहे असें नाहीं. कारण, असे लोक आपल्या कर्तव्यास जागृत असून सत्यमेवजयते या अक्षरांनीं युक्त पताका आपल्या ध्वजास लाऊन जणों काय तीं अक्षरें आपलीं दीव्य शस्त्रेंच आहेत असें समजू, पढतमूर्ख शत्रूंनीं जरी किती अडथळे आणिले तरी त्यांस न डगमगतां आपला ध्वज आग्रभागीं चालवीत आहेत. तेव्हा अशा लोकांस आमच्या शब्दरूपी गुटिकेची जरूर आहे असें दिसत नाहीं. परंतु आमच्या राहिलेल्या दुसऱ्या पक्षांतील लोकांस आह्मांस सूचना ऊर्फ विनंती करणें अत्यावश्य आहे. कारण अशा मंडळींचीं मतें ठाम झालेलीं नसून ते एखाद्याच्या शब्दगौरवास, व अर्थविपर्यासास भुलून जाऊन त्यांनीं पसरलेल्या जाळ्यांत सांपडतात. अशा लोकांस आह्मांस इतकेंच सांगणें आहे कीं त्यांनीं "आमच्या मनूची युक्ती अशा आहे याकरितां आह्मी असें करितो" असा मनाची ग्रह न करितां मनूची ऊक्ति अशी कां आहे व ती प्रस्तुत कालास कितपत अनुकूळ होईल असा विचार करावा. ह्मणजे आपण जें करतों त्या पासून समाजाचीं बंधनें दृढ होतील अगर शिथिल होतील असा विचार करून मग करणें तें करावें. परंतु अमक्या शहाण्या कुत्सित मंडळीनीं राष्ट्रीयसभेचे पुढारी अविश्वसनीय झाले आहेत असें सांगितल्यावरून त्या परिषदेची आपणांस जरूर नाहीं असें ह्मणणें ह्मणजे आपल्या डोळ्यावर आपणच हात ठेऊन दिसत नाहीं असें ह्मटल्या प्रमाणें होणार नाहीं काय? तरी असे लोक आपलें ज्ञानचक्षु उघडून स्वतःस विचाररूपीं दर्पणामध्यें निरखून पहातील व राष्ट्रीयसभेचा व संमती बिलाचा कांहीं संबंध नाहीं असें समजून अंग व द्रव्य या द्वारें मदत करतील अशी आह्मांस पूर्ण आशा आहे.

---

मद्रासे कडील वकील रा. रा. आनंदाचार्लू यास राष्ट्रीय सभेच्या ७ वे समारंभास अध्यक्ष निवडण्यांत आले. मद्रासी मंडळीचा हा बहुमान त्यांस यथायोग्य मिळाला आहे. विलायतची मोहीम, ह्यूम साहेबांस अखेरची

सलामी, नागपूरचा समारंभ हा हिंदुस्थाना पुरतां अखेरचा कीं काय तीन प्रश्नांचा विचार येत्या बैठकीस होणार आहे म्हणून नागपूरचा समारंभ अप्रतिम होईल असा सुमार आहे.

---

गेल्या पांचवे तारखेस सोलापूर शहरची 'मुरारजी गोकुळदास गिरणी' अग्निनारायणानें स्वाहा करून टाकली. आठ लाखाचें नुकसान विमेवाल्या कंपनीचें झालें. कारखान्यांतील पांच सहा हजार मजूरदार बेरोजगारी झाले आणि तशांत दुष्काळ झपाट्यानें फैलावत आहे तेव्हां या ईश्वरीक्षोभा पुढें तारणारा किंवा मारणारा काय तो सर्व विश्वाचा वाली परमेश्वर आहे. तो ठेवील तसें राहिलें पाहिजे!

---

गेल्या गुरुवारीं दोन प्रहरीं विमानारोहणपटु लेफटनंट म्यान्सफील्ड यांनीं आकाशांत गमन करण्याचा मुंबईस दुसरा प्रयोग केला तो प्रयोग व्यर्थ होऊन साहेब प्राणास मुकले ही मोठी खेदाची गोष्ट होय. मागील खेपेस त्यांच्या प्रयत्नाला यश आलें त्या यशश्रीनें लेफ्टनंट म्यान्सफील्ड यांस अखेर दगा देतांच सर्व प्रेक्षक मंडळीच्या तोंडचें पाणी पळालें आणि अशा तरुण लोकोत्तर मनुष्याच्या मरणानें सर्वजण हळहळत निराशेनें घरोघर गेले. विमानांत बसल्या पासून बावीस पळाच्या आंत विमान कलंडलें. आणि त्याच्या आंत गुरफटून गेलेले लेफटनेंट कोलमडत धरणीवर आदळले व स्वल्पावकाशांत त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. शास्त्रीय शोधा निमित्त ज्याचा देह बळी पडला त्याचे अलम दुनियेवर किती उपकार आहेत बरें!

---

# The Berar Samachar

MONDAY, DECEMBER 14, 1891

---

First and foremost among the many characteristics of our Indian people stands their excessive spirit of imitation. As a general rule people are very much after imitating what strikes them most What is graceful in form or elegant in style fascinates the mind readily and easily. The spirit in itself is good enough. But it should not get better of our reason. Prudence yields to this impulse when the latter is in excess. Our people have looked upon the Western rulers as their type of perfection. To a great extent they are right in thinking so. But in their out and out imitation of every thing English they have fallen into the blunder of imitating their drawbacks.

The present fashion of our English knowing men is to adopt English dress. Its cut is fine. It is again convenient. It is best suited to freer and easier movements of the parts of our body. English food is, again, much valued on various grounds. So far as vegetarians go it is not necessary for them—say great medical authorities to become flesh eaters. The nutritive elements that abound in flesh are found in more or less quantities in the food of the vegetarians. There are some two or three kinds of corn such as gram pulse and Udidha (उडीद) which possess in them nutritive element viz nitrogen in a greater quantity than flesh possesses it. But vegetarinism being restricted only to a limited portion of our young youths it need not stop us here for long. From the English we have borrowed the use of tea and coffee. These liquids have neither any great medical property nor are they of any considerable use. On the contrary they are mere objects of luxury which put their devotees to unnecessary expenses. Instead of thus lavishly squandering away our money in indulgences of this sort it would be a prudent economy to turn that money to some other good motive. Wine is very common among our lower classes as it is in English Society. The use of wine has been most vehemently condemned by medical authorities as being ruinous to our system. But people have so much liking for it that they are almost its slaves. The most wonderful thing is that in the spirit of imitation of every thing new our higher classes which are disallowed the use of it are found to be the greatest consumers of it. The number of persons addicted to its use is every day increasing. The morbid condition of our young men which leads them to indulge in such vices is greatly to be deplored. The Abkari system in India shows every year in its reports the enormous sales of such intoxicating liquids

It was purely out of the philanthropic nature of some of the liberals that Sir John Peace could gain supporters to pass through the house of commons a proposal abolishing opium trade: Strong aversion shown to intoxicating drugs will, some day or other, act a signal part in regard to the abolition of the sale of wine.

Our present financial circumstances may lead us to discountenance Sir John Peease's proposal. But the underlying spirit that pervades the whole proceeding is purely liberal.

Again Indian people are taught that the use of wine is a vice. Our religion is against it. It is then unnatural, irreligious and immoral for our Indian young men to indulge in this vice. Is it not then disgraceful to our Indian people that they should be warned against the use of such intoxicating liquids by men coming from England where their use is greatly allowed. It should be we who ought to set a good example to Mr. Caine and to his several associations of wine abstainers—rather than that they should preach us on such points. Again more gay gaudy and extravagant forms of common ordinary decorum are preferred by our people to simplicity.

The other evil which is worth noticing and which is much connected with this fashionable life of modern type is that the unnecessary wants thus created require a great income to satisfy them. But since we are becoming poorer and poorer every day multiplied & multifarious cravings cannot be satisfied. Thus instead of trying to follow others in points of food or drink or extravagance or nicety our people had better turn their thoughts to the imitation of what is good.

(I) Plain and straightforward dealing with simplicity of life and honesty of purpose is greatly admired and esteemed.

(II) An upright character with the charms of refined manners of behaviour have been the key note to success in life.

(III) A conscientious regard to the equal rights of others with a clear perception of human nature secures a high position with all its distinctions and rewards.

(IV) Just indignation for the wrongs done to the self gives stability to one's honour and place.

(V) Self respect is a safeguard against many low and cowardly acts and a sure guarantee against yielding to temptations.

(VI) Spirit of independence produces sterling qualities of great public use. It is the stepping stone to self improvement and social advancement.

(VII) Patriotism, moral as well as heroic courage, energy and enthusiasm and a strong will are all essential requisites for natural advancement, independence, and superiority.

(VIII) Polite manners make amends for many drawbacks natural or accidental.

(IX) Regular proper and adequate exercise of all the parts of our system in their due course and efficient care and proper and seasonable nourishment of them give us a healthy body and a sound mind.

(X) To learn the value of time and its economy is the foundation of real knowledge.

(XI) Readiness to adopt to the surroundings makes life comfortable.

(XII) Desire to learn to seek truth for oneself is the index of real education and of inventive mind.

These and such others are really good things; and many of them are to be observed in the English people. They ought to be imitated. But to obtain good things great labour and time is required and men do not like to take great pains. Often it happens that bad things assume fair forms and produce immediate pleasure and what people generally expect most is immediate pleasure. This only shows how people lean more to bad thing than to good ones.

---

## वऱ्हाड.

राव साहेब देवराव विनायक दिगंबर हे शुक्रवार रात्रौ राष्ट्रीय सभेच्या कामा साठीं नागपुरास रवाना झाले. सदर्हू गृहस्थ या वर्षीं तर जीवापाड मेहनत करीत आहेत. त्यांच्या अमोल देशसेवेचें चीज होईल तेव्हां खरें.

यंदा मुंबई युनिव्हरसिटीच्या पी. इ. परीक्षेस ६८६ उमेदवार होते त्या पैकीं १५९ पसार झालें. या कडक निकालाच्या सपाट्यांत वऱ्हाडांतील दोन विद्यार्थी पसार झाले ते:—

काशीनाथ श्रीराम जठार आणि कृष्णराव दिनकर देशपांडे.

चालूं सालच्या एल्. एल्. बी. च्या परिक्षेंत उमरावती हायस्कूलचे माजी विद्यार्थी रा. रा. श्रीधर बळवंत गोखले हे एक पसार झाले आहेत.

रा. रा. पुरुषोत्तम गणेश हे एक महिन्याच्या रजेवरून परत वाशिमच्या आंग्लोव्हरनाक्युलर शाळेच्या आपल्या हेडमास्तरच्या जुन्या जागेवर आज रुजूं होतील.

'अकोला म्यानुफ्याक्चरिंग कंपनी' संबंधानें लिलावांच्या वगैरे जाहिराती आह्मी प्रसिद्ध केल्या होत्या परंतु त्या कंपनीच्या व्यवस्थेंत गैरकायदा कांहीं गोष्टी दिसल्यावरून गेल्या बुधवारचा लिलांव मुंबई मुक्कामीं सरकार मार्फत तहकुब करण्यांत आला. या कंपनीचा बुडता पाय कसकसा खोल गेला व त्यामुळें भागीदार ठार बुडालें हें सविस्तर कळून घेण्याच्या प्रयत्नांत आह्मी आहों. अंतरंग कांहीं निराळेंच दिसतें.

प्रोफेसर विष्णु मोरेश्वर छत्रे यांच्या सरकस खेळास अकोलें व उमरावती येथें चांगला पैसा मिळाला आहे. त्यांनीं उमरावती मुक्कामच्या गेल्या गुरुवारच्या खेळाचें निम्में उत्पन्न राष्ट्रीय सभेला देणगी दिली आहे या बद्दल आम्ही त्यांच्या समयोचित उदार वर्तनाची फार तारीफ करितों.

मि. निकोलेट आक्टिंग सेशन जज्ज हे आज पासून सेशनचें काम अकोल्यासच सुरूं करितील.

गेल्या बुधवारी येथील म्युनिसिपालिटीचें पुढील सालचे बजेट पसार झालें त्यावरून उत्पन्न ५०,२८० रु. व खर्च ४९,६०१ रु. होईल असा अंदाज आहे.

मि. आबदुल कदूस अक्टिंग तहशिलदार अकोला हे नशीबबहादर दिसतात कांकीं त्यांस परत बाळापुरास जावें न लागतां पुन्हा तहसिलदारी दीड महिना भर मिळाली आहे.

मि. मुनसी अजीजुद्दीन ए. अ. कमिशनर हे दीड महिन्याच्या रजेवर गेल्यामुळें रा. रा. एकनाथ मोरेश्वर काणेरे यांस पुन्हा ए. अ. कमिशनरच्या बढतीवर बहाल करण्यांत आलें आहे.

मल्कापूरचे देशमुख रा. रा. संपतराव यांनीं मिरजंगू व हैदर हे उभयता बापलेक व गुलाब या तिघांवर सार्वजनिक सरकारी काम करित असतां दुखापतीची मारहाण केल्या बद्दल फिर्याद केली होती तिचा अखेर निकाल होऊन त्या आरोपींस अनुक्रमें पंधरा दिवस, पंधरा दिवस, व दीड महिना या प्रमाणें सक्त मजूरीची शिक्षा देण्यात आली. विदर्भ कारांच्या मतें देशमुखांनीं असाधारण धैर्य दाखविलें, आरोपींच्या दांडगाई बद्दल उसनें फेडलें, व न्यायाचा विजय केला. सध्यां उजेडांत गोष्टी आल्या आहेत त्याहून ही हें कथानक फार लांबलचक आहे असें तिकडील माहितगार लोक बोलतात.

'शुद्ध वऱ्हाडी' कर्ते कळवितात कीं वाशिमास १५०० रुपयावर राष्ट्रीय सभेची वर्गणी गोळा होईल. वाशिमचे पोलीस इन्स्पेक्टर व चीफ कानस्टेबल अनुक्रमें मि. सायन्ना व अबदुल लतीफ यांस त्यांच्या तपासांतील कैदी मरण पावल्या कारणानें स[...]स्पेंड करण्यात आलें आहे. त्यांचा अ[...]सा आहे कीं चौकशी तेथील जिल्हा[...] यांच्या ताब्यांतून काढली जावी.

रा. रा. नारायण गोविंद माडगांवकर यांनीं अभिप्रायासाठीं 'शुचिर्भूतपणा' 'पत्रावळी व द्रोण' आणि 'भजनामृत' अशा तीन छोटीं पुस्तकें पाठविलीं आहेत त्याचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों.

वाशीमकर 'स' गृहस्थांची भेट पोहचली. नजरचुकीनें बाजूस राहिल्यामुळें शिळ्या मजकुरास ताजेपणा आणतां येत नाहीं ह्मणून दिलगिरी वाटते.

रा. रा. गोपाळ गणेश ढेरे लोकलफंड सुपरवायझर हे तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जात आहेत.

---

## वर्तमानसार.

मणीपूरचे वृद्ध राजे सुरचंद्रसिंव्ह कलकत्या मध्यें पोलिटिकल रक्षणामध्यें असतां मृत्यू पावले. याची प्रेतदहन क्रिया खुद्द लार्ड लेन्स डौन गवरनर ज० साहेबांचा स्वारी तोफखान्यांत जाऊन जातीच्या नजरेखाली करण्यांहात. तथा
[...]ल, धैर्यवान, व चतु
[...]ल सर्व श्रम घोडे, वै

एका चांगल्या गृहस्थास मूल झालें. तें एक वर्षाचें झालें तरी त्याचें डोकें एका दिवसाच्या मुला सारखेंच होतें. टाळू ह्मणून प्रत्येक मुलाच्या डोक्यास जो मृदुभाग असतो तो त्यास मुळींच नव्हता त्याचें डोकें घट्ट आणि कठिण असें असून कपाळाचा भाग चिमटलेला असा होता. आंतल्या मेंदूस डोक्याची वरची कवटी चिकटून गेल्यामुळें मेंदू वाढण्यास मुळींच अवकाश नव्हता. वयाच्या मानानें मुलाचे शरीराचा इतर भाग वाढावा तसा वाढत होता, पण बुद्धीची आणि ऐच्छिक व्यावृत्तीची आदिदेवता जो मेंदू तो डोक्याच्या कवटीच्या कठीण दाबा खालीं चेपून गेल्यामुळें तो उपजल्या स्थितींतच होता डोक्याच्या कवटीच्या कठीण पंजराखालीं मेंदू दाबून गेल्यामुळें त्या मुलास फार पीडा होई. व एकाद्या वेड्या प्रमाणें तें मूल अहेतुक हालचाल करीत असे, ही मोठीच वाईट गोष्ट होती. वेड्याच्या निशाणी प्रमाणें त्या मुलाचे हातपाय वेडेविद्रे झाले होते, त्या मुळें त्याला पाहून हृदय कळवळून जाई. सृष्टिकर्त्याच्या नजर चुकीनें ह्या मुलांत जी कमतरता आली आहे ती दुरुस्त करून मृता सारख्या स्थितींतून सोडवून त्यास व त्याच्या आईबापांस सुखी करतां येईल असें डाक्टरचें मत ठरलें हा प्रयोग न केला तर मूल जन्मभर वेडें राहील, प्रयोग केला तर तें कदाचित मरेल, असें मुलाच्या आईबापास स्पष्ट सांगून त्यांची कबुली मिळाल्यावर डाक्टरानें ह्या अद्भुत प्रयोगास आरंभ केला.

प्रथम ज्या ठिकाणीं ब्रह्म लिहित असतें त्या ठिकाणीं ह्मणजे कपाळाच्या जागीं डोक्याची वरची कवटी मोकळी केली. मग नाकाचा जेथें शेवट होता त्याच्या किंचित वर पासून डोक्याच्या मध्या पर्यंत एक व मध्य भाग सोडून पाठीकडच्या डोक्याच्या खाल पर्यंत एक अशा दोन पाव इंचा इतक्या डोक्याच्या कवटीस हत्यारानें खापी पाडल्या. असें करण्याचा उद्देश इतकाच कीं, डोक्याचा मध्यभाग, ह्मणजे ब्रह्मरंध्र फोडलें असतां मूल मरेल तें मरूं नये ह्मणून मध्यभाग फोडला नाहीं, आणि डोक्याच्या दोन्ही भागांतला मेंदू सारखा वाढावा ह्मणून मागल्या आणि पुढल्या भागास खापी दोन्ही कानशिलांच्या दोन बाजूस पाडल्या. त्यामुळें दीड इंच वरची करटी तुटली. आणि मग ह्या दोन्ही खापीनीं झालेला जो चौकोन त्याच्या कर्ण रेषेनें तिसरी एक एक इंच रुंदीची खाप पाडली. नंतर त्या डाक्टरानें फारच बेतानें वरच्या कवटीच्या आंत बोटें घालून कवटीच्या ज्या भागास मेंदू चिकटला होता तो किंचित दाबून मोकळा केला, आणि कवटी हालऊन थोडी रुंद केली. ह्या कृतीनें ती एक इंच रुंद झाली. नंतर भाग कुजूं न देणाऱ्या अशा औषधींच्या पट्या देऊन पाडलेल्या खापी बंद केल्या आणि अशारीतीनें हाड व मांस झांकून टाकलें. हा एकंदर प्रयोग दीड तास चालला होता. तितकी मुदत क्लोरोफार्म देऊन मूल बेशुद्ध स्थितीत ठेविलें होतें हे येथें वेगळें सांगावयास नकोच.

हा प्रयोग केल्या पासून तीन दिवसांत मुलास बरें वाटण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आणि आठ दिवसांनीं तर त्याच्या बुद्धींत फार मोठा फरक पडला. पूर्वीं तें वेडेविद्रें दिसे सभोंवतालच्या वस्तूंकडे तें लक्षच जात नसे, आणि तें निश्चल बसे, तें सर्व पालटून इतर मुलां प्रमाणें सभोंवतालच्या वस्तूंकडे तें लक्ष देऊं लागलें. आतां इतर मुलांप्रमाणें तें कृति करूं लागलें, विचार करूं लागलें, हसूं खेळूं लागलें आणि आपल्या आईबापांस सुख व समाधान देऊं लागलें. ह्या पेक्षां आश्चर्योत्पादक दुसरी कोणती गोष्ट आहे.

कृतील विशेष ...ऐं
नाहीं असें रसायन

ह्या शस्त्र प्रयोगानें ह्या मुलांस मनुष्य बनाविलें असें निरभिमानानें ह्मणण्यास काय हरकत आहे? हा प्रयोग केला नसतां तर त्याचें सर्व आयुष्य व्यर्थ जाऊन त्याच्या दयाळू आईबापांस आमरणांत असह्य दुःख झालें असतें यांत संशय नाहीं. पण शास्त्रीय शोधांच्या उपकारानें हा सुखकर परिणाम घडून आला ह्मणून ते शोध करणाऱ्या सत्पुरुषांचे आह्मी अत्यंत ऋणी आहों असें ह्मणण्यास आम्हास मोठा अभिमान वाटतो.

शुभ सू०

जर्मनी, आस्ट्रिया, इटली स्विटझरलंड व बेलजीयम यांमध्यें व्यापारासंबंधी तह झाल्याचें समजतें.

टाकू येथें चिनी लोकांनीं ख्रिस्ती लोकांची कत्तल उडविली असें समजतें.

दक्षिण आफ्रिकेंत व्यापार करण्याचा परवाना लंडन येथील कंपनीला तेथील संस्थानाधिपतीनें दिल्याचें समजतें.

सियामचे राजे हल्लीं रोम येथें आले आहेत.

मेलबोर्न येथें तीन पेढ्यांचें एकदम दिवाळें निघाल्यामुळे तिकडे फार घोटाळा झाला आहे.

जमीनीच्या कर्जबाजारीपणाच्या संबंधी चौकशी करण्याकरितां व्हैसराय साहेबांनीं कमिशन नेमिलें त्यांत खालील असामींना नेमिलें आहे:— मे. हब्ल्युनल, अध्यक्ष; री. ब. कृ. ल. नूलकर; मि. सि. एम. रवीझ, हेनरी ईवान्स; मि. स्टिफेन हामिक; मि. एफ. एसलेलांड समासद; मि. एल. ए. प्रॉटर चिटणीस.

मणिपूरचे माजी राजे चंद्र हे गेल्या गुरुवारीं कलकत्ता येथें वारल्याचें दुःखकारक वर्तमान समजतें.

मि. जेम्स माके यांस कलकत्याचे शरीफ नेमिलें.

सु० प०

अमेरिकेंतील घोर अरण्यांत कित्येक प्रचंड सर्प आहेत ते तुळवंटा सारखे जाड असून त्यांची लांबी ५०० फुटी पर्यंत असते! कित्येक सर्पांस शिंगे असतात, कित्येकांचे गुलाबाच्या कांट्या सारखे नाटकांतील राक्षसा प्रमाणें दोन भयंकर दांत पुढें आलेले असतात कित्येकांच्या मस्तकांवर तुरा असतो व कित्येकांच्या कानसला पासून पंखा पसरल्या प्रमाणें दोहीं बाजूस दोन लहानसे पंख असतात व कित्येकांच्या पाठीस कांटे असतात व कित्येकाच्या आंगावर रोम असतात व कित्येकांच्या शेपटीस मणके असतात, तक्षक ह्मणून एकजातीचा तीव्र विषारी सर्प आहे त्याचे विष जाज्वल्य असतें कीं, तो वाळलेल्या गवतावरून गेला तर तेथचें गवत होरपळून जातें.

हैद्राबाद — रेसिडेंट साहेब सर फिट्झ पाट्रिक हे विलायतेस निघून गेले— निजाम सरकारच्या हायकोर्टांत ८ बारिस्टर ९० फर्स्टक्लास वकील ७६ से. क्लास वकील आणि १९५ थर्ड क्लास वकील आहेत असें प्रसिद्ध झालें आहे.

पिंवळ्या रंगाचो ढग आकाशांत उठतात ती ज्या शहरांत किंवा जाहजांवर येतील, तेथें ताबडतोब पटकी उठते अशी एक कल्पना निघाली असून त्यावर सध्यां विचार चालू आहे.

न्या० सि०

चिनांतील बंड— फार जोरानें वाढत आहे व थोड्याच दिवसांत सर्व चीन देशभर बंडाची ज्वाला पसरेल असें इंग्रजी पत्रांस आलेल्या बातमी वरून समजतें. कांहीं पूर्व संकेत ठरला आहे, त्या प्रमाणें एक दिवशीं सर्व प्रांतांतले लोक बादशाहावर उठणार असें तिकडील पत्रें उघड रीतीनें लिहीत आहेत हल्लींचा बादशाह हा मांचु घराण्यांतला आहे, त्यास काढून टाकून चिनी घराण्यास बादशाही द्यावी असा बंड वाल्यांचा उद्देश आहे. चिनी दरबारची स्थिति एखाद्या कुजलेल्या घरा प्रमाणें होऊन बसली आहे, कामगार लोकांची स्थिति नासकी आहे, आणि बादशाह स्वतां नेहमीं खोजे लोकांमध्यें राहून ऐष आरामामध्यें निमग्न आहेत असें इंग्रजी पत्रें लिहितात. बंडवाल्यांनीं एक मोठें शहर हस्तगत करून लूटून फस्त केलें असून ते राजधानी शहर जें पेकिन यावर ४०००० फौजेनिशीं चाल करून जात आहेत असें ताज्या तारांवरून समजतें.

दुष्काळाचीं कामें— धारवाड जिल्ह्यांतील नवलगुंद तालुक्यांत रिलीफ कामें सुरूं झालीं आहेत व इतर तालुक्यांत तीं सुरूं करण्याचा उद्योग चालला आहे.

मद्रासे कडील दुष्काळ— मद्रास सरकारानें हिंदुस्थान सरकारास असा रिपोर्ट केला आहे —"गंजम, बल्लारी आणि कर्नूल जिल्ह्यांत, आणि अनंतापूर, कडाप्पा, आणि नेलोरच्या कांहीं भागांत पिकें वाळत आहेत ह्या भागांत पाऊस जरूर पाहिजे. विजागापट्टण, उत्तर अर्काट, चिंगलपट आणि सालेमच्या कांहीं भागांत प्रसंग फार कठीण आहे. बल्लारी आणि कर्नूल जिल्ह्यांत धान्य फार महाग होत आहे. कर्नूल बल्लारी आणि अनंतापूर भागांत चारा व पाणी दुर्मिळ झाल्यामुळें गुरें थकत व मरत आहेत.

शु० सू०

आसिया देशांत श्रीमान लोकांची एक मंडळी स्थापन झाली आहे व श्रीमान कुळांतल्या मुलींशीं लग्न न करतां गरीब मुलींशींच लग्न करावयाचीं अशी त्यांणी शपथा घेतल्या आहेत; आणि या ठरावाच्या विरुद्ध जो वर्तन करील त्यानें मंडळीस ४,००० रुपये दंड द्यावा व त्या रकमेचा व्यय एखाद्या गरीब सज्जन जोडप्यास सहाय करण्याकडे करावयाचा असें ठरविलें आहे आह्मी सुधारकांनी या नियमाचें अनुकरण केल्यास सुधारणा होणार नाहीं काय? पुष्कळ गरीब लोक आपल्या मुलींच्या लग्नाकरतां घरदार घालवून जे भिकारी होतात त्यांचा बचाव होणार नाहीं काय! आणि अशा करण्यानें सुधारकांची बहुसमाजांत ही धुन होतां वाहवा होणार नाहीं काय? मिळून समाजास जर आपल्या बरोबर नेणे अवश्य आहे तर प्रथम असल्या गोष्टींकडेच लागून त्यांचीं मनें आपल्या कडची होतील असें केलें पाहिजे.

इंग्रजांच्या पोलो खेळानें लोक फार भिकारी होतात या करतां तो खेळ हिंदुस्थानांत तरी बंद करावा असा विचार चालला आहे.

जमाबंदी वसूल करण्या बद्दलचा १८९० चा १ ला अक्ट हा गव्हरनरजनरल यांणी सगळ्या हिंदुस्थानास लागू केल्याचें फर्माविलें आहे.

आपल्या देशांतली तेलाचीं धान्यें बाहेर जाण्यास हरकत नाहीं असें रशियानें ठरविलें आहे.

विलायतची पार्लमेन्टसभा येत्या फेब्रुवारीच्या ९ व्या तारखेस पुन्हा चालू होण्याचें ठरलें आहे.

नेटिव संस्थानिकांच्या कारभारांत ढवळाढवळ करावयाची नाहीं, पण त्यांनीं सुधारलेल्या इंग्रजी कारभाराकडे पाहून आपला कारभार चालवावा हे हल्लाच्या गव्हरनरजनरलांचें मत विलायतच्या टाइम्स पत्रास पसंत आहे तोच पत्रकर्ता आणखी ह्मणतो कीं, हिंदुस्थानची सरहद्द बंदोबस्तावाचून मोकळी सोडण्याची वेळ आतां राहिली नाहीं तरी रशिया हिंदुस्थानावर हल्ला करण्यास इतक्यांतच तयार होईल असें वाटत नाहीं.

समाना हद्दीच्या रक्षणाकरतां बंगालची कांहीं फौज कोहात येथें जात आहे.

काबुलांत पटकी जारीनें सुरू आहे आणि अमीर हे कोहिस्थानच्या शेजारच्या डोंगरावर राहाण्यास गेले आहेत

अबटाबाद वरून नवी एक रेलवे करण्याची तयारी चालली आहे. गव्हरनरजनरल काश्मीराच्या प्रवासास जे नुकेतच गेले होते त्यावेळीं हा बेत ठरला असावा.

ब्राझीलचे दंगेखोर लोक नव्या राज्यव्यवस्थेस ही कबूल नसून ते राष्ट्राच्या संरक्षकांवर चाल करीत आहे.

बाबे बर्मा ट्रेडिंग कंपनीच्या भागीदारांना यंदां १८ टक्के व्याज मिळालें व गुदस्ताही इतकेंच मिळालें होतें. ब्रह्मदेश खालसा करण्यास कारण झालेली हीच कंपनी आहे.

ठा० अ०

न्यूयार्क येथें पाण्याचा दुष्काळ पडला आहे व त्यामुळें कित्येक कारखानें बंद पडले आहेत. या कारखान्याच्या बंदीनें ३०,००० माणसें रिकामीं झालीं आहेत.

खोंड मेंढ्या सारखें शिंग—तारीख २ आक्टोबर रोजीं बर्मिंग हाम येथील जनरल इस्पितळांत एक बाई आली. तिला एडक्या सारखें ९ इंच लांबीचें एक शिंग आलें असून त्यास एडक्याच्या शिंगा प्रमाणें करवे ही होते. सुमारें ६ वर्षां पूर्वीं तिच्या कपाळावर कांहीं होतें असें तीस वाटलें पुढें हळू हळू वाढतां वाढतां सहा वर्षांत तें इतकें वाढलें. त्या पासून तीस कांहीं इजा होत नसे. तें कापतांना फार जड गेलें तरी डाक्टरांनीं तें साफ कापून काढलें. ह्या शिंगाची बाईस लाज वाटे ह्मणून तें झाकण्यासाठीं बाईनें एक लोकरीची पिशवी केली होती.

शु० सू०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्षाची | अगाऊ रु० ९ | डांक हाशील | ०।३ |
| सहामाही | " ३ | " | ०८ |
| सालअखेर | " ७ | " | १०८ |
| किरकोळ अंकास | | | ०४ |

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १
पुढे दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs· 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines...2/Rs
per line over10...4 as
Repetition per lin3as

VOL XXV AKOLA MONDAY 21 DECEMBER 1891 NO 49

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख २१ माहे दिसेंबर सन १८९१ इ० अंक ४९


## मांसाहार वर्ज्य करण्याचीं चोवीस कारणें.

पहिलें कारणः— ग्यासेंडी, लीनियस, हार्वेइम, क्युव्हीर, लॉरेन्स, बेल, ऑवेन, इत्यादि मोठमोठ्या विद्वान लोकांचें मत असें आहे कीं, मनुष्याच्या शरीराच्या आंतील आणि बाहेरील रचनेवरून तो मांसाहारवर्जक प्राणी आहे. उच्च जातीच्या वानराची व मनुष्याची शरीररचना जवळ जवळ एकच आहे. एवढ्यावरून उभयतांची उत्पत्ती एकाच प्राण्यापासून आहे असें शोधक लोकांचें मत आहे. वानरें व माकडें, फळफळावळें आणि धान्य हेंच खाऊन राहतात, परंतु सवईनें तीं मांसाहारीही बनतात. तथापि त्यामुळें तीं बोदड, रोगिष्ट, व मंद होतात. मनुष्याचे दांत, मांसभक्षक व वनस्पतिभक्षक प्राण्यांच्याहून अगदीं निराळे आहेत, परंतु ते वानराच्या दांतासारखे आहेत. मनुष्याला वनस्पतिभक्षक प्राण्याप्रमाणें मोठा व अडचणीचा पक्वाशय आणि अन्नमार्ग नाहीं. तसेंच मांसभक्षक प्राण्याप्रमाणें दिशवीसारखा कोठा, मोठें यकृत, व लहानशीं आंतडें हेंही त्याला नाहीं. इत्यादि रचनेवरून तो धान्यभक्षकच प्राणी आहे असें दिसतें. त्याला सुळे दांत आहेत, परंतु मांसभक्षक प्राण्याच्या सुळ्या दांताप्रमाणें ते त्याच्या उपयोगी नाहींत. मानवी प्राण्यापेक्षां वानरांचे सुळे दांत अधिकपूर्ण अवस्था पावलेले असतात; परंतु वानरें त्यांचा उपयोग स्वसंरक्षणास व कठिण फळफळावळें फोडण्यासच करितात. धान्य व फळ हेंच मनुष्याचें खरें अन्न असून शरीरवृद्धीस लागणारीं सर्व द्रव्यें यापासून त्यास मिळतात. आणि त्या अन्नाची पचनक्रिया व पोषण क्रिया सहजगत्या होऊन त्यापासून त्याला उपद्रव होत नाहीं. व अशाच अन्नानें हाडें व स्नायु सशक्त बनून सदृढ लोक निपजतात.

दुसरें कारणः— शरीर पोषणास महत्वाचें असें मांसापासून मिळणारें द्रव्य वनस्पतीपासून सहज मिळतें. मांसामध्यें पिष्ट आणि साखर नसल्यामुळें व त्यामध्यें मांस उत्पन्न करणारीं द्रव्यें अधिक असल्यामुळें, तें अपुरें अन्न आहे. शिवाय असें कीं, धान्य, डाळी, फळें इत्यादिकांपासून पाहिजे त्या हवेंत व पाहिजे त्या स्थितींत योग्य असें अन्न पसंत करितां येतें, इतकेंच नव्हे, परंतु त्यामध्यें मांसवृद्धि करणाऱ्या द्रव्याचें प्रमाण मांसापेक्षां अधिक सांपडतें. कांहीं वनस्पतींमध्यें शरीरांतील उष्णता व शक्ति देणारीं द्रव्यें ( ह्मणजे स्टॉर्च, साखर व तेल, इत्यादि ) मांसापेक्षां अधिक सांपडतात हा विशेष फायदा आहे. दोहोंमधील फायब्रीन व आल्ब्यूमेन ( रक्तांतील विशेष द्रव्यें ) ह्यांमध्यें मुळींच अंतर नाहीं असें रसायनशास्त्र सांगतें.

तिसरें कारणः— किती जरी बंदोबस्त ठेविला तरी मांसामध्यें अपकारक द्रव्यें नाहींत असें कधींही होत नाहीं. जीवंत शरीरांत ऱ्हास व नवीन भरती सदा होत असल्यामुळें, तंतूमध्यें व रक्तवाहिन्यांमध्यें सदा थोडेबहुत तरी नाश पावलेले परिमाणू असून ते शरीरांतून बाहेर पडण्याच्या मार्गांत असतात. इतक्यामध्यें मृत्यु येऊन जर हा त्यांचा क्रम थांबला तर ते तसेच मांसांत राहतात तसेंच सूक्ष्म वाहिन्यांमध्यें अशुद्ध रक्त पुष्कळ असतें ह्मणून अशा रीतिचीं अशुद्ध द्रव्यें मांसामध्यें थोडी बहुत तरी असणारच.

चौथें कारणः— चांगल्या आधारावरून असें दिसतें कीं, बाजारांत मारण्यास आणलेल्या जनावरांपैकीं शेंकडा ऐंशी जनावरें रोगी असतात. कारण, त्यांचें अपक्व पोषण, व त्यांना पुष्ट करून विकण्याजोगीं करण्यासाठीं त्यांस पाहिजे तशा रीतीनें वागविणें हें होय. अनेक सांसर्गिक रोग जनावरां पासून मनुष्यास होतात असें प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध झालें आहे. मांसापासून जनावरांची सात, सन्निपात, फुफुसालंकार, मुखरोग धांवरें, व गंडमाळा इत्यादि विकार मनुष्यास होतात.

पांचवें कारणः—वनस्पतींवर उपजीविका करणाऱ्या लोकांना मांसभक्षक प्राण्यांपेक्षां रोग कमी होतो; इतकेंच नव्हे, परंतु मांस सोडून वनस्पतीचा आहार केल्यामुळें पुष्कळांचे संधिवात अग्निमांद्य अवष्टंभ, फेंपरें, वात इत्यादि दुर्धर रोग दूर झालें आहेत. कित्येकांच्या दुर्धर व्याधींच्या यातना मांसाहार वर्ज्य केल्यानें नाहींशा होऊन ते सुखानें राहिले आहेत. जखमा, आघात, व शस्त्रक्रिया पावलेले लोक मांसवर्जित अन्नापासून लौकर बरें होतात, इतकेंच नव्हे, परंतु कोणचेही उपायांनीं बरे न होणारे जुने व्रण, मांसवर्जित अन्नानें बरे होतात. परोपकारी जॉन हावर्ड हा मांसाहार न करणारा असल्यामुळें अंधारकोठड्या इत्यादि घाणेरड्या व रोगी ठिकाणांत पडत असे तरी त्याला कांहीं बाधा झाली नाहीं.

सहावें कारणः— ज्या वैद्यशास्त्रज्ञ लोकांनीं सुरासेवनाची तलफ व त्याचें कारण ह्यांविषयीं चांगला विचार केला आहे, अशा लोकांच्या शोधावरून व अभिप्रायावरून असें सिद्ध होतें कीं मांसाहाराचें सेवन जसजसें अधिक करावें तसतशी मद्यप्राशनाची तलफ जोरावते; व जसजसा मांसाहार कमी करावा त्या मानानें सुरासेवनाची इच्छाही कमी होते. ह्या भयंकर रोगापासून मुक्त होण्यास फक्त मांसाहार सोडल्यानेंच उपयोग झाला, असें पुष्कळदां पाहण्यांत आलें आहे.

सातवें कारणः— जगाच्या उत्पत्तीच्या वेळची परमेश्वराची आज्ञा अशा होती; तो ह्मणतो "ह्या पृथ्वीवर असणाऱ्या बीज येणाऱ्या वनस्पती मींच तुह्मांला दिल्या आहेत; व फळें व बीज उत्पन्न करणारीं झाडें मींच तुह्मांला दिलीं आहेत. सबब यांचा मांसाच्या जागीं उपयोग करा." जगदुत्पत्तीच्या वेळेस जी ह्मणून चांगली शरीररचना झाली तिच्यहून कांहीं भिन्न शरीराची रचना आतां नाहीं, असें बायबलावरून व इतर पुराव्यावरून स्पष्ट होत आहे.

आठवें कारणः—निरुपायाच्या स्थितीमुळें मनुष्य पूर्वीं मांसाहारी कदाचित् बनला असेल; तथापि जेव्हां परमेश्वरानें मनुष्याचे वाईट कल बंद करण्यासाठीं कायदे केले, तेव्हां मात्र मनुष्याची पाहिजे तें खाण्याविषयींची मोकळीक कमी झाली. ज्यू लोकांच्या धर्मांत व अगदीं प्राचीन ख्रिती धर्मामध्यें सुद्धां गुलामगिरीची मोकळीक असे, परंतु अलीकडे योग्य विचार होऊन ती आतां सर्व राष्ट्रांतून नाहींशी करावी असें सर्वांस वाटतें. वरच्या प्रश्नाप्रमाणेंच अन्नाच्या प्रश्नाचें उत्तर मागील कायद्यावरून न देतां धर्मपुस्तकांतील तत्वांस अनुसरूनच दिलें पाहिजे. कारण मागील कायदे आलीकडील मांसभक्षकांना देखील मान्य नाहींत.

नववें कारणः—मांसरहित अन्नापासून प्राण्याचे मनोविकार शांत राहतात, विचारबुद्धि चांगली राहते, नीतीची वृद्धि होते व स्वभाव शांत राहून सर्वांशीं मिळून राहण्यासारखा असतो. मांसरहित अन्न जसें शरीर निरोगी ठेवितें, तसेंच शरीराची नीतीही सुधारते व मानसिकशक्ति वाढविते. ह्मणजे असें होतें कीं, शरीररूपी यंत्र स्वच्छ व शुद्ध राहिल्यामुळें त्याची क्रियाही सरळ व शुद्ध चालते.

दहावें कारणः—मनुष्याची मुखचर्या मांसरहित अन्नापासून सुंदर व सतेज राहते. अडाम् स्मिथ हा आपल्या 'राष्ट्राची संपत्ति' नांवाच्या पुस्तकामध्यें असें ह्मणतो कीं, विलायतेंतील अयर्लंडमधील बटाटे वगैरेवर निर्वाह करणाऱ्या खालच्या वर्गांतील लोकांमध्येंच सुंदर अशा स्त्रिया सांपडतात. ज्यानीयल व त्याचे मित्र फक्त डाळ खाऊन पाणी पीत असत, परंतु ते मांस खाणाऱ्या मुलांपेक्षां सुरेख व लठ्ठ असत.

अकरावें कारणः— प्राणी वाढवावयाचें, त्यांना दुर पाठवावयाचें, व कसयाकडून त्यांचा नाश करावयाचा इत्यादि प्रसंगीं मनाला वाईट वाटणारा देखावा, रक्तपात, त्यांचे करुणस्वर इत्यादि प्रकारची क्रूरता पाहणें हें भूतदया असलेल्या मनुष्यांना व स्त्रियांना अगदीं आवडत नाहीं.

बारावें कारणः— खाटकाच्या धंद्याची अवश्यकता शास्त्रीयरीत्या व अनुभवरीत्या मुळींच नाहीं, इतकेंच नव्हे, परंतु तो धंदा मानवीप्राण्यांच्या अगदीं तोट्यासच कारण आहे असें असून कांहीं लोकांना असल्या घाणेरड्या, क्रूर, व कंटाळवाण्या धंद्यास लावणें हें अप्पलपोटेपणाचें व निर्दयपणाचें काम होय.

तेरावें कारणः— सर्व जमिनीचा उपयोग धान्य, फळफळावळ इत्यादिकांकडे व गाई, बैल, ह्मशी, शेळ्या इत्यादिकांच्या पोषणासाठीं गवताकडे जर केला तर त्यांच्या दुधदुभत्यानें व जमिनींतील धान्यापासून अन्नाचा पुरवठा, परक्या देशांतून न आणितां, पाहिजे तितक्या अधिक लोकसंख्येचें पोषण करितां येईल.

चवदावें कारणः— धान्यें, फळफळावळ व भाजीपाला यांची लागवड केल्यानें पुष्कळांना उद्योग धंदा पुरून ते निरोगी, सशक्त, व सुखी राहतात.

पंधरावें कारणः—मांसाहाराची जरूर नाहीं व केवळ खेळासाठीं हत्या करणें अमानुष होय, असें जर वाटेल तर पारधीचे पक्ष्यांदिकांसाठीं राखून ठेविलेली जमीन लागवडीच्या उपयोगी पडून अधिक लोकांना उद्योग लागून अन्नाचा पुरवठा वाढेल.

सोळावें कारणः— मांसामध्यें पाण्याचा अंश अर्ध्यांपासून तीन चतुर्थांशपर्यंत आहे. त्यामुळें तें गहूं वगैरे धान्यांपक्षां दहापटीपासून वीस पटीनें अधिक महाग पडतें. कारण, बहुतेक धान्यांत शेंकडा सोळा भागच पाणी असतें. लोणी दहीं व दुध यांसहित अशा वनस्पतीच्या अन्नापेक्षां मांस व वनस्पतीचे मिश्रित अन्नास प्रत्येक मनुष्यास तिप्पट चौपट अधिक खर्च येतो.

सतरावें कारणः— शेंकडों गरीब कुटुंबांनां मांसाहाराच्या संवईमुळे फार ओढाताणीनें आत्मसंयमन करून निर्वाह करावा लागतो त्यांना धान्य आणि फळफळावळें असें स्वस्तें व फायद्याचें अन्न मिळून अशी काळजी करण्यास नको. इतकेंच नव्हे, परंतु थोडासा पैसा मागें पडून तो घरांतील व्यवस्थेस, विद्येकडे व शरीराचे आरोग्यतेसाठीं हवापाणी बदलण्याकडे, व सृष्टीच्या चमत्कारांचा अनुभव घेण्याकडे लावण्यास सांपडेल.

अठरावें कारणः— मुलांना स्वभावतः पिकलेलीं फळें आणि धान्याचे पदार्थ मांसापेक्षां अधिक आवडतात, व त्यांवर तीं चांगलीं पुष्ट बनतात. त्यांना मांसापेक्षां धान्याचें अन्न अधिक चांगलें मानतें. खरोखर आईबापांचा किता नसेल तर लहान मुलांना मांस भक्षणाची संवय फारशी लागणार नाहीं. जोंपर्यंत प्राण्यांना दुःख देऊन आपल्या खाण्यासाठीं त्यांचा प्राण घेणें हें जरूर व हक्काचें आहे असें मुलांना शिकविलें जात आहे, तोंपर्यंत भूतदया व दुसऱ्या प्राण्यांना दुःख देण्याची भिति त्यांच्यामध्यें उत्पन्न करणें असंभवनीय होय.

एकोणिसावें कारणः— मनुष्याच्या पराक्रमामध्यें, जयामध्यें व वैभवामध्यें जगाच्या आरंभापासून जे प्राणी मदत करिताहेत ते मांसभक्षक नाहींत. तथापि ते शक्तिमान सहनशील, धैर्यवान, व चतुर असे आहेत. जगांतील सर्व श्रम घोडे, बैल, खेचरें, हत्ती,

उंट इत्यादि वनस्पतिभक्षक प्राण्यांकडूनच होतात. घोडा सकाळपासून संध्याकाळ पर्यंत विश्रांती न घेतां श्रम करीत असतो त्याची बरोबरी कोणच्याही मांसभक्षक प्राण्याच्या हातून होत नाहीं.

विसावें कारणः— वनस्पतिभक्षक प्राण्यांचे स्नायू वजनदार व जोमदार असून मिश्र अन्न खाणाऱ्याच्या स्नायूंपेक्षां ते अधिक शक्तीचीं कामें करितात. प्रोफेसर फोर्ब्स ह्याने मांसभक्षक इंग्रज, भाजी पाला खाणारे स्काचमेन, व बटाटे आणि भाकरी खाणारे ऐरिश लोक, ह्यांच्या संबंधानें अनुभव घेऊन पाहतां इंग्लंडच्या लोकांपेक्षां स्काटलंड व ऐर्लंडचे लोक जास्त उंच, अधिक वजनदार, आणि विशेष मजबूत आहेत असें सिद्ध करून दाखविलें आहे. लेपलंडचे मांसभक्षक लोक बगद्दी खुजे आहेत. परंतु तशाच हवेंत राहणारे व जमिनींतील उत्पन्न केलेल्या पदार्थांवर रहाणारे फिन्स लोक स्वीडन आणि नांवच्या लोकांप्रमाणें सुरेख आहेत. डाक्टर लॅन ह्मणतात कीं हें सर्व अंतर अन्नाचें होय.

एकविसावें कारणः— राष्ट्रांच्या इतिहासामध्यें ज्यांची बरोबरी कोणी केलेली नाहीं. असे जे स्पार्टन लोक, ते शरिरानें मजबूत असून शक्तिमान, बुद्धिमान, व श्रम सोसणारे मोठे बहादर असे होते. ते सुद्धां मांसाहारवर्जक होते तसेंच ग्रीस आणि रोमच्या जय पावलेल्या वेळचें सैन्य ही मांसाहारवर्जक होतें. त्यांच्या ह्या साध्या संवयी सुटतांक्षणीच त्यांचा ऱ्हास झाला. ग्रीसमधले तालीमखान्यांतील कसरत करणाऱ्या लोकांनीं वनस्पतीचें अन्नच देत असत. परंतु पुढें जेव्हां मांस देऊं लागले तेव्हां पूर्वींचे मोठे तालीमबाज लोक आळशी व मूर्ख झाले.

बाविसावें कारणः—जगापुढें ज्यांनीं नवे विचार मांडिले आहेत व ज्यांनीं नवें ज्ञान संपादन केलें आहे, असे बुद्ध, प्लेटो, फ्लूटार्क, मिल्टन, न्यूटन, पोप इत्यादि विद्वन्मुगुटमणी हे मांसाहारविरहित होते.

तेविसावें कारणः— वनस्पतींच्या अन्नानेंच मनुष्याची आयुष्यवृद्धी, आरोग्य व सुख हीं प्राप्त होतात असें सिद्ध आहे. त्याअर्थी न्याय परोपकार व दया हीं मांसभक्षणाच्या दुष्ट सवयीस मंजुरी देत नाहींत.

चोविसावें कारणः—संपन्न देशामध्यें चैन व अनियमितपणा वगैरे दुर्गुणांला नाहींसें करणारें मांसवर्जित अन्नच होय. मांसरहित अन्ना पासून परोपकार, दया व न्याय हीं सर्वांचे अंगीं उत्पन्न होतात. निरुपद्रवी प्राण्याच्या जिवितांविषयीं बेपरवाई नाहींशी होते- व त्याच अन्ना पासून मनुष्याच्या उत्कर्षास लागणारे असे जे कित्येक सद्गुण ह्मणजे नेमस्तपणा, काटकसरीनें वागणें, स्वच्छता आणि परोपकारबुद्धी इत्यादिकांस उत्तेजन मिळतें.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य ७ शके १८१३

राष्ट्रीय सभा नागपुरास येत्या २६ वें तारखे पासून भरणार होती परंतु मद्रासेकडील व इतर ठिकाणच्या लोकांच्या विनंतीवरून ती तारीख २८ दिसेंबर सन १८९१ पासून सुरू व्हावी असें नागपूर-वऱ्हाड रिसेप्शन कमिटीनें ठरविलें आहे. तेव्हां चालू सालच्या बैठकीस पुढील सोमवारा पासून आरंभ होईल.

राष्ट्रीय सभेचा दिवस पुढें ढकलल्यामुळें सामाजिक सभेचा दिवस ही बदलला आहे. नवीन ठरावा प्रमाणें ही सामाजिक सभा मंगळवारीं ह्मणजे राष्ट्रीय सभेच्या दुसरे दिवशीं भरविण्यांत येणार आहे.

---

सन १८९१ त अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांत चिकागो शहरीं सर्व जगाचे प्रदर्शन होणार आहे तेथें यांत्रिक व हस्त कौशल्याच्या सुंदर सुंदर चीजवस्तु सर्व खंडांतून एकत्र करणार आहेत. हें प्रदर्शन आजपर्यंतच्या सर्व प्रदर्शनां पेक्षां फार मोठें व भव्य होणार असल्यामुळें त्या साठीं कित्येक वर्षांपासून अमेरिकन लोकांचा सतत सारखा उद्योग चालला आहे. आणि हल्लीं प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या सूचीपत्रा वरून पाहतां खरोखरच सर्व दुनियेंत हा अजब तमाशा होणार आहे. हिंदुस्थान देशांतून त्या प्रदर्शना निमित्त काय काय पदार्थ कोणकोण पाठविणार आहेत किंवा निदान त्या प्रकारणासंबंधानें इकडे कांहीं चळवळ चालूं आहे असें अशांतला ही कांहीं पर्याय दिसून येत नाहीं.

सदहू प्रदर्शना संबंधानें विशेष नवलाची एक गोष्ट कळली आहे. त्या जगाच्या जत्रेंत धर्मप्रदर्शन करण्याविषयीं निराळी कमिटी नेमली असून तिचे प्रेसिडेंट जान हेनरी बारोज या गृहस्थानीं हिंदुधर्माची माहिती कळविण्यासाठीं या देशांतील लोकांस निमंत्रण केलें आहे. या प्रदर्शनानें जगाच्या आधिभौतिक संपत्ती विषयीं अटकळ करितां येईल त्या प्रमाणें मनुष्याच्या मानसिक उन्नतीचें प्रमुख दर्शक ह्मटलें ह्मणजे मनुष्यानें कल्पिलेल्या व चालविलेल्या धर्मसंस्था हीं होत. ही धर्म परिषद् नानाविध धर्मसंस्थांच्या आख्यायिका व त्यांच्या तत्वांची परिस्फूटता करून सर्व अनादि कालापासून प्ररूढ असलेल्या धर्मांचें सार जगापुढें मांडणार आहे. अनेक राष्ट्रें प्रस्तुत काळीं दळणवळणाच्या बहुत बहुत गोष्टींनीं निकट संबंधांत आलीं आहेत आणि तीं परस्परांशी स्नेह भावानें वागत असतात तेव्हां अशा प्रकारच्या राष्ट्रांमध्यें धर्मविचारात एकाग्रता होणें हेंही आवश्यक आहे. आपण सर्व माणसें प्रचंड महासागरांनीं निराळीं आहों, भिन्न भिन्न जन्मभाषा व भिन्न भिन्न धर्मपंथ यांनीं आपण एकमेका पासून निराळे व परके बनलों आहे तरी आपण खरोखर सर्वजण एकच आहों तरी ही एकरूपता होईल अशी मनुष्यमात्रानें आशा मात्र करावी याहून निराळी घटना आपणांस साध्य नाहीं. प्राचीन प्राचीन धर्मग्रंथांचा अभ्यास हा केवळ आपले विचार प्रगल्भ व्हावे व तशा विचारांची गोडी लागावी अशा हेतूनें केला पाहिजे. या परिषद्गाचा हेतु धर्मवाद वाढवावे किंवा तद्विषयक दूही माजवावी असा नसून जगावरील महान महान धर्मपंथाची दिशा लोकास दाखवावी, अनादिसिद्ध व सत्य सत्य विचारांची माळ तयार करावी आणि तिच्या योगें सर्व लोका एक ग्रंथीनें सुविचार संपन्न करावे व त्यांच्यामध्यें परिणामीं सख्यभाव वाढवावा अशा प्रकारचा आहे. वरील परिषदाचें एक मत ठाम आहे कीं ईश्वर ह्मणून कोणी आहे, त्याच्या अस्तित्वाला प्रमाणें आढळतात, धर्मसंस्थेनें मनुष्याचें कोटकल्याण झालें आहे व प्रत्येक राष्ट्रांतील लोकांच्या सामाजिक व्यवस्थेवर धर्माचे व्यापार बहुविध घडतात. सर्व तऱ्हेच्या धर्म विचारांचा मूळपाया शोधून काढणें, युगानुयुगें धर्माची स्थिति काय आहे तीचा परिणाम भाषेवर, कलाकौशल्यावर, व्यापार धंद्यावर, व राज्यव्यवस्थेवर काय घडला आहे, धर्माच्या अभिवृद्धीनें नेमस्तवर्तन, शुद्धाचरण, आणि शास्त्राच्या शोधाचें निरंतर समर्थन इत्यादि गोष्टी कसकशा अंमलात येत चालल्या आणि एकंदरीनें परमेश्वराचें वैभव व मनुष्याची उन्नतावस्था हीं कोणत्या प्रकारें घडून येतील इत्यादि विषयांचें या धर्मपरिषदांत परिशीलन व्हावें असा संकल्प ठरला आहे.

हिंदुधर्माचा विजयध्वज एवढ्या प्रचंड जनसमूहामध्यें फडकत आहे कीं अशा धर्माचा यथार्थ नकाशा चिकागोच्या धर्म परिषदा समोर दाखविला गेला नाहीं तर ती सभा एका चतुर्थांश जगाविषयीं अज्ञानावस्थेंत आहे असा तिजवर मोठा दोष येईल. हिंदुधर्माच्या आज्ञा अत्युत्तम कोटींतल्या आहेत आणि नीतितत्वांचें रत्नभाण्डार आहे असा आमच्या लोकांचा पक्का व निश्चयाचा ग्रह आहे तेव्हां अ.पल्या धर्ममतांचें प्रदर्शन जगापुढें मांडण्यासाठीं इंग्रजी भाषाभिज्ञ व हिंदुधर्माचे व प्राचीन आदिवचनांचे कट्टे अभिमानी विचारसंपन्न व विद्वान लोक ही अशील संधि दवडणार नाहींत अशी आमची खात्री आहे. चांगल्या सुजाण व कुशल मनुष्यानें हिंदुधर्माची तरफदारी केली तर आमच्यामतें त्यांस अपयश निःसंशय न येतां त्यांचा बहुमान व फार वाहवा होईल. आमच्या महाराष्ट्रांत डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर पी. एच. डी. व रावबहादुर महादेव गोविंद रानडे असे कांहीं मोजकेच गृहस्थ या जगाच्या यात्रेस जाऊन हिंदुधर्माचा झेंडा उभारण्यासारखे आहेत तेव्हां तशा एखाद्या गृहस्थाची निवड होऊन त्यांचें तिकडे गमन होईल तर मोठ्या आनंदाची गोष्ट होईल.

---

इंग्लंडांतील राष्ट्रीय सभेच्या ब्रिटिश कमिटी कडून सन १८९३ सालीं निदान शंभर मुखत्यारांस विलायतेंत सभा भरविण्या विषयीं पाचारण झालें आहे. या प्रतिनिधी मंडळीचा पाहुणचार सदहु कमिटीनें आपल्या शिराबर घेतला आहे. तेव्हां या विलातच्या मोहिमे संबधानें मोठ्या आगत्याचा विचार करण्यासाठीं सर्व राष्ट्रांतील लोक एकत्र गोळा होणार आहेत. शंभर मंडळी बहुमतानें निवडून काढून त्यांच्या जाण्या येण्याच्या खर्चाविषयीं ही तजवीज नागपुरासच कायमची ठरणार आहे. राष्ट्रीय सभेची बैठक विलायतेंस भरविणें ही गोष्ट सामान्य नाहीं. ती फार दुर्घट व कष्टसाध्य आहे. पैसा भारी पाहिजे. श्रीमान, विद्वान, व धनसंपन्न असे देशाभिमानी लोक मिळाले पाहिजेत. विलायतच्या बैठकीविषयींच्या निर्णयावर सर्व देशाची मदार आहे. सर्व जगांस आह्मी कलकत्ता मुक्कामीं गतवर्षी कळविलें आहे कीं, राष्ट्रीय सभेची बैठक विलायतेस भरविण्याचा आमचा छत निश्चय आहे. नागपूरच्या ठरावा बरहुकूम आपली किंम्मत इतर राष्ट्रें लावण्यास चुकणार नाहींत. आमच्या आंगचें पाणी जोखण्याची संधि आपणच होऊन त्यांस आम्ही दिली आहे. कसोटीस लागण्याची वेळ समीप आली आहे तेव्हां समरामीं उभे राहण्यास कोण कोण भट पुढें येतात पाहावें.

---

वेडरबर्न साहेबांनीं ब्रिटिश कमिटीच्या अध्यक्षाच्या नात्यानें पत्र लिहिलें आहे त्या अन्वयें दुसरा एक प्रश्न राष्ट्रीय सभेपुढें यावा असें आम्हांस वाटतें. पार्लमेंटच्या सभा सदांच्या नव्या निवडानिवडींत ग्रेटब्रिटन देश दंग होऊन जाईल तेव्हां ती राष्ट्रीय गडबड आटोपल्यावर व नव्या प्रधान मंडळानें राज्यसूत्रें हातीं घेतल्या बरोबर राष्ट्रीय सभेची बैठक ठरवावी हें ठीक आहे तरी निवडानिवडीच्या प्रसंगीं हिंदुस्थानचे कांहीं गृहस्थांनीं १८८९ साला प्रमाणें तिकडील राज्यकारभारा विषयीं इंग्लिश लोकांस खरी खरी हकीकत कळविण्या साठीं अगत्य यावें अशी सूचना आली आहे. ही निवडानिवड बहुतकरून पुढील सालच्या दिवाळपांत होईल असा रंग आहे तेव्हां ती अमोल संधि ब्रिटिश कमिटीच्या सल्यानें सफळ व्हावी ह्मणून कांहीं गृहस्थांस निवडून धाडण्याविषयीं राष्ट्रीय सभेनें नागपुरासच विचार केला पाहिजे. हिंदुस्थानचे पिल्लूं ग्रेटब्रिटनच्या चळवळींत सामील झाल्यानें या देशाच्या राज्यकारभारा संबंधाउद्गार विचार प्रगट करण्याऱ्यांस पार्लमेंटांत प्रतिनिधी निवडून घेणें सहजीं सुलभ जाईल, आणि तिकडे इंडिया बद्दल लोकमत चांगलें जागृत होईल. राष्ट्रीय सभेची पुढें वाट काय असा प्रश्न येत्या नागपूरच्या बैठकीस निघणार आहे. पुणें व बंगाल कडील वर्तमानपत्रांतून राष्ट्रीय सभेची बैठक हिंदुस्थानांतही मोडूं नये अशा मतलबाचे लेख असतात. विलायतेस सभा भरविली तरी देखील दरसाल त्यांच्या मतें हिंदुस्थानांत सभा भरली पाहिजे. राजकीय प्रकरणांत सर्व देशाचें पाऊल नुकतेंच पुढें पडत आहे तोंच राष्ट्रीय सभा इंडियांत बंद केली ह्मणजे मनोराज्यांतल्या सृष्टी प्रमाणें सर्व संस्था विलयास पावेल अशी मोठी भिती आहे. ही भिती कितपत यथार्थ आहे या विषयीं नागपुरास विचार होईल तेव्हां त्या संबधानें आह्मास आतां कांहीं सांगता येत नाहीं. तरी साधक बाधक गोष्टी ज्या दिसतात त्या आह्मी नमूद करीत आहों. ह्यूम साहेब व ब्रिटिश कमिटी यांच्या मतें या पुढें हिंदुस्थानांत बैठक नको आहे. त्यांच्या सल्याची मातबरी आह्मी विशेष मानतो किंबहुना त्यांच्या दूरदर्शी व अनुभविक सांगण्या प्रमाणें आपण अगोदर वागलें पाहिजे. जर १८९२ सालीं इंडियांत बैठक भरविली तर राष्ट्रांतील प्रमुख मंडळीस विलायतच्या बैठकी संबंधानें पुरेसा अवकाश मिळणार नाहीं आणि दोन स्थळीं बैठकींच्या व्यवस्थेंतच त्यांचा सर्व काळ व्यर्थ जाईल. १८९३त निवडानिवड होऊन १८९४ सालावर विलायतची

बैठक लांबली तरी देखील दोन वर्षांची मुदत विलायतच्या सफरीला फार आहे अशांतला पर्याय नाहीं. संपत्ति, विद्वत्ता व बुद्धिमत्ता या त्रयींचा संगम एके स्थळीं विरळा घडतो आणि या संगमा शिवाय विलायतची सफर वृथा आहे तेव्हां त्या संबंधानें तिन्ही गोष्टीची जुळवाजुळव करणें काम अवघींचे व विचारांचे आहे हें लक्षांत आणलें म्हणजे वरील मुद्दत फार नाहीं असें आढळेल. विलायतच्या मोहिमेचा जयापजय आपल्या सामुग्रीच्या बळावर आहे त्या अर्थी हिंदुस्थानांतल्या बैठकीचा निदान दीडलाखाचा खर्च दरसाल वांचविल्यानें आपणास निराळी मोठी कुमक मिळणार आहे. पुण्याची मंडळी ती बैठक पुण्यास भरविण्यास कबूल आहेत त्या बद्दल आम्ही आनंद मानतो परंतु इंडियांत बैठकी चालू ठेवल्याच पाहिजेत हा प्रश्न तशा व्यवस्थेनें उलगडला असें आम्हांस वाटत नाहीं. शिवाय पुण्यासच समारंभ होत गेल्यानें हल्लीं सारखा फायदा होईल किंवा नाहीं याबद्दल ही भ्रांति आहे. राष्ट्रीय सभेची बैठक विलायतेस हालविल्यानें राष्ट्रीय सभा मोडली असें होत नाहीं. तिची चळवळ सर्व राष्ट्रांत कायमच राहणार आहे. राष्ट्रीय सभा तिच्या सात वर्षांच्या अस्तित्वानें अभंग व चिरस्थायी आहे अशी सर्वांची खात्री होऊन चुकली आहे. तिचें अद्भुत सामर्थ्य व राजकर्त्यां करवी तिची भावी मानमान्यता ही लोकांच्या नजरे समोर वागत आहेत तेव्हां थेट पार्लमेंटच्या दरवाज्या पर्यंत हिंदुस्थानची दाद पोंचविण्यास स्थानिक अडथळे व व्यत्यय थोडे येतील तितके चांगले.

## The Berar Samachar

MONDAY, DECEMBER 21, 1891

'Lady Dufferin fund' is an excellent thing to proclaim from the house-top. There can be no two opinions in regard to the goodness of the fund. It is a noble aim to grant female medical aid to the women of India. The history of the institution is well known to all. Its general progress is satisfactory though not much inviting. Berar is no exception to the fact that all provinces in India have tastefully appreciated the good service which the Fund is intended to render to the poor and helpless women in the nation. It has constituted a separate provincial branch of the Central Fund. Mr. A. D. Chinoy the Honorary Secretary of the Berar Branch has requested us to give full and wide publicity to a letter which the officiating Commissioner Col. Mackenzie has sent to all the Deputy Commissioners in the province. Col. Mackenzie takes a bold step in the direction of the fund. He is perhaps ignorant of the truism that the request of a lord is a force upon a man. He has taken care to avoid all sorts of pressure and influence being allowed to play in the matter. The letter which we have received will give a correct idea of what is intended to be done with the fund in Berar as a thing of prime necessity. The letter stands as below: —

"The Provincial Lady Dufferin Fund Committee have it much at heart to start at least one female hospital in the Province partly to give women and children better attendance than they now can get and partly as a training school for provincial midwives to be sent out into the districts, but they are badly in want of funds.

It is estimated that a suitable building will cost from 17000 to 24000 rupees and that to maintain it will cost about 3000 per annum. The fund itself can afford towards a building Rs 5000 and the Amraoti Municipality have kindly promised another 1000. This leaves for building purposes about Rs. 18000 as the maximum estimate to be raised or an average per district of Rs. 3000 and it is thought that the major portion if not the whole of this sum might be easily got if local committees and native gentlemen of position and leading under your inspiration and guidance would call public meetings, explain the object of the institution and set themselves zealously to solicit and collect subscription.

It will afford philanthropic native gentlemen of means with the opportunity of honorably associating their names for ever with the best of charities through the endowment of rooms or wards to which their names would be given. At the request of the committee I commend the matter to your best attention and support. Subscriptions might be received at Tahsilees and remitted--but you will be careful that no improper pressure of any sort or kind is brought to bear. What is wanted are voluntary subscriptions to a charity (Dharm) which if only understood could not fail to be heartly supported.

If funds can be got to build only a single hospital the committee see their way to subsequently supporting it. What they would like to see would be two such hospitals started one at Amraoti and one at Akola but for a commencement they will be content with one.

If subscription lists are opened they should close by the 31st March next though, unless it is inconvenient, time may be given for money promised to be got in."

The Secretary Mr. Chinoy has not let slip the occasion to take a flight in the merit and usefulness of the proposed hospital. His soaring altruism makes a maze of the whole matter.

"Even Hindu gentlemen must admit that our women deserve more care and sympathy than our cows— and therefore if properly put before them it is thought that the energies now finding vent in Goorakshak Sabhas might very usefully be employed in founding a *Stri Arogya Rakshak Sabha*: that is a *Sabha* for the protection of female health—"

It is also amusing to note the mathematical calculations which his head had taken a turn to run upon. We shall be too glad if we realize them in no distant future. He remarks—

"The total population of the Province according to the Census of 1881 is 26, 72,673. This total, it is believed, has increased by about 8 percent. An average of one pice per head on the figures of 1881 would bring in over Rs. 40,000. Surely then with the many rich —the many more or less well-to-do: we should be able to raise what we want without soliciting any thing of the poor or those whose life is a struggle for existence. It is a reproach to a Province so advanced as ours not to have at least one female hospital."

It shall not be amiss if we anticipate the great pleasure Dr. Little will feel because he has got with him the King of Berar in his move for a female hospital in Berar.

---

Mr. P. N. Bose as the President of the Bengal Industrial Conference directed the attention of the people to the proper understanding of the term 'Technical Education' in the following particulars of its signification:—

"Yes, technical education is very badly needed in this country. But what kind of technical education is it that we want? Technical education may be briefly defined to be a training for the industries. In order to settle what kind of technical education is specially wanted, we must find out what industries are capable of special development. Now industries may be grouped under two heads:— (1) *Art industries*, such as carpentry, shoe-making, engraving, modelling, etc, that is to say, industries which have very remote, if any, connection with science. (2) *Science Industries* industries more or less dependent upon some branch or other of natural science, such as mining, glass-manufacture, cotton manufacture, soap making, tanning, &c. From what I have already said, it will be apparent that it is the science & not the art industries that require to be specially developed. There is not much room for expansion in the petty industries, such as carpentry, tailoring, shoemaking, etc. As I wrote in the *Calcutta Review* about four years ago (January, 1888). "It is not the making up of cloth so much as the manufacture of cloth, that is more particularly wanted in this country. Few people are in a position to use made clothes at all, far less clothes of fine cut or nice fit, or books and shoes of approved shape and fashionable make." Of furniture of any kind there is but little demand. Our wants in these directions and at best extremely limited and they are, we think, well enough supplied at present. Besides, such technical training as is needed for the handicrafts would, we believe, be best obtained at the existing shops. 'Whatever field there is for enterprise in them is being occupied, as witnessed by the tailors' shops of Chitpore road and the cabinent warehouses of Bow Bazzar."

He further argued that the fate of Indian Art is doomed. After pointing out the necessity of technical education in the domain of the science industries he alluded to the utter helplessness of the Government to assist us in this direction in spite of its often enunciated good intentions. In his description of the difficulties that beset the starting of industries he has illustrated his argument with a reference to the Railways in India. We quote it below because we think that will dispel the blessed delusion of material prosperity that haunts the advanced gentlemen of our society and open their eyes to the evils of English civilization:

"The extension of railways and the absence of a protective tariff of any sort have not only killed our industries but have also placed very serious difficulties in the way of their revival. We are all jubilant over the extension of railways. They have certainly added greatly to the comforts of travelling. But they have done not a little harm. If they have helped to mitigate the horrors of famines they also helped to cause them. For by carrying European wares cheaply into the interior they have been one of the main causes of the destructions of our industries; and the destructions of indigenous industries means increased pressure upon land. We who have received our education in English schools are imbued with ideas of free trade as much as English people are, or possibly more so. But it is time we should reconsider our ideas on the subject. I will let Englishman a high official of the Government of Bengal Mr. H. J. S. Cotton, speak on it. He says:—"Another suggestion of even more practical character is that the Government of this country should afford assistance to indigenous industries by protection. We were told in a recent official report with an air of exultation that India sets an example to the whole civilised world in the matter of free trade. But is it to the advantage of India itself that it should do so? This is a wide question and I cannot pursue at this late hour the discussions to which it gives rise. Different authorities will have different opinions on it but my brief analysis of the decay of Indian manufactures will have prepared you to expect my own personal conclusion, that the time is ripe for a careful consideration of current conviction on this subject." Every civilised country except England has its protection tariffs. India is, I believe, the only country which is forced to admit foreign manufactures without any kind of duty. It will, however, be futile to expect our Government to impose any duties which may even remotely partake of the nature of protection. Such protection as is needed for our present or future industries—and infant industries do require protection—must be given by us. The question for us to settle is, how is that to be done! Some time ago I heard that a Joint-Stock Company was to be formed on a large scale for the sale of articles of indigenous manufacture. The idea is a good one, and I hope it will be carried out. I have no doubt it will indirectly afford smoe amount of protection."

---

## वऱ्हाड.

मुंबई युनिव्हरसिटीच्या बी. ए. परिक्षेस २६४ उमेदवार बसले होते त्यांपैकीं १३० गृहस्थ पसार झाले त्यापैकीं वऱ्हाडांतील खालीं लिहिल्या प्रमाणें:—

मोरो केशव वामले ( वर्ग २ ) श्रीपाद कृष्ण कोल्टकर, बळवंत यादव खोलकुटे आणि विठ्ठल रंगो तारे.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं येथील हायस्कूलचे असि. मास्तर रा. रा. गंगाधर नारायण घाटे हे बी. ए. च्या परीक्षेंत पसार झाले.

कर्नल मेकेंझी आक्टि. कमिशनर हे पुढील सोमवार पासून दहा दिवस आकोल्यास मुक्काम करणार आहेत असें कळतें.

मलापूरचे देशमुख राजश्री संपतराव यांच्या खटल्यांतील आरोपी मीर जंगु वगैरे यांस हायकोर्डतानें विचारलें आहे कीं खालील कोर्टाची शिक्षा लहान आहे ती कां वाढवूं नये याचे कारण दाखवा. कारण काय दाखवितो पाहावें शिक्षा वाढविण्या संबंधानें हें वऱ्हाडांत पहिलेच उदाहरण होय.

सन १८९०-९१ सालच्या शाळाखात्या रिपोर्टाचा एक प्रत आह्माकडे आली आहे तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों.

---

नोटीस.

रहिमान वल्लद बिसमिल्ला राहणार बारशी टाकळी यांस कळविण्यांत येते कीं तुमच्या मालकीच्या शेताच्या खरेदीच्या ८० रु० पैकीं बाकीं देण्याचें राहिलेले तीन रुपये टाकळीच्या कारभारी पाटला मार्फत घेऊन आमच्या नांवचें खरेदीखत नोंद करून पोचतें करावें. आठ दिवसांत नच झाल्यास कोर्ट मार्फत तजवीज होईल कळावें. १८।१२ ९१ इ.

( सही )

लक्ष्मन वल्लद सोनबा सोनार दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार.

मुंबईच्या दीनबंधु पत्रावर जी अब्रूची फिर्याद झाली होती ती "माजिस्त्रेटानें काढून टाकली कारण त्यांत तथ्य नव्हतें" असें गेल्या दीनबंधूंत प्रसिद्ध झालें असून "दीनबंधूवर चाललेल्या बेअब्रूच्या खटल्यांत प्रतिवादी मि. लोखंडे यांणीं तक्रारीच्या उत्तराबद्दल भर कोर्टात दिलगिरी दर्शविल्या मुळें फिर्यादीनें फिर्याद काढून घेतली" असें वार्ताहर पत्रांत प्रसिद्ध झालें आहे; तेव्हां खरें काय हें समजण्यास मोठी अडचण पडते व त्याचा खुलासा दीनबंधुकर्ते करतील तर बरें होईल. कोणत्याही तऱ्हेनें असो, पण या सर्पसत्राप्रमाणें पत्रसत्राच्या वेळीं या खटल्याचा अपसांत निकाल झाला हें फार चांगलें असून ते त्या पक्षकारांस भूषणावह आहे असें आह्मांस वाटतें.

गोवेंप्रांत पोर्टुगीज लोकांच्या हातांत जाऊन गेल्या २९ व्या तारखेस ३८१ वर्षें झालीं व त्याबद्दलचा समारंभ त्या तारखेस गोव्यास झाला व मूळ संपादक अलफान्सो अलबर्क यांच्या नांवाचा जयजयकार केला! या वेळीं जुन्या इतिहासाचें दर्शक असें तेथील गव्हरनरजनरलांचें व्याख्यानही झालें. आमच्या सुधारकांनींहि असाच कांहीं प्रयोग सुरूं करावा हें अवश्य आहे. संमतीबिलाच्या कारणानें अमुक अमुक सुधारकांनीं, ख्रिस्ताच्या १८९१ सालीं, समाजांत शेष असलेला एकोपा नाहींसा करून तुटी व हाडवैर सांजविण्यास आरंभ केला. अशाबद्दल जरी ते वार्षिकोत्सव करूं लागतील तरीहि शोभण्यासारखा आहे.

यशोदेस कृष्ण पीत आहे व दोन अर्ध नग्न स्त्रिया उभ्या आहेत अशी पुण्याच्या चित्रशाळेंतील चित्रें विकत बसणाऱ्या नगरच्या एका दुकानदारावर व चित्रशाळेच्या म्यानेजरावर नगरच्या स्मिथ पाद्र्यांनीं २९२ कलमाप्रमाणें फिर्याद केली आहे असें तेथील पत्रावरून समजतें.

शाबास निजामसरकारची. निजामसरकारच्या कांहीं तालुक्यांतही दुष्काळ पडण्याचीं चिन्हें दिसत आहेत व तसा प्रसंग आलाच तर कशी काय व्यवस्था करावयाची वगैरे बद्दलची तिकडच्या कामदारांची अगोदर पासूनच तयारी चालली आहे असें सांगतात. पावसा आधीं हरळ काढणें हेंच शहाणपणाचें आहे; ह्मणून ते स्तुतीस पात्र आहे. १८७७ सालच्या दुष्काळाच्या वेळींही इंग्रजी अंमलातल्याही पुष्कळ लोकांचा निजाम सरकारानें प्रतिपाळ केल्याचें प्रसिद्ध आहे व या वरील व्यवस्थेवरून या वेळीं ही तें सरकार कंबर बांधून तयार आहे असें दिसतें. ईश्वरानें तसा प्रसंग आणूं नये ही सर्वांचीच इच्छा आहे, पण तो आलाच तर आणि तशा वेळीं निजामसरकारानें योग्य व्यवस्था केली तर, त्या सरकारची मोठी कीर्ति होईल यांत कांहीं शंका नाहीं. निझामसरकारची अशी तयारी चालली आहे असें इंग्रजी पत्रेंच सांगतात. पण इंग्रजी कामदारांची काय तजवीज चालली आहे हें ते कोठेंच सांगत नाहींत याचें नवल वाटतें तें ऐकण्याची लोकांची फार इच्छा आहे.

मुलतान व लाहोर यांच्या दरम्यान ओकरा स्टेशना शेजारीं मागच्या शनवारीं दोन आगगाड्यांची टक्कर होऊन तीस माणसें मेलीं व पुष्कळ जखमी झालीं. युरोपीयन उतारू थोडे असून त्यांस कांहीं इजा झाली नाहीं.

सातवरच्या नेटिव स्टेशमास्तरच्या निष्काळजीपणामुळें हा अपघात झाला अशा सबबीनें त्यास कैद केलें आहे.

उत्तर हिंदुस्थानच्या मीठ खान्यांत १९० रुपये दरमहाच्या दोन जागा भरावयाच्या असून त्या, उमेदवारांच्या परिक्षा घेऊन भरावयाच्या आहेत. परिक्षेस नेटिव घ्यावयाचे कीं नाहीं?

प्रिन्स डामरिंग हा इतक्यांत मुंबईस येईल आणि हिंदुस्थानच्या शिक्षणपद्धतीची माहिती करून घेण्याकरितां हिंदुस्थानांत प्रवास करील असें सांगतात.

ग्रेटब्रिटन ह्मणजे विलायतचा गेल्या नोवेंबरचा व्यापार मागच्या नोवेंबर पेक्षां निर्गत १४,००,००,००० रुपये कमी झाला व आयात ११,००,००,००० रुपये अधिक झाला असें सांगतात.

ता. २८ रोजीं कोबे येथें झालेला धरणीकंप अटकळीपेक्षां फारच भयंकर झाला व १८९४ नंतर हाच जास्त भयंकर झाला. याणें शहरांचीं शहरें गडप केलीं, तालुक्याचे तालुके नाहींसे केले, आणि ठिकठिकाणीं जमीन फाटल्या. त्या एकाच ठिकाणीं ७,५२९ या णसें मेलीं व ९,४९८ घायाळ झालीं ९०,००० घरांचा चुराडा झाला.

दक्षिण गावनर मधील रशियन प्रांतांत शंभर वर्षें जगणारीं माणसें थोडीच आढळतात. पण तेथें मस्तका नांवाचा एक माणूस पेनशनर असून हल्लीं १९३ वर्षांचा आहे व अजून पेन्शन खात आहे. त्याचा नातु ९० वर्षांचा आहे. इंग्रजी अंमलांतले पेन्शनर फार लवकर मरतात. ज्ञा०त्रा०

सरकारी जंगलांतून चरणाऱ्या जनावरांस चालूसालीं मोफत चरूं द्यावें असें सरकारानें ठरविल्याचें समजतें. खरें असल्यास फार चांगलें.

जबलपूर येथील एका मारवाड्यानें आपल्या खुशीनें ख्रीस्तीधर्म स्वीकारला असें समजतें. ख्रीस्तीधर्माचें काय रहस्य कळलें बेट्याला कोण जाणे.

शिकंदराबाद येथें एक नुकतेंच लग्न झालें. नवरा व नवरी वयानें फारच मोठीं ह्मणजे अनुक्रमें ९ व २ वर्षांचीं पाळण्यांत लग्न लविलें नाहीं हें नशीबच! आमच्यांत बालविवाह होत नाहींत असें ह्मणणाऱ्या दुराग्रही लोकांनीं हें अवश्य वाचावें.

उज्जनी शहरांत गस्त घालणारे पोलिस लोक रात्रीं व्यापाऱ्यांच्या दुकानांचीं कुलपें काढून त्यांतील माल उपटींत व कुलपें जशींच्या तशींच लावून ठेवीत. सरशेवटीं त्यांपैकीं एकास पकडलें.

कलकत्यास एका डब्ल्यू. डब्ल्यू. रेफर्ड नांवाच्या डाक्टरानें रक्तपितीवर रामबाण औषध शोधून काढलें आहे असें समजतें.

गोंव्याच्या मिठागराबद्दल गेल्या सालीं सरकारास निव्वळ ६०,००० रुपये फायदा झाला, तरी मिठावरील कर कमी करण्याची इच्छा सरकारास होत नाहींच! ज्ञा० पु०

क्षयावर उपाय— एक इंग्रजी पत्रांत या रोगावर एक चमत्कारिक उपाय लिहिलेला आढळला "सकाळचे प्रहरीं स्वच्छ जागेवर (रोज नवी) खळगी खणावी, व तींत तोंड ठेवून एक तासभर श्वासोश्वास करावा.

गेल्याचे मागील शुक्रवारीं अळंदीस भरलेली यात्रा निर्विघ्नपणें पार पडली. पोलिसांचा बंदोबस्त चांगला होता. करांचे उत्पन्न सुमारें ७०१० रुपये झालें.

सती संबंधानें खटला— बांकीपूर (पाटणा) भागांत एक बाई नवरा मेल्यावर सती जाण्याचा आग्रह धरून बसली; परंतु कायद्याप्रमाणें तसें करतां येत नाहीं असें तिला जवळच्या आप्तस्वकीयांनीं सांगू नयाचें प्रेत स्मशानांत नेऊन चिता रचून त्यास अग्नि दिला. तों मागाहून सुतपत्नीनें येऊन त्या चितेंत उडी टाकली. तेव्हां तावडतोब तिला चितेंतून ओढलें. परंतु तेवढ्या वेळांत ती जी भाजली पोळली त्याच्या योगानें दुसऱ्या दिवशीं ती मेली, परंतु त्याबद्दल १३ जणांवर पोलीसानें फिर्याद लादिली होती. फिर्यादीची सुनावणी होऊन आरोपीवर पुरावा न झाल्यामुळें म्याजि. नें त्यांस सोडून दिलें.

गेल्याचे मागील गुरुवारीं हौरा स्टेशन नजीक एका माल गाडीची व स्पेशलडाक गाडीची टक्कर होऊन माल गाडीचें बरेंच नुकसान झालें. ही स्पेशल डाक गाडी, ब्रह्मदेशांतून या आठवड्यांचे विलायतचे डाकेबरोबर डाक पाठविण्यासाठीं टपाल कलकत्या पर्यंत आणवीतांना आलें होतें तें टपाल मुंबईस घेऊन जाण्याकरितां तयार होऊन हौरा स्टेशन मधून सुटत आहे तोंच दुसरे बाजूनें एक मालगाडी येऊन दोन गाड्यांची टक्कर झाली या मुळें ब्रह्मदेशाचे टपाल यानवारचे डाकेच्या वेळीं मुंबईस येऊन पोंचलें नाहीं. अलीकडे रेल्वे कंपन्यांना बरेच अपाय घडत आहेत. दी०बं०

तिकिटांच्या संबंधानें कांग्रेस रिसिपशन कमिटीनें खालीं लिहिल्या प्रमाणें ठराव केला आहे:—

१ तिकिटांचे दोन वर्ग असावे. (१) आरक्षेली (रिझर्व्हड) किंमत रुपये १० व साधीं [ऑर्डिनरी] किंमत रुपये ५.

२ ज्यांनीं १०० किंवा अधिक रुपये वर्गणी दिली असेल त्यांस एक आरक्षेलें तिकिट योग्य वेळाच्या आंत मागविल्यास फुकट दिलें जाईल

३ ज्यांनीं २५ किंवा ज्यास्ती रुपये पण १०० हून कमी, वर्गणी दिली असेल त्यांस एक सावें तिकीट योग्य वेळेस मागविल्यास फुकट मिळेल (परंतु नियम २ व ३ राष्ट्रीयसभेच्या मुखत्यारांस लागूं नाहींत. मुखत्यारांस १० रुपये द्यावेच लागतील. व त्यांनीं जरी २५ वर वर्गणी दिली असली तरी त्यांना फुकट तिकीट मिळणार नाहीं.)

४ पहिल्या वर्गाचीं कांहीं (नक्की संख्या समजली नाहीं) तिकिटें अध्यक्षांस वाटेल त्या सन्माननीय गृहस्थांस ह्मणजे मुख्यत्वेंकरून इज्जतदार युरोपियन गृहस्थांस (फुकट नजर करण्याचा अधिकार आहे.

५ कोणत्याही वर्गाचें तिकीट दाखविणाऱ्या गृहस्थास, बरोबर एकदोन सभ्य स्त्रिया आणितां (फुकट) येतील"


विकीस तयार.

**SAPKAR'S DIARY**

**FOR 1892**

WITH

A CALENDAR FOR 1893



## सापकरांची रोजनिशी.
## सन १८९२ सालाकरितां.

हींत मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी आफिसांस व दिवाणी कोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौंजीविवाहांचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनीआर्डरी, पोस्ट, मुंबईच्या बँकेच्या हुंड्या, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्टफी, पोलिसगाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर, इत्यादि नेहमीं लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदराचीं व कांहीं कोरीं पृष्ठें जोडलीं आहेत.

### रोजनिशीची किंमत.

| | कि. | ट. ह. |
|---|---|---|
| प्रत नंबर १ ............ | ०|२ | ०२ |
| प्रत नंबर २ ............ | ०८ | ०१॥ |
| प्रत नंबर ३ ............ | ०७ | ०१॥ |

किंमतीबद्दल रोख पैसे आह्मांकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.



विक्रीस तयार.) (पाकेट साईज.

**DIARY FOR 1892**

**सन १८९२ सालाकरितां रोजनिशी.**

इंग्रजींत इंग्रजी तारीख, मराठींत तारीख मितीसुद्धां, प्रत्येक पानावर एकेक उल्लेख ह्मण व प्रत्येक तारखेला एकेक पान.

ही डायरी चांगल्या चोटीव कागदावर छापिली असून बायंडींग उत्तम प्रकारचें सोनेरी केलेलें आहे. यांत पोष्ट, रेलवे, तारायंत्र पर्जन्याचीं नक्षत्रें, विवाह, मौंजीमुहूर्त, सरकारी आफिसांस असणाऱ्या सुट्या फिर्यादीस स्टांप, कर्जखतास स्टांप, पगार देण्याची रीत, रवि उदय व रवि अस्त वगैरे सर्व प्रकारच्या माहितीचा यांत समावेश केला आहे.

किं. ६ आणे ट. ह. १ आणा.

विशेष सूचनाः—दहा प्रति घेणारास एक प्रत कमिशन.

आगाऊ रोख किंमत आल्यास पाठविण्यांत येईल. प्रति खालीं सही करणारांकडे व वि. एम. वाळवेकर आणि कं० बुकसेलर्स व पब्लिशर्स, मार्केट पोस्ट, यांजकडे मिळतील.

म्यानेजर सुबोधप्रकाश प्रेस,
गिरगांव मुंबई.


☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.................... ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ..........०१

SUBSCRIPTION
Rs.
Annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy.................................4as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per. lin3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXV | AKOLA MONDAY 28 DECEMBER 1891 | NO 50

वर्ष २५ | अकोला सोमवार तारीख २८ माहे दिसेंबर सन १८९१ इ० | अंक ५०

### नोटीस

रा. रा. उदेभान चांदोडकर रहाणार व-ऱ्हद ता० अकोट यांसः—

नोटीस देणार विठू वल्द चिहू खराटे रहाणार अकोली ता० अकोट. नोटिशीनें असें कळवितों कीं, तुमची मुलगी नामें अनंदी ही माझी लग्नाची बायको आहे. लग्न होऊन ९ वर्षें झालीं. मी व माझा भाऊ रामू असें मिळून बायकोस आणण्या करितां पांच चार वेळां आलों. ती अज्ञान आहे ह्मणून तुह्मी पाठविली नाहीं. यंदा मी भाद्रपदमासीं देवाजी दुमाळा यांस बरोबर घेऊन तीस नेण्यास आलों असतां पाठविलें नाहीं. व पुः दिपवाळींत माझा भाऊ रामू व मामा सखाराम या उभयतांस तिला आणण्या करितां पाठविलें असतां तुह्मी त्यांना असें सांगितलें कीं, मी फारकती दिली आहे. वगैरे खोट्या गोष्टी सांगून आनंदी हीचा दुसरा पाठ करणार असें कळविलें; याजकरितां मी लागलीच मे० दि० क० साहेबाकडे अर्ज दिला होता. गंधर्व लाविल्या नंतर फिर्याद घेऊं असा हुकूम आह्मांस मिळाला आहे. या सर्व गोष्टी करितां तुह्मांस असें कळविण्यात येतें कीं नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचे आंत आनंदीस वरीं आणून पोहोचती करावी. तिला रीतीप्रमाणें वागविण्यास आह्मी तयार आहों. खोटी फारकती करून मुलीचा कोणाशीं गंधर्व लाविल्यास रीती प्रमाणें फौजदारींत फिर्याद करून ह्या नोटिशीचे खर्ची सुद्धां सर्व खर्च भरून घेऊं. कळावें तारीख २४ माहे दिसेंबर सन १८९१ इ०

( सही. )

निशाणी—विठू वल्द चिहू
खराटे रहाणार अकोली
तालुके अकोट याचे
हातची असे.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य १२ शके १८१३

आज मितीस सुरू झालेल्या राष्ट्रीय सभेच्या निरनिराळ्या विषयांचा विचार करण्याकरितां नेमलेल्या कमेटीस नागपूर – वऱ्हाडातील आगतस्वागत करणाऱ्या मंडळीनें सुचावलेल्या ठरावांचा ठोकळ

### मसुदा.

ठराव १ ला—मागील सर्व कॉंग्रेसच्या बैठकींत जे कांहीं सिद्धांत ठरून गेले आहेत तेच ही राष्ट्रीय सभा ठाम करते कीं:— जों पर्यंत हिंदुस्थानच्या लोकांचा—त्यांनीं स्वतः निवडलेल्या प्रतिनिधींच्या वर्तानें, त्यांच्या स्वदेशाच्या राज्य प्रकर्णी—हात नाहीं तों पर्यंत हिंदुस्थान देशाचें राज्य उत्तम तऱ्हेनें ह्मणजे न्याय्य रीतीनें कधींही चालणार नाहीं, लोक कधींही सुखी व संतुष्ट रहाणार नाहींत; आणि ह्मणूनच ही राष्ट्रीय सभा, ग्रेट ब्रिटन आणि ऐर्लंडच्या लोकांची हिंदुस्थाना वरील कृपादृष्टि कृतज्ञपणानें जाणून, त्यांस मोठ्या मिनत वारीनें अशी विनंती करते कीं, वरील न्याय्य व जरूरीची सुधारणा तावडतोब अमलांत आणण्यास काडीमात्र विलंब होऊं नये.

ठराव २ रा— हिंदुस्थानांतील पांच कोट प्रजा ( ह्या संख्येचें दरवर्षी वाढतें प्रमाण आहेच. ) उपास माराच्या धरास येऊन पोहोंचल्यामुळें आपल्या आयुष्याचा काळ कसा तरी दुःखांत कंठीत आहे. आणि हजारों लोक अन्नान्न करीत प्राण सोडीत आहेत. अशी ही दीन दशा आह्मांस प्राप्त होण्याचीं कारणें येणें प्रमाणें:—

( अ ) प्रत्यक्ष आपल्या देशाच्या राज्य कारभारामधून आणि तसेंच जमाखर्चाच्या बाबींतून हिंदुस्थानचे लोकांस धुडकावून दिले जात आहे.

( ब ) लष्करी व तसेंच सिव्हिल खात्यांचा व विशेष करून पहिल्या खात्याचा अगदीं बेताल खर्च होतो.

( क ) ज्या हिंदुस्थान देशांतील नऊ दशांश लोक फक्त शेतकीवर आपलें पोट भरतात त्या देशांतील काळीचा वसूल जमा करण्याची पद्धत फार त्रास दायक असल्यामुळें शेताची सुधारणा तर राहिलीच पण उलटी उत्तम दुर्दशा होत चालली आहे.

खालील सर्व अवाढव्य होणारा खर्च अवश्यमेव कमी करण्यांत आला पाहिजे लष्करी, खात्यामध्यें युरोपियन आणि नेटिव मिळून असलेल्या कायमच्या फौजेंत प्रत्येकीं निदान २०,००० लोकांस फाटा मिळावा. हल्लीं थोड्या मुदतीच्या चाकरीच्या इंपिरियल फौजा आहेत; त्यांना त्यांच्या इंग्लंडांतील नव्या भरतीसाठीं इकडे आणण्यास आणि त्यांतील तरणे ताठ बांड शिपाई इकडे हवापाण्यास रुळले नसल्यामुळें पुष्कळ मरतात ह्मणून भारी खर्च पडतो. तो पडूं नये ह्मणून ईस्ट इंडिया कंपनी प्रमाणें अधिक मुदतीच्या चाकरीवर इकडील युरोपियन फौजा तयार कराव्यात. कॉमिसरियट, आर्डनन्स्, आणि स्टोअरडिपार्टमेंटस् या खात्यामध्यें कसोशीनें काटकसर करावी. आणि सिव्हिल खात्यामध्यें भारी पगाराचे विलायतेहून आणलेले, अधिकारी पुष्कळ आहेत त्याच्या ऐवजीं नेटिव कमी पगाराच्या अधिकाऱ्याचा मोठा भरणा करावा; आणि ब्रिटिश सरकारनें तीस वर्षांपूर्वीं अभिवचन दिल्या प्रमाणें जमिनीचा धारा ठरावींक व कायमचा करण्याची तावडतोब तजवीज व्हावी ह्मणजे देशांतील शेतकीची सुधारणा करण्या करितां भांडवल व श्रम संयुक्त होतील, कांकीं ही सुधारणा प्रस्तुतच्या बारावर्षां पर्यंतच टिकणाऱ्या जमाबंदीच्या पद्धतीमुळें फार करून अशक्य झाली आहे. आणि ह्मणून ही सभा ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या देशांच्या लोकांस काळजीपूर्वक विनविते कीं, सांप्रतचा राज्यकारभार निःसंशय सहेतुक असून कमी संतोषकारक नाहीं तरी त्या मध्यें जे दोष आढळतात त्यामुळे पुष्कळ लक्षावधि लोक बळी पडत आहेत यांत भर न पडावी ह्मणून वरील सुधारणा अगोदर करण्यांत याव्या.

ठराव ३ रा —ह्या राष्ट्रीय सभेस मागील सर्व कॉंग्रेसचें ह्मणणें मान्य असून शिवाय हिचें असें मत आहे कीं, हिंदुस्थानांतील आह्मी ह्मणतो त्या पेक्षांही अधिक फौजेस काट मारला असतां लोकांस आपला देश, आपलें घरदार आणि चिजवस्त यांचें रक्षण उत्तम तऱ्हेनें खात्री पूर्वक करितां यावें ह्मणून सरकारनें हिंदुस्थानांतील लोक मताचें अभिनंदन करावें. आणि लोकांस राज्यभार कसा हांकावा व देशाचा बचाव कसा करावा ह्याचा धडा घालून देऊन त्यास उत्तेजन द्यावें हें करणें सरकारास इष्ट आहे. वरील गोष्टी होण्यास खालील सवलती मिळाल्या पाहिजेतः—

( अ ) हिंदुस्थानांतील रहिवाश्यांना आणि तसेंच हिंदुस्थानांत येणाऱ्यांना जात, धर्म वर्ण वगैरे कांहीं एक लक्ष्यांत न आणतां हत्यारांचे परवाने दिले पाहिजेत. आणि विशेष करून जेथें हिंसक पशु मनुष्य हानि व शेताभतांचा नाश करितात तेथील लोकांस हे परवाने देण्यांत सढळ हात धरला पाहिजे आणि हे परवाने त्यांचा दुरुपयोग केल्याचें सिद्ध झाल्यास काढून घेण्यांत यावेत.

( ब ) हिंदुस्थानांत नेटिव लोकांकरितां एक मिलिटरी कालेज स्थापण्यांत यावें व तेथें नेटिवांस ( त्यांच्या योग्यतेनुरुप व हुषारी प्रमाणें ) हिंदुस्थानांतील फौजेच्या कमिशन्ड किंवा नॉन कमिशन्ड कामदारांचें शिक्षण देण्यांत आलें पाहिजे.

( क ) राज्यांतील लढाऊ जातींच्या लोकांना मिलिशिआ सर्व्हिस लागू केली पाहिजे.

( ड ) विलायते प्रमाणें इकडे हिंदुस्थानांतही व्हॉलंटिअरची रीत सुरू करून त्यास उत्तेजन दिलें पाहिजे.

ठराव ४ था— हिंदुस्थानच्या राज्य प्रकर्णीं नेटिवांचा जास्त हात शिरकावा ह्मणून आणि केवळ लोकांस योग्य न्याय मिळावा ह्मणून सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा विलायते प्रमाणें हिंदुस्थानांतही व्हावी.

ठराव ५ वा— मागील कॉंग्रेस प्रमाणें हीही कॉंग्रेस ह्मणते कीं, ( अ ) मिठा वरील कर फार नाहीं तरी नुकताच जितका जास्त वाढविला आहे तितका तरी कमी करावा. ( ब ) हल्लीं इनकंटॅक्स पांचशें रुपयां पासून घेतात तो हजारा पासून घ्यावा. ( क ) तारीख १ मार्च सन १८९० च्या इंडिया ग्यॅझिटांतील १०३,१०४,१०५ ह्याऱ्या मध्यें अपकारी संबंधानें जो ठराव प्रसिद्ध करण्यांत आला आहे तो प्रांतिक सरकारनें अमलांत आणण्या बद्दल सरकारनें स्थानिक सरकारावर करडी नजर ठेवली पाहिजे आणि गांवी सर्व लहान सहान खेड्यामध्यें दारूचीं दुकानें बंद ठेवणें अगर सुरूं करणें हें तेथील लोकांचे मर्जीवर असावें.

ठराव ६ वा—न्याय खातें व पोलिसखातें यामध्यें फार वाईट व्यवस्था आहे ह्मणून मागील कांग्रेसच्या प्रमाणें हीही असें जोरादार रीतीनें सांगते कीं, ( अ ) न्याय खातें व मुलकी खातें हीं दोन्ही निरनिराळीं असावीत आणि हे दोन्ही अधिकार एकाच कामदारास देऊं नयेत. ( ब ) हल्लीं जेथें जेथें जुरी कडून चौकशी करण्याची पद्धत नाहीं तेथें तेथें ती सुरू करावी ( क ) जुरीनें देषमुक्तते बद्दल जो ठराव केला असेल तो फिरवण्याचा अधिकार सन १८७२ सालीं हायकोर्टाना मिळाला आहे तो रद्द करण्यांत यावा. ( ड ) वारंटाच्या खटल्यांसंबंधीं चौकशी माजिस्ट्रेटापुढें न होतां सेशन कोर्टांत व्हावी असें आरोपीचें म्हणणें असल्यास तसें करतां येण्यासाठीं क्रिमिनल प्रोसिजरमध्यें एक नवें कलम घालावें.

( इ ) पोलीस खात्यामध्यें मूळ सुधारणा ही झाली पाहिजे कीं त्यांच्या संख्येपैकीं कांहीं लोक कमी करावेत आणि बाकीच्यांचे पगार वाढवून खालील दर्जा वरील लोक अधिक योग्यतेचे असावेत; उच्च प्रतीच्या जागांवर हल्लीं असलेल्या बहुतेक पोलिस सुपरिंटेंडन्टापेक्षां अधिक कर्तबगार, चांगल्या लोकांच्या अधिक परिचयातले आणि कमी हेडव्हूप जाण्याचे असतील असे नेमावेत.

ठराव ७ वा—मागील राष्ट्रीय सभा प्रमाणें हिचेही ह्मणणें असें आहे कीं, शिक्षण खात्यांतील सर्व शाखांतून खर्च कमी करण्याची जी सरकारची हल्लींची शिस्त आहे ती रद्द करून हा खर्च वाढविणें अवश्यक आहे. आणि शिक्षण शाखांमधील मुख्य औद्योगिक शाखेच्या अभिवृद्धीसंबंधानें देशाच्या सांप्रत औद्योगिक स्थितीचें निरीक्षण करण्यासाठीं एक कमिशन नेमणें फार अगत्याचें आहे.

ठराव ८ वा— सरवुल्यम वेडरबर्न आणि ब्रिटिश कॉंग्रेस कमेटीचे सभासद यांनीं हिंदुस्थानाकरितां गुदस्त सालीं जी कामगिरी बजावली त्याबद्दल त्यांचें कृतज्ञता पूर्वक आभार मानून त्यांस ह्या सभेमार्फत विनंती करण्यांत येते कीं, त्यांनीं राष्ट्रीय सभेंत निघालेल्या प्रश्नां संबंधानें केवळ विचार न करितां हिंदुस्थाना संबंधानें इतर प्रश्नांचाही विचार करावा ह्मणजे त्यांच्या मदतीचा अधिक उपयोग होईल. आणि हे इ-

तर मश्न प्रेसिडेन्सी असोशिएशन-- मुंबई, सार्वजनिक सभा पुणें, महाजन सभा-- मद्रास, लोक सभा माळ गुजर सभा-- नागपूर, ब्रिटिश इंडियन असोशिएशन-कलकत्ता या इंडियन सभा - मार्फत योग्य प्रकारें त्यांच्याकडे सुचविले जातील व त्या सूचना व्यवस्थेशीर ब्रिटिश कमिटीस कळविण्या साठीं नियम तयार करण्या करितां कांहीं गृहस्थाची कमिटी नेमावी.

ठराव ९ वा— शेट दादाभाई नवरोजी यांनीं गेल्या पंचवीस -- तीस वर्षांत इंडिया करितां जे भारी श्रम घेतले ते राष्ट्रीय सभेस फार पसंत असून ते ती बहुमोल मानते. राष्ट्रीय सभेचा त्यांच्यावर पूर्ण भरंवसा आहे आणि त्यांस सेंट्रल फिन्सबरी तर्फे पार्लमेंटांत सभासद निवडण्यांत यावें ह्मणून उत्कट इच्छा आहे. हाऊस आफ कामन्स मध्यें त्यांस सभासद निवडण्यासाठीं फिन्सबरीच्या व अन्य ठिकाणच्या विलायते कडील लोकां कडून हरप्रकारें मदत मिळाली आहे व मिळेल त्या निमित्त राष्ट्रीय सभा त्या लोकांचे आभार मानते.

राष्ट्रीय सभेच्या सातव्या समारंभास आज पासून नागपूर शहरीं सुरुवात होईल. मद्रासचे सन्मान्य गृहस्थ राय बहादूर आनंदाचार्लू हे सर्वांच्या अनुमोदनानें अध्यक्षस्थान स्वीकारतील. नागपूरचा समारंभ फार भव्य व टोलेजंग होईल इतकेंच नाहीं तर या समारंभाची मातबरी मागील साही बैठकी पेक्षां फार मोठी आहे. राष्ट्रीय सभेचे आदिपुरुष व मुगुटमणि ह्यूम साहेब बरीच वर्षे पावेतों आपली अखेरची भेट घेणार आहेत तेव्हां त्यांस प्रेमानें व सद्गदित अंतःकरणानें मुजरा करण्याचा सुयोग साधण्या साठीं पुष्कळ लोक मुखत्यार किंवा प्रेक्षक म्हणून साऱ्या हिंदुस्थानांतून जमले आहेत. या कारणानें यंदाच्या बैठकीस राष्ट्रीयत्वाचें स्वरूप विशेष तऱ्हेनें येत आहे ह्यूम साहेबांनीं आपला संचित पैसा व आयुष्य हीं राष्ट्रीय सभे साठीं खर्ची घातलीं आणि आपल्या स्वकीयांची इतराजी करून घेतली. आपल्या लोकांवर त्याचे अनंत उपकार आहेत. ज्यांच्या सदुद्योगाची यशोदुंदुभि चिरकाल आपल्या लोकांस ऐकूं येईल त्या ह्यूम साहेबांची हृदयंगम मूर्ती आमच्या अंतःकरणाहून कोणत्या अन्य स्थळीं चिरकाल वास करणार आहे! ह्यूम साहेबांच्या स्मारका विषयीं लोकांच्या तोंडून उद्गार व प्रेमपुरस्सर उद्गार ऐकूं येतात तेव्हां त्या स्मारकाचा प्रश्न कदाचित् नागपुरास निघेल. कांहीं दृश्य स्मारक असो अगर नसो त्यांस आमच्या लोकांच्या हृत्कमलीं पूज्यस्थान मिळालें आहे तें ते विलायतेस गेले तरी देखील काडीमात्र ढळणार नाहीं.

## चिनी लोक.

चिनी लोक आपणांस या देशांत मुख्य मुख्य ठिकाणीं व्यापारानिमित्त आलेले बरेच आढळतात. त्यांचा व आपला संबंध अलीकडे बराच निकट झाला आहे. ब्रह्मदेश नुकतांच आपले इंग्रज सरकारचे कबज्यांत आल्यामुळें चीन देश हा आपला सरहद्दीवरील प्रचंड शेजारी होय. ह्याची थोडी बहूत माहिती असणें जरूर आहे. या करितां त्या देशांत फिरून परत आलेल्या काहीं इंग्रज लोकांचीं चिनी लोकांविषयीं झालेलीं मतें येथें सांगावी हा आमचा उद्देश होय, चीन देशांत थोडेंसे फिरल्यावर प्रथम दर्शनींच असें आढळून येईल कीं चिनी लोकांत एकोप्यानें राहण्याची वहिवाट फार आहे. ते लोक इतके जवळ जवळ राहतात व प्रत्येकाशीं इतरां घरोबा असतो कीं हें ह्मणजे अमक्याचेंच घर—किंवा अमक्या ठिकाणीं जाण्याचा प्रतिबंध आहे वगैरे ह्मणणें गैर वाजवी होईल. पाहिजे त्याला पाहिजे तेथें क्षुल्लक कारणां करिता देखील जाण्याची मोभा आहे. आज आपल्या भोंवती मंडळींत काय गोष्टी घडत.त काय विचार मसलती होतात इत्यादि माहिती करून घेण्याची प्रत्येकाची उत्सुकता व उत्कंठा असते येवढेंच नव्हे तर प्रत्येकास वाटतें कीं ही माहिती असणें हें जगांत येऊन जीं कर्तव्यकर्में बजावयाची त्यापैकीं एक मोठें दांडगें कर्तव्य होय ह्या कर्तव्यास निरंतर जागृत राहून ते बजावण्यास ते फार तत्पर असतात. मनुष्य लुच्चा लफंग असो अथवा चांगला सुशील असो, तो घरीं वारंवार व विनाकारण आला तरी त्या पासून आश्चर्य वाटण्या जोगतें कांहींच नाहीं. कारण ते नेहमीं पाहिजे तेव्हां यावयाचे व जावयाचेच त्यांना येऊं नको ह्मणणें ह्मणजे दार उघडे ठेवून उन्हाची तिरीप आंत न येऊं देण्यासारखें आहे. आणि खरोखरच ते दरवाजे कधीं लावीत नाहींत. ते नेहमीं खुले असतात. दरवाजा लाविला असतां कांहीं कुरबुर आहे व ती आपणांस ऐकूं येणार नाहीं अशी त्यांस भिती असते. आंत कोठडींत कोंडून कोणते विचार शिजावयाचे आहेत कीं ते सर्व लोकांस जाहीर होऊं नयेत. असले विचार कधींही नसावयाचेंच. ह्या वरून हें स्पष्ट आहे कीं चीन देशांत गुप्त रीतीच्या सल्लामसलती घडत नाहींत कोणी एखाद्यानें आंत येण्यास जर साहजिक हट केलें तर लागलींच त्यास त्वेषाचें स्फुरण येऊन लागलीच असे विचारील कीं असें काय मोठें चाललें आहे कीं तें दुसऱ्यानें पाहूं नये. ज्या अर्थीं दुसऱ्यास जाण्यास तेथें अटकाव आहे त्या अर्थीं तेथें कांहीं तरी दुष्ट कपटी विश्वासघातकी व राजद्रोही बेत चालत असतील असा त्यांचा ग्रह होतो. व त्या गोष्टी तर त्यांस खपतच नाहींत. वास्तविकच आहे. असल्या गोष्टींची त्या दुर्गंधींत रात्रंदिवस लोळणारां शिवाय कोणास बरें चीड येणार नाहीं. !

दुसरा मोठा विलक्षण प्रकार त्या लोकांत आढळून येतो तो असाः— दुसऱ्याची वस्तु हळूंच न समजतां सफाईनें उचलून नेणें हें त्यांचे आंगीं फार खिळलेलें असावें असे वाटतें. त्या कृत्यांत त्यांस वाईट वाटत नाहीं— मग एकमेकांस दूषण देणें तर दूरच राहिलें. फार कशाला— सुशिक्षित ह्मणवणारे लोकांस देखील याचे फारसें वाटत नाहीं. या विषयीं एक गमतीची गोष्ट एका गृहस्थानें सांगितली आहे ती होकीं— एक चिनी सभ्य गृहस्थ दुसऱ्या देशाहून आलेल्या पाहुण्याचे भेटीस गेला. भेटी नन्तर चोहोंकडे नजर फेकतां त्यांस कांदे दृष्टीस पडले. दसल्या प्रकारचे कांदे आपणापाशीं असावेत या हेतूनें या सभ्य गृहस्थानें ते हळूच कोणाला न समजूं देतां— उचलून आपल्या खुर्चीं खालीं ठेविले व भेट आटोपल्यावर परत जातांनां बरोबर घेऊन जाऊं असा मनांत बेत केला. ही सर्व गोष्ट त्या नवख्या पाहुण्याचे लक्षांत आली व त्यास बरेंच वाईट वाटेल. आगत स्वागत झाल्यानंतर एका खोलींतून दुसऱ्या खोलींत घर पाहण्यास मनुष्य जातोच. त्या प्रमाणें हे चिनी गृहस्थ ही गेले. ही संधी पाहून त्या पाहुण्यानें ते खुर्ची खालचे कांदे हळूच उचलून एका फडताळांत ठेवून त्यास कुलूप लावून घेतलें. नंतर जावयाची वेळ झाली तेव्हां हे सभ्य चिनी गृहस्थ हळूंच चाचपून पाहवयास लागले तो कांदे कांहीं दिसेनात. त्यामुळे त्यास मनस्वी वाईट वाटलें. भेटी नन्तर घरीं गेल्यावर आपल्या चाकरा बरोबर पाहुण्यास एक चिठ्ठी देऊन त्यांत त्यानें ते लपून ठेवलेले कांदे पाठवून देण्या विषयीं विनंती केली.

काटकसरीनें चरितार्थ चालविणें हा एक चिनी लोकांचा वाखणण्याजोगा गुण आहे खरा तरी तो एका तऱ्हेनें वाईट आहे. अनेक प्रसंगीं तो वाजवी पेक्षां फाजील असून ते दैन्यावस्थेचें दर्शक होय. असें ह्मणतात कीं त्यांचें खाणें फार स्वल्प आहे. चांगल्या जवानींत आलेल्या मनुष्यास ८पैचें ह्मणजे सुमारें पाऊण आणा किंमतीचें अन्न दिलें असतां त्यावर तो एक दिवस चेनीनें काढतो. दुष्काळाचे दिवसांत तर हजारों लोक सहापैवर गुजाराण करून वांचलेले आहेत. हें वर्णन ऐकून खरेंच नवल वाटतें पण तें यथार्थ आहे हें अगदीं निःसंशय. अन्न शिजवितानां किंवा तयार करतांना त्यांत फार करून ते वाया कांहींच जाऊं देत नाहींत व कित्येका पासून मिळेल तितका फायदा व सहाय्य ते घेत असतात. त्यांना भक्ष्यास कांहीं असलें तरी चालतें. उत्तर चिनांत घोडे, गाढव, खेचर, बैल इत्यादि श्वापदें बहुत करून नेहमींच्या प्रचारातले भक्ष्य होय— व कांहीं कांहीं मोठ मोठ्या भागांत तर उंटाचाही जंगी फन्ना उडतो. मेलेलीं जनावर— मग ती कुत्रे असोत अगर मांजरें असोत— सर्व चट लवतात. व अशाही गोष्टी ऐकण्यांत आहेत कीं सोमल खाऊन मेलेले कुत्रे देखील मिठक्या मारीत कांहीं खेडवळ लोकांनीं खाल्लि आहेत व त्या पासून त्यांस काडी इतकीं देखील इजा झाली नाहीं हें त्यांचें कुचकें नासकें अकटोविकट खाणें फारच वीट येण्या सारखें आहे.

शिवाय घाणेरडेपणाचे तर हे लोक केवळ अमंगळ पुतळेच होते. या विषयीं थोडक्यांत येथें सांगणें येवढेंच कीं एका अन्यदेशी पाहुण्यानें एका उंच प्रतीच्या चिनी गृहस्थास घरीं मेजवानीस बोलाविलें. त्या वेळीं हातपुसायास ठेविलेला रुमाल जरा किंचित मळकट्या होता ह्मणून रिवाजा प्रमाणें पाहुणा विनितेनें सबब दाखवू लागला इतक्यांत ह्या सभ्य चिनी राजश्रीनें आपली बाहीवर सारून आतील कफणीचा रंग पाहुण्यास दाखवून ह्मणाला-- महाराज या माझ्या कफणी पेक्षां, आपला हात पाय पुसावयाचा फार स्वच्छ आहे.' असो ह्या ओंगळ घाणेरडेपणाचे चित्र दाखविण्यांत फायदा फार नाहीं,

फायद्याची प्राप्ती किंवा कीर्तीची—त्या दोन हेतूचें मुख्यत्वे करून प्राबल्य असल्यामुळें —त्या साधण्यासाठीं सर्व लोक परिश्रम घेतात. त्यांत विशेषें करून पहिला हेतू त्यांचे मनांत फार खेळत असतो. असेंही ...
...ण्यास साधारणपणें कहीं हरकत नाहीं याहुदी लोक खेरीज करून बाकीच्या पेक्षां यांचा व्यापाराकडे जन्मतःच कल दृढ आहे आतां चिनी लोकांना ...र्ति ...ळविण्याचे मार्ग विद्या शिक्षण व प... देणें ह्या शिवाय दुसरे तर फारसे रा... नाहींतच. रात्रंदिवस त्यांचे मनांत परी... विचार घोळत असतात. परीक्षेंत प्रतिस्प...र्शीं टक्कर मारून विजयी होईन केव्हां व ... मिळवीन केव्हां असें त्यांस होतें. बरें तरी यश प्राप्त होण्याचा संभव फारच ... असतो शंभरांत दोन ह्या मानानें तर ... कृत्यांत यशस्वी होतात. पण इतके ... एखादा विजयी झाला—मग त्याची ... कितीही खाकच्या दरजाची कां असेना ... त्याची बरीच स्तुति होऊन त्यास स... मिळतो. व त्यांचे बरोबरीचे प्रतिस्पर्धी ...रल्यामुळें त्याचा द्वेष व मत्सर करित... कित्येकांस तर स्पर्धा करण्यांत स्वत... पाणी नसतांना देखीलही प्रशंसा व ... मान सहन होत नाहीं. याचा म... पहाण्यास फार प्रयत्न करणें नको.

प्रत्यक्ष बाप आजा, व नातू हे तिन्... कदम एकाच परीक्षेस बसतांना कधीं ... आपल्या कानीं आलें आहे काय —व...त ८०।८०, ९०।९० वर्षांचे पिकून ... केंस झालेल्या वृद्ध आजानें आपल्या ...क्षासमवेत नातवा बरोबर प्रतिस्पर्धा व... स्वतां परिक्षेंत पसार झाल्यावर पदवी घा... करून हा दीर्घ काल पर्यंत रखडत केलेल्या अ...साची व मेटाची परिपूर्णता होऊन आज ... पण कृतार्थ झालों असें मानून संतुष्ट होय ... आपल्या स्वर्मी तरी ऐकिलें आहे काय?- पंरंतु असला नवलाचा प्रकार चीन देश... फार आढळतो इतक्या आठवणींत बाप... मुलगा हे एका काली एकाच मुंबई ये... परीक्षेस बसलेले पाहून आपणांस न... वाटत होतें—पण आतां ही गोष्ट ऐकल्या... र फारच विलक्षण प्रकारचें आश्चर्य वाटतें ...रीक्षेस येणाऱ्या उमेदवारांचें वय पा... तर तें नवल करण्या सारखेंच आहे. फुचू ... ८० वर्षांहून वृद्ध असे ९, व नव्वदावर ... असणारे असे दोन इसम परीक्षेस ...दवार होते. परीक्षेंत योग्य गुण मिळवू...नीं सुवाच्य व वळणदार अक्षरांनीं लि... चांगले निबंध पाठविले किंवा हून... ८० वर्षांवर १३ व ९० वर्षांवर १... दावर असून ते पसार झाले-- वगैरे ...ल गव्हरनर जनरल किंवा गव्हरनर ... रिपोर्ट वांचून कांहींच नवल करण्या सा... नाहीं. अन्हुई येथें जे उमेदवार जमले ... त्यांत एकदां तर ३९ उमेदवार ८० ... ज्यास्त वयाचे होते. व १९ उमेदवार ... हून ज्यास्त वयाचे होते. आतां याहून ... चित्र प्रकार अन्य देशीं कोठें आढळेल का...

(पुढें चालेल.)

राष्ट्रीय सभे संबंधानें सरकाचा रोख ...ल्त चालला आहे ही आनंदाची गोष्ट हे... ...दुद मध्य प्रांताचे चीफ कमिशनर मि. म... डोनान्ड यांस त्यांच्या प्रांतांतली बैठक ...निर्विघ्नपणें शेवटास जावी म्हणून चांगली ...स्था आहे. सरकारी नोकरांस प्रेक्षक म्हणून जाण्यास त्यांची सबूर परवानगी आहे

ष्ट्रीय सभेविषयीं वरील गोष्टी त्यांनीं मर सभेंत कळविल्या आहेत. सरकारी कायद्या प्रमाणें देखील राष्ट्रीय सभा राजद्रोही नाहीं. आणि तिला प्रेक्षक या नात्यानें जाण्यास ही एखाद्या कलमा प्रमाणें मनाई असल्याचें आम्हांस ठाऊक नाहीं. परंतु शाळाखात्यांतील कांहीं रजेच्या गोष्टी आम्ही ऐकतों त्या वरून डायरेक्टर साहेबांच्या स्वभावाचें आश्चर्य नवल वाटतें. भित्या पाठीं ब्रह्मराक्षस त्या प्रमाणें आमच्या राव बहादुरांची राष्ट्रीय सभेचें नांव ऐकतांच तारंबळ उडते असें लोक बोलतात. रावबहादुराविषयीं आमचा अनुभव अगदीं निराळा आहे. राष्ट्रीय सभे विषयीं त्याचे विचार प्रतिकूळ आहेत असें आमच्या पाहण्यांत आलें नाहीं. ते मोठे धोरणी व विचारी आहेत. त्यांच्या हातून शाळाखात्यांतील लोकांस राष्ट्रीय सभेसंबंधानें निकराची मनाई झाली असल्यास त्याचें कारण फार खोल व गूढ असावें व वरवर पाहणाऱ्यांस तें कळणार ही नाहीं. रावसाहेबांची कारकीर्द ह्मणजे खरोखरच रामराज्य आहे असें आह्मी समजतों तेव्हां त्यांनीं जें कांहीं केलें असेल तें पुऱ्याच विचारानें केलें असेल.

# The Berar Samachar

MONDAY, DECEMBER 28, 1891

The Malkapur assault case has attracted a good deal of public attention. It is perhaps the first case in which the High Court in Berar has exercised its right of enhancing punishment. It needed immediate trial. But for months together it was hushed up until undue influence and compromising tactics could not hold their ground before the urgent and commanding demands for justice. The complainant Mr. Sampatrao was in the right and few sympathised with the accused Mir Jangoo and his associates. Mr. R. Obbard the officiating Judicial Commissioner has echoed public feelings when he recited the case in his review. His decision deserves a careful perusal but before we quote it we advert to one salient point in the judgment. A man's house is, the judge observes, his castle. But he adds a provise to it that it is not an impregnable castle. We would request all to note the points which render this castle assailable under some pertinent and unobjectionable circumstances. The principle laid down is a wide one. It will afford a new defence under the garb of public duty to men who would run wild upon other's premises to the annoyance of their occupants. The Judge wanted to vindict the rights of public servants against the madness of rash bullies. We reproduce below for public information the judgment in full and hope that no further events will crop up to entail some new charges upon some of those connected in one way or another with the case:—

MIR JANGOO'S CASE.

Judgment delivered this 23rd December 1891.

The accused Mir Jangoo has been convicted under section 332 I. P. Code and sentenced to two weeks rigorous imprisonment.

The facts of the case are very simple Dr. Little the Sanitary Commissioner was at Malkapur on the 30th August. He went through the town inspecting. Arriving at the house of the accused he accidently selected it for inspection and after some priliminaries intended and supposed to have the effect of allowing the women to withdraw, walked through court yard and the Chawk. The accused Mir Jangoo was not at house. Hearing that the Secretary of the Local Committee and Dr. Little had done this he proceeded to the Chawadi and there in public beat the Secretary of the Local Committee with his shoe.

It is urged for the accused that he did not commit the offence charged as neither Dr. Little nor the Secretary of the Local Committee had any authority to enter the house of the accused without his express permission. I do not agree in the view of the Law. I grant that the Sanitary Commissioner and the Secretary of the Local Committee have not ordinarily authority to enter private houses for the purpose of inspection without the consent of the occupants. But I would not like to say that they can under no circumstances exercise such an authority. Every man's house is his castle but not an impregnable castle. He must keep it clear and there must be reasonable inspection to ensure its being kept clean. In the area within Municipalities the law has been codified to some extent and the powers of Municipal Commissioners defined. Out of Municipal limits the powers of Local Committee are not defined. But I do not think that it should therefore be held that Government has no power of inspection and that Government officers have no right of entry. As far as I can see all the reasonable precaution which might be expected from an inspecting officer with a limited time at his disposal were taken to prevent annoyance to the occupants of the house and I am prepared to hold that Dr. Little in entering and the Secretary of the Local Committee in accompanying during his entry, committed no offence and did not subject themselves to any Civil liability in an action for trespass or the like, and that they acted *bonafide* in the discharge of their public duties. I think the accused was rightly convicted under this section. There is no doubt that he assaulted the Secretary for no other reason than that he accompanied Dr. Little through the house. It is sought to mitigate the offence by what may be called the beard incident. I am satisfied that the complainant did not touch the accused's beard in order to insult him and that the accused did not imagine that he had done so and that the beating is in no part attributable to that fact.

In my opinion the sentence is wholly inadequate to the offence. Gentlemen who undertake the onerous duties of secretaryship to Local Committees are entitled to protection against the fury of uneducated and lawless men. In this case a secretary who had done nothing at all improper was beaten publicly with shoes and sticks by three men all of whom had been before convicted of assault. The accused himself had, it is true, been convicted some years ago but the nature of the man may be gathered from his own defence. Twice over does he talk of killing. In the first place he says that he himself told the 3rd accused that he ought to have killed the complainant on the spot. In the 2nd he says that he was so angry that he would have killed the complainant or himself had not the 3rd accused restrained him. He evidently thinks violence in the defence of supposed rights to be a meritorious act. Such man must be severely punished They take the law into their own hands against public servants.

I enhance the sentence and sentence Mir Jangoo to rigorous imprisoment for one year.

MIR HYDER'S CASE.

Judgment delivered this 23rd December 1891

The accused Meer Hyder has been convicted under section 332 I. P. Code along with Mir Jangoo whose case has been disposed of today. This accused is the son of Mir Jangoo. He did not take so prominent a part in the assault. He used a stick and not a shoe and he was cooler altogether. This accused was less than 4 years ago sent to Jail for 3 months for causing grievous hurt.

I consider the sentence inadequate and I enhance it and sentence the accused to six months rigorous imprisonment instead.

NOTICE

It is hereby published for the information of the public of Akola that the lists of voters prepared by the Secretary for the year 1892-93 under rule 6 of the Municipal election rules are posted as required by rule 7 at the following places.

The persons entitled to vote under rule 3 are requested to see their names included in the lists posted and make complaints if there are under rule 8 and also to choose ward in which they wish to vote in case they are entitled to vote in two wards under section 5 before the 5th of January 1892.

Names of places where lists are posted.

The Deputy Commissioner's office
Small Cause Court
Tahsili
Chawaries
Police Station
Cotton market
Weekly market
Near the Morna Bridge.

D. Akola 26-12-91 Md. Husain Secretary M. C. Akola.

## वऱ्हाड.

यंदाच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेस ३०८६ उमेदवार होते त्यापैकीं ९१८ विद्यार्थी पसार झाले. या संख्येमध्यें वऱ्हाडांतील हायस्कुलांतून व खासगी रितीनें मिळून गेलेल्या ४९ विद्यार्थ्यांपैकीं २४ पसार झाले त्यांची यादी येणें प्रमाणें:—

अकोला

अबदुल कादर आगरकर, अबाजी दामोदर आमले, त्रिम्बक महादेव क्षीरसागर, हरी भास्कर अभ्यंकर, सखाराम मोरेश्वर रहाळकर आणि विठू रामजी ढोरे.

उमरावती.

गंगाधर सखाराम अकोलेकर, केशव बाळकृष्ण बापट, केशव शिताराम भडंग, रामचंद्र पांडुरंग बेंद्रे, गोविंद गोपाळ ब्रह्म, गोपाळ नारायण चौधडे, लक्ष्मण रेणको ढोले, गणेश मोरेश्वर गोरे, गोविंद कृष्ण पर्वते, गोपाळ सदाशिव पेंडसे, नारायण रामचंद्र पेंडसे, गोविंद शिवाप्पा देशमाने, नारायण अबाजी काळे, गोविंद लक्ष्मण दाने, हरी सखाराम कयते, तफझुल हुसेन शेख, कृष्णाजी भीमराव शिरोळे, आणि कृष्णाजी हणमंत जतकर.

कपलेश्वर येथील नवऱ्याचा खून करणाऱ्या सारजी वरील आरोपांत पुरवा होतो-कीं बचनाग दिला व केमिकल अनालायझर ह्मणतात कीं अफू होती असा विरोध पडल्या वरून तिला दोषमुक्त सेशनांत केलें.

टिटव्याच्या खटल्यात जठी नावाच्या बायकोनें तिच्या नादीं असलेल्या सुरजुसिंग मनुष्याच्या सल्यानें आपल्या नवऱ्यास विहिरींत ढकललें होतें ह्मणुन उभयतांस सेशननें काळया पाण्याची शिक्षा फर्मावली.

खामखेडच्या एका गोसाव्यानें एका स्त्रीच्या उपभोगासाठीं तिच्या नवऱ्यास कुऱ्हाडीनें ठार मारलें ह्मणून त्यांस देहान्त शिक्षा मिळाली आहे.

वऱ्हाडांतील कांहीं अधिकारी साहेबांच्या हातून हा राष्ट्रीय सभेविषयीं व्हाइसराय साहेबांच्या हुकुमा विरुद्ध मोंगलाई वडत असल्या विषयीं कांहीं बातम्या कळतात.

निजाम सरकारची प्रकृती तापानें फार बिघडली होती परंतु आतां चांगला आराम पडला असल्या विषयीं आनंदाच्या खबरा आल्या आहेत.

बुलढाण्यास रंगस्वामी नांवाच्या कारकुनानें पोस्टाच्या हिशोबांत अफरातफर केल्या वरून त्यास ७ वर्षें सक्त मजूरी व २९० रुपये दंड फर्माविण्यांत आला.

शेगांवपूर येथील डाक्यांत आरोपीस पुरावा सबळ नसल्या मुळें सोडून दिलें.

बाळापूरच्या एका मांगानें डागिन्या साठीं एका गुराख्याच्या पोराला बेशुद्ध होई पर्यंत मारिलें. मुलगा मेला असें वाटून मांग डागिन्या सह चालता झाला. परंतु तो शुद्धीवर येऊन रडत रडत येतांना घरच्या मंडळीला भेटलाच पुढें शोधानीं तपास लागला आरोपास १० वर्षे काळेपाण्यावर धाडलें.

हिंग्याच्या फौजदारी प्रकरणांत कलकत्ता हायकोडतानें मि. जेकब यांस दोषमुक्त केलें तरी निजाम सरकार या पुढें दिवाणी दावा चालवून जेकबला पूर्ण न्याय देववेल तितका देणार आहेत कायद्याच्या घरसोडीची चिकाटी नेहमीच्या वर्तनांत कालपरत्वें पडली नाहींतर मनुष्य केव्हां न्यायदेवी समोर बळी पडेल न कळे!

नोटीस

ह्या नोटीसीनें अकोले येथील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं म्युनिसिपल सेक्रेटरीनीं निवडणुकीचे ६ नियमाप्रमाणें मत देणाऱ्या लोकांची यादी १८९२।१८९३ सालाकरितां तयार करवून नियम सात प्रमाणें खाली लिहिलेल्या ठिकाणीं त्याच्या नकला लाविल्या आहेत. नियम ३ प्रमाणें ज्यांना मत देण्याला अधिकार आहे अशा लोकांना विनंती करण्यांत येतें कीं त्यांनीं आपली नांवें सदहू याद्यांत दाखल केलेलीं आहेत किंवा नाहींत हें पहावें आणि नियम ८ प्रमाणें त्यांची एकादी तक्रार असल्यास ती, व ज्यांना दोन वार्डांत मत देण्याचा अधिकार असेल त्यांना आपण कोणत्या वार्डांत मत देणार हें तारीख ५ जानेवारी सन १८९२ चें आंत कळवावें कळावें. ता० २६।१२।९१

मे० डिपुटी कमिशनर साहेब यांचे कचेरींत.
स्मालकॉज कोर्ट.
तहसिल कचेरी.
कॉटन मार्केट.
धान्य व आठवडे बाजार.
चावड्या.
पोलिस स्टेशन.
मोरणेंवरील पूल.

(Sd.) Md. Husain.
सेक्रेटरी मुनसिपाल कमेटी अकोलें.

## वर्तमानसार.

लष्करी शिपायांस द्यावयाचीं पांच लाख पौंड भिस्कुटें तयार करून नव्या वर्षाच्या आरंभीं सरकारास माप द्यावीं असा रशियाच्या लढाऊ खात्याच्या प्रधानानें हुकुम केला आहे. या हुकुमानें रशियाच्या दक्षणप्रांतांतील लष्करी लोकांत बरीच चळवळ सुरू झाली आहे. कारण टर्की बरोबर रशियाची जी मागें लढाई झाली त्या लढाईच्या तयारीच्या वेळीं मात्र असा हुकुम सुटला असून त्याविळेपासून आजपर्यंत तसा कधींही सुटलेला नाहीं.

बडोदें व इंदूर येथील माजी दिवाण राव ब. विनायक जनार्दन कीर्तने हे ता० १८ मिनहु रोजीं पुण्यास मरण पावले. हे फार थोर मनाचे आणि निरभिमानी असे होते.

युरोपांतले वीस कोटी लोक अगदीं हत्यारबंद झाले असून एकमेकांस खाण्याच्या तयारींत असल्यामुळें लवकरच अशी एक लढाई होईल कीं तशी आजपर्यंत कधींच झाली नाहीं असें प्रसिद्ध मोक्षमुलरचें ह्मणणे आहे. हरीसन नावाचा गृहस्थ ह्मणतो कीं, युरोपांतले लोक एकमेकांच्या माना कापण्यास तयार झाले असून धर्म व नीति मुळींच नाहींशी झाली आहे आणि आफ्रिका ही एक नवी पृथ्वी बनविण्याचा उद्योग आहे.

हैदराबादच्या हिऱ्याचा खटला— कलकत्याच्या सेशनांत अभेडच्या बायकोचीही साक्ष झाली. या हिऱ्याच्या खरेदींत आपणास फार मोठें कमिशन मिळावयाचें होतें व या बाईच्या मुलांस जेकब मोठाल्या देणग्या देत असे असें त्या बाईच्या साक्षींत बाहेर आलें. हा हिरा विकत घेण्याकरतां पतीयाळच्या अलायन्स बंपाकेंत कांहीं रकम ठेविली नव्हती. या खटल्यांतील दोन्हीतर्फेचा पुरावा खलास झाला आणि आरोपीचा तकरारही झाली. आतां सोमवारीं फिर्यादीची तकरार पुरी होईल असें सांगतात.

गायकवाडांचें, दारू अपकारीचें उत्पन्न सालिना ९९,००० रुपयांचें आहे असें समजतें.

गायकवाडांनी आपल्या लहान मोठ्या सर्व नोकरांस पेन्शन देण्याचें नुकतेंच ठरविलें आहे असें समजतें. फार चांगलें केलें.

होळकर महाराजांनी राजपुत्राच्या वाढदिवसानिमित्य आपल्या प्रजेस सत्तर हजार रुपये शेतसारा माफ केला.

चीनांतल्या गेल्या दंग्यांत कैद केलेल्या ४२ लोकांस पकी येथें ठार मारण्यांत आलें.

अबटाबादेवरून जमूस जाण्याच्या रेलवेची सर्वे चालू आहे.

कूपर व सडनरु या नांवांच्या दोघा इंग्रजांस गेल्या २२ व्या तारखेस सेन्ट एटिनी येथें कैद करण्यांत आलें. तेथें रशियन सरकाराकरतां नवीन तऱ्हेच्या रायफल बंदुका तयार करण्यांत येत असून त्या बंदुकांची माहिती व नमुने लाच देऊन मिळविण्याचा हे यत्न करीत होते असा त्यांच्यावर आरोप आहे असें सांगतात.

टंगु मंडाले रेलवे करण्याचें ठरलें.

ब्रह्माच्या अंगास कान्हो विम यांच्यावर मणिपूर येथून कांहीं नवी फौज रवाना होणार.

चिनी गव्हरनरजनरल फार आजारी आहे.

वांबेग्याझिटच्या पुण्याच्या एका बातमीदारानें असें लिहिलें आहे—"सोलापूर विजापूर—आणि नगर जिल्ह्यांतील रयत चाऱ्याची आशी असल्यामुळें आपलीं गुरें कांहीं घेऊन किंवा न घेतां देत आहेत अशी वदंता आहे. एक आण्यास एक गुरू देण्यास रयत खुशी आहे. विजापुरास एकानें एक रुपयास १२ गुरें विकत घेतलीं. मिरजेकडे हीच स्थिति आपले बैल चाऱ्यावीण मरण्यापेक्षां ते विकणेंच शेतकऱ्यांस बरें वाटतें. अशी स्थिति झाल्यामुळें मध्य भागच्या आक्टिंग कमिशनर साहेबांनीं अशी स्थिति झाली असेल तेथल्या सरकारी राखींव जंगलांत रयतेचीं गुरें चरूं द्यावीं अशी सरकारांस शिफारस केली आहे." देवकरी आणि या कमिशनर साहेबांच्या सूचनेस यश मिळो.

चिरी मिरी मागणाऱ्या शिपायांस शिक्षा— अलीपूर (बंगाल) जिल्ह्याच्या कलेक्टर कचेरींत एक मुसलमान शिपाई होता, तो कामा कामासाठीं कलेक्टर कचेरींत येणाऱ्या लोकांपासून चिरीमिरी घेत असे. एकदां चिरीमिरी घेतांना त्यास पकडून त्याजवर खटला झाला. त्यांत त्याजवर शाबिती झाल्यामुळें त्यास दोन महिनें सक्त मजुरीची शिक्षा माजिस्ट्रेटानें दिली. या उदाहरणा वरून चिरीमिरी मागणाऱ्या शिपायांनीं सावध व्हावें.

ख्रिस्ती लोकांची कत्तल—चिनांतल्या बंडवाल्यांनीं ९०० ख्रिस्ती लोकांची कत्तल केली आणि कित्येक ख्रिस्ती इवलें पाडून जमीन दोस्त केलीं. हें बंड गुप्त मंडळ यांच्या चिथावणीनें उद्भवलें आहे अशी सरकारी बातमी पारीस येथें आली आहे. चीनच्या सरकारी फौजेनें बंड वाल्याशीं लढाई करून दोन ठिकाणी त्यांचा फडशा केला. असें चिनाहून आलेल्या बातमी वरून समजतें.

शु० सू०

हायकोर्टाचे सरकारी वकील मि. शांताराम मंगळवारीं मरण पावले. हे फार जुने, फार प्रसिद्ध व हुशार असून स्वभावानें गरीब व सर्वांशीं सारखे असे होते. मंडलीकांच्या मागें हे सरकारी वकील झाले. आतां बहुधा कीर्तीवर होतील.

प्रसिद्ध गोपाळराव नरसिंव्ह इंदापूरकर हे वढवाण येथें मरण पावले. यांचीं अति आवेशानें भरलेलीं व्याख्यानें सर्वांस आठवत असतीलच. हजारों लोकांच्या समाजांत व्याख्यानास उभे राहिले ह्मणजे, माझ्याशीं कुस्ती करण्यास तुमच्यांत कोणी तयार आहे काय, असें दंड थोपटून सर्वांस विचारण्याच्या वेळचा त्यांचा आवेश आमच्या मनांत फार दिवस राहील.यांत कांहीं शंका नाहीं.

फ्रेंचअरमारही वाढतच आहे. भुमध्यसमुद्रांत ३० अरमारें आहेत तीं ५० होणार, उत्तरेस नवीनच भरती व्हावयाची आहे.

हिंदुस्थान सरकारकारच्या ताब्यांतल्या लष्करी कामदारांस रशियन भाषा शिकण्याची सरकारानें एक प्रकारची मोकळीक दिली आहे. रशियांत जाऊन ती भाषा जे शिकून त्यांस यताल दोन हजार रुपयइनाम मिळून शिवाय तितक्या मुदतींचा कांहीं पगारही मिळेल असें सरकारानें फर्माविलें आहे.

डामरंगराजा हिंदुस्थानांत येण्यास निघाला.

गिलगितकडे जास्त कामदार रवाना होत आहेत.

कुकी लोक गडबड करण्याच्या बेतांत आहेत.

लार्ड लिटन मेल्यामुळें लार्ड डफरीन यांस फ्रेंचदरबारी वकील नेमलें. लार्ड डफरीन हे रशियन कारस्थानाचे चांगले माहीतगार असल्यामुळें ही नमणूक चांगली असें ह्मणतात.

ब्राझील येथें पुन्हा गडबड सुरूं झाली व बहुतेक जुन्या कामदारांनी राजीनामे दिले.

तात्या भिलाची बहीण भिला—भिलाबांईने कांहीं लोक जमवून सावियांत दंगे सुरू केले होते तिला पकडण्याबद्दल १८८१ त २०० रुपयांचा, १८८४ त ५०० चा व १८९० त १००० रुपयांचा जाहिरनामा होता शेवटीं तिचा यार आजारीपडला ह्मणून एका मुहेंत ती त्याची सुस्त्रुषा करीत असतां पकडली व फाशींची शिक्षा ती झाली. नेहमी पुरुषाच्या वेषानें सर्व कारभार करी.

ठा० ज०

## नोटीस

मे० मुल्ला बद्रुद्दीन सेख ज्याफरजी दुकान अकोलें. यांस नोटीस देणार कादरभाई अलीभाई रहाणार अकोलें. नोटीसीनें असें कळवितों कीं, तुमचे पाशी माझे नोकरी बद्दलचे रुपये हिशेब करून ठेव ठेविले आहे ते रुपये ३५० तीनशें पन्नास. हे रुपये नोटीस पावले पासून आठ दिवसांत आणून द्यावें न दिल्यास तुमचे वर फिर्याद करून ह्या नोटीशीचे खर्चा सुद्धां अखेर निकाल होई पर्यंत जे नुकसान वगैरे होईल ते सर्व भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस सही तारीख २३ माहे डिसेंबर सन १८९१ इसवी.

(सही)

कादरभाई अलीभाई राहणार आकोलें.

दस्तुर खुद.

## जाहिरात

सर्व लोकांस खाली सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं उदेभान चांदोडकर रहाणार वडद ता. अकोट याची मुलगी आनंदी ही माझ्या लग्नाची बायको आहे व अजून लहान आहे. लग्नाचे संबंधचा आमचा नवरेपणाचा पूर्ण हक्क हिजवरचा आह्मी कोणच्याही रीतीनें कमी केला नाहीं व फारकत वगैरेही दिली नाहीं. हिच्याशी कोणी गंधर्व करील तर त्यास सर्व प्रकारचा जबाबदार पकडून रीती प्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें तारीख २४ माहे डिसेंबर सन १८९१ इ०

सही.

सहींची निशाणी— विठू वल्द चिंधू खराटे रहाणार अकोली ता० अकोट याचे हातची असे.


विक्रीस तयार

**SAPKAR'S DIARY**
**FOR 1892**
WITH
A CALENDAR FOR 1893

## सापकरांची रोजनिशी. सन १८९२ सालाकरितां.

हींत मराठी तिथी, वार, [illegible], सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, [illegible], सरकारी आफिसांस व दिवाणी कोर्टांस [illegible]ऱ्या सुट्या, मौंजीविवाहांचे मुहूर्त, इंग्र[illegible] व मुसलमानी महिने, तारखा, रेलवे, तारायंत्र स्टांप, मनीआर्डेरी, पोस्ट, मुंबईबंपांकेंच्या रुळी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीच, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्टफी, पोलिसगाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर, इत्यादि नेहमीं लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदरांचीं व कांहीं कोरीं पृष्ठें जोडलीं आहेत.

## रोजनिशीची किंमत.

| | कि. | ट. हा. |
|---|---|---|
| प्रत नंबर १ | ०।१२ | ०।२ |
| प्रत नंबर २ | ०।८ | ०।१ |
| प्रत नंबर ३ | ०।७ | ०।१ |

किंमतीबद्दल रोख पैसे आह्मांकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर.

ज्ञानचक्षूचे मालक.

विक्रीस तयार.) (पाकेट साईज

**DIARY FOR 1892**

## सन १८९२ सालाकरितां रोजनिशी.

इंग्रजींत इंग्रजी तारीख, मराठींत तारीख मितीसुद्धां, प्रत्येक पानावर एकेक तारीख ह्मण व प्रत्येक तारखेला एकेक पान.

ही डायरी चांगल्या घोटीव कागदावर छापिली असून बायंडींग उत्तम प्रकारचें सोनेरी केलेलें आहे. यांत पोष्ट, रेलवे, तारायंत्र पर्जन्याचीं नक्षत्रें, विवाह, मौंजीमुहूर्त, सरकारी आफिसांस असणाऱ्या सुट्या फिर्यादीस स्टांप, कर्जखतास स्टांप, पगार देण्याची रीत, रवि उदय व रवि अस्त वगैरे सर्व प्रकारच्या माहितीचा यांत समावेश केला आहे.

किं. ९ आणे ट. ह. १ आणा.

विशेष सूचनाः—दहा प्रति घेणारास एक प्रत कमिशन.

व्हाल्यूपेबल अगर रोख किंमत आल्यास पाठविण्यांत येईल. प्रति खालीं सही करणारांकडे व वि. एम. वाळवेकर आणि कं० बुकसेलर्स, व पब्लिशर्स, मार्केट पोस्ट, यांजकडे मिळतील.

म्यानेजर सुबोधप्रकाश प्रेस, गिरगांव मुंबई.


☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

absolve themselves from their solemn responsibilities. It does not lie in their mouths to say that a certain man is disaffected and a certain man not so. It is their business and solemn duty if they have a heart, of course, to make him contented if his demand were both reasonable and just. History, analogy, and reason clearly indicate the means. A wearer best knows where the shoe pinches. Moreover mere compulsion is no good means to secure heart and sympathy for works of mental developments. That a man securely enjoys what we give him and that he has no right for demanding more even though it is his turn and right to get it, is an argument to which we are quite aware Raosahib appears foreign.

We would conclude this in the fullest confidence that his earnest and instructive advice will not be thrown away on those to whom it was so fervently given.

## वऱ्हाड.

गेल्या शिक्षकक्रमाच्या वेळीं जो सरकसचा व कसरतीचा खेळ झाला तो पाहून मि. आबारखान. असि. मास्तर ट्रेनिंग कॉलेज, यांनीं एक रुपया बक्षीस दिला. श्रीमतीवरच कांहीं गुणाची पारख नसते. ;

रा० रा० त्रिंबक गणेश एक्स्ट्रा असि. कमिशनर यांच्या कोर्टास असिस्टंट कमिशनर यांच्या कोर्टास असिस्टंट कमिशनर वर्ग २ चे अधिकार दिले.

यवतमाळ मुनिसिपालिटीचे नऊ सभासद लोक नियुक्त असावेत. असें ठरलें आहे.

दरे— ह्या आठवड्यांत दवऱ्याची बरीच गर्दी उसळली आहे मे० कमिशनर साहेब यांची स्वारी अकोट तालुक्यांत आहे. मे० डेपुटी कमिशनर साहेब यांचा मुक्काम बोरगांव नजिक आहे क्यापटन हासबरो अ० क० खामगांव यांची स्वारी जळगांव तालुक्यांत गेली आहे. मे० सिम्पसन सा० अ० क० यांची स्वारी लवकरच दवऱ्यावर निघणार आहे. मे० दांडेकर साहेब डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार यांची स्वारी सब आफिसें तपासण्याकरितां जळगाव तालुक्यांत रवाना झाली आहे.

आमचे येथील लोकप्रिय नांवाजलेले व हुशार डे० क० मि० हेअर साहेब यांणी सरबराई संबंधानें रयतेस त्रास होऊं नये ह्मणून बरीच खबरदारी घेतली आहे असें समजते.

## वर्तमानसार.